# दुसरा शिक्का

शुभ संध्याकाळ मित्रांनो. आपण सर्व एक क्षण प्रार्थनेसाठी उभे राहूया.

2 आमच्या स्वर्गीय पित्या, आम्ही, आजच्या रात्री, पुन्हा ह्या पवित्र सभेमध्ये तुझ्या सेवेसाठी जमलो आहोत. आणि तू वचन दिले आहेस की जेथे दोघे किंवा तिघे एकत्र जमतील तेथे तू त्यांच्यामध्ये उपस्थित असशील. आणि आम्ही खात्री करू शकतो की तू इथे आहेस, कारण आम्ही त्याच्या नावाने जमलो आहोत.

3 आता आम्ही प्रार्थना करतो बापा की—की तू आज रात्री इथे येऊन आमच्यासाठी हा दुसरा शिक्का फोडशील? आणि जसे तो कवी म्हणाला, तो काळाच्या पडद्यामागे बघू इच्छितो. आणि तीच आमची इच्छा आहे हे प्रभू, की भूतकाळात बघून आम्ही जाणावे की पुढे काय आहे. आणि आम्ही प्रार्थना करतो की—की, जो कोकरा अर्पण करण्यात आला, तो आता इथे येऊन शिक्का तोडेल व—व ज्या गोष्टी आम्ही समजायला हव्या, त्या आम्हाला प्रगट करील.

4 इथे काही जणे असतील प्रभू, जे अजून ख्रिस्तासोबत महान वचनाच्या सहभागीतेत गेले नाहीत. आम्ही प्रार्थना करतो की, आज रात्री ते, तो सार्वकालिक निर्णय घेतील, देवाच्या आत्म्याने भरतील.

5 पित्या, जर कोणी आजारी असेल, आम्ही प्रार्थना करतो की तू त्यांना बरे करशील. इथे खूप रुमाल आहेत ज्यांवर मी आपले हात ठेवले आहेत, बायबलमधील—मधिल संत पौलच्या स्मरणार्थ, जेथे ते रुमाल व फडकी त्याच्या शरीरावर ठेवत व ते नंतर लोकांवर ठेवत. त्याचवेळी अशुद्ध आत्मे त्यांच्यातून निघत व ते बरे होत.

6 आम्हाला प्रभूचे आगमन जवळ दिसत आहे. आम्हाला माहीत आहे की वेळ जवळ येत आहे. ह्या गोष्टी, नवशे वर्षांनंतर पुन्हा मंडळीकडे परत आल्या आहेत.

7 आता आम्ही प्रार्थना करतो हे पित्या, ज्या गोष्टी आम्ही मागितल्या आहेत त्या तू मान्य करशील. प्रभू तुझ्या सेवकाला सामर्थ्य दे, सर्वत्र तुझ्या सेवकांना सहाय्य कर, आणि विशेषकरून आम्ही जे इथे जमलो आहोत आम्हाला ही आम्ही तुझे वचन स्वीकारावे म्हणून आम्ही येशूच्या नावात मागतो. आमेन.

8 खरोखरच, आजच्या रात्री पुन्हा एकदा देवाच्या घरात येणं चांगले आहे. आणि मला माहीत आहे की, तुमच्यातील बरेच जणे उभे आहेत; त्याबद्दल क्षमस्व परंतु आम्ही त्याबद्दल जास्त काही करू शकत नाही. आम्ही—आम्ही चर्चमध्ये...तीन−चार, तीनशे−चारशे जास्त लोक मावतील एवढं वाढवले आहे; पण ह्यासारख्या खास सभांसाठी खूप जास्त गर्दी होते.

9 आता मी, प्रार्थनेत व ह्या शिक्क्यांचा अभ्यास करण्यात, खूप चांगला वेळ घालवत आहे. मी आशा करतो की तुम्हीसुद्धा घालवत असाल. [मंडळी "आमेन" म्हणते—सम्पा.] मला खात्री आहे की तुम्ही घालवत असाल. आणि जर हे तुम्हाला तितकंच महत्वाचं असेल जितकं ते मला आहे, तर नक्कीच...तुम्ही चांगली वेळ घालवत असाल. आणि...

10 मला माझ्या मैत्रिणीला दूरध्वनी करायचा आहे. आणि आज तिचा वाढदिवस आहे. आज ती बारा वर्षाची झाली आहे, सारा, माझी मुलगी. आणि नंतर, परवा, मला आणखीन एक दूरध्वनी करावा लागेल, कारण तेव्हा बेकीचा वाढदिवस आहे.

11 आणि, आत्ता, आज रात्री आपण दुसरा शिक्का ह्यावर अभ्यास करीत आहोत. आणि पहिल्या चार शिक्क्यांत तेथे चार घोडेस्वार आहेत. आणि मी तुम्हाला सांगतो, आज पुन्हा काहीतरी घडले. आणि मी—मी, काहीतरी, मी...मी, गेलो आणि माझ्याकडे जी जुनी टिपण्णी होती ज्यावर मी प्रचार केला होता ती बघत बसलो होतो. आणि मी विचार केला, "बरं, मला—मला जेवढं शक्य होतं तेवढं उत्तम मी केलं आहे." आणि खूप लेखक व बरेच काही, आणि मी विचार केला, "बरं, मी वाचतो व थोडं *इथे तिथे* शोधतो." आणि पहिलीच गोष्ट, तुम्हाला ठाऊक आहे, काहीतरी घडते, आणि हे पूर्णपणे वेगळे आहे. ते वेगळ्या पद्धतीने येते. आणि नंतर मी पटकन माझी पेन्सिल घेऊन शक्य तितक्या घाईत लिहितो, जितका वेळ तो तिथे उपस्थित आहे तोपर्यंत.

12 अरे! एक दीड तास अगोदर काहीतरी घडले. काही मिनिटांपूर्वी, खाली येताना मी भाऊ वूडला सांगत होतो. असेच काहीतरी, तुम्ही जाणता, तुम्ही जाणता, अश्या अनेक गोष्टी घडतात त्याविषयी तुम्ही बोलू शकत नाही. पण असंच काहीतरी आत्ता घडले, ज्याने मला खूप मदत झाली.

13 ह्या इमारतीमध्ये माझा एक मित्र आहे, अर्थात, तुम्ही सर्वच माझे मित्र आहात. हा—हा भाऊ, भाऊ ली वेल. हा भाऊ मौल्यवान आहे, आणि वचनाचा खरा अभ्यासक आहे. डॉ. वेल बाप्टीस्ट आहे, पवित्र आत्म्यासहित. आणि तो एक...आणि मी हे मानाकरिता बोलत नाही, मी हे बोलतो कारण मी विश्वास करतो. मला माहित असलेल्यांपैकी, तो एक उत्तम पारंगत विद्यार्थी आहे, आमचे मतभेद विसरुन. आणि त्याने छोटीशी टिपण्णी लिहून, माझ्यासाठी, बिलीकरवी पाठवली आहे. आणि बिली ती मला वेळेवर देऊ शकला नाही, आणि मला वाटते, मी ती पूर्ण वाचली नाही. पण, त्याने त्यात जे सांगितले, ते मी इथे फक्त सांगणार होतो. मी ते सहा महिन्यापुर्वी वाचले आहे. भाई ली वेयले, काय तुम्ही येथे आहात काय? मी ते जवळजवळ सहा महिन्यांपूर्वी वाचले होते.

14 "मला खात्री नाही". तो म्हणाला, "भाऊ बिल, मला खात्री नाही, पण मी विश्वास करतो की, पोलिकार्प हा संत योहानाचा विद्यार्थी होता". ते बरोबर आहे. तो होता. "मला वाटते, इरेनियसने हा पोलिकार्पचा विद्यार्थी होता". ते बरोबर आहे, अगदी बरोबर. "इरेनियसने सांगितले की, 'येशू परत—परत येईल जेव्हा ख्रिस्ताच्या शरीराचा शेवटचा निवडलेला सदस्य आत येईल.'"

15 तो इरेनियस होता ख्रिस्ताच्या मरणांनतर जवळजवळ...चारशे वर्षा नंतर. तो म्हणाला, "जेव्हा हे शेवटचे युग येईल..." आता हे नायसिया परिषदे अगोदर आहे तुम्ही जे इथे आहात जे वाचतात वचनाचा अभ्यास अर्थात जे बाइबलच्या इतिहासाचा...अभ्यास करतात तुम्हाला माहित आहे हे...नायसिया परषदे पूर्वी मिळते हे मला वाटते हे पहिले पुस्तक किंवा दुसरे पुस्तक तुम्ही—तुम्ही ते बघाल. आणि आता खूप वर्षा पूर्वी हे बघितले त्याने सांगितले, "शेवटचा—शेवटचा तो शेवटचा...निवडलेला तो निवडलेला."

16 लोक विचार करतात जी निवड अशी निवडलेली एखादी जी गोष्ट आहे. जी इथे नुकताच उबविलेली आहे, हा ती सगळ्यात जुन्या शिकवणीतली ती गोष्ट आहे निवड व बोलावने जुन्या सगळ्यात ती! अहाहा आणि म्हणून इरेनियसने जो निश्चितच वचनाचा खरा अभ्यासक होता नेहमी निवडीवर विश्वास केला

17 आणि आयर्नस हां चर्च युगांतील दूतांपैकी एक दूत होता आपण ज्याप्रमाणे आपण बघितले ज्याप्रमाणे आपण शिकलो आम्ही विश्वास करितो अर्थातस आता ही सगळी रहस्य होती ती सर्व इथे आहे इथे ह्या शिक्या मध्ये दडलेली तुम्ही पहा आणि ती

शेवटच्या दिवसात प्रगट होने आहे अशी त्याची सुरवात पौलान पासून झाली आणि— आणि इरेनियस आणि मार्टिन आणि असे पुढे होऊन ह्या शेवटच्या काळात ती आली

18 आणि, आम्ही विश्वास करतो की आज रात्री, प्रभू आमचे प्रयत्न आशिर्वादीत करील. आता आपण...पहिला शिक्का, मी खरोखरच त्याचा आनंद उपभोगला. पहिला शिक्का, त्याच्याबरोबर जो आशीर्वाद मला मिळाला!

19 आणि, मला—मला तुम्हाला जास्त वेळ थांबवायचे नाहीये, पण, तुम्ही बघा, मला—मला काही रात्रीनंतर, आणि हे संपल्यावर, पुन्हा जाणे आहे. आणि आपल्याला काही वेळ थोडा त्रास घ्यावा लागेल. आणि...

20 आणि ज्युनियर जॅक्सन तिथे उभा असलेला मला दिसतोय. मला...आणि मला वाटते की, काही क्षणांपुर्वी, मी भाऊ रुड्डेलला इथे कुठेतरी बघितले. आणि ते भाऊ, व दुसरे जे आपल्याबरोबर बहिणीसारखे नातेसंबंध असणाऱ्या मंडळीतून आले आहेत.आम्ही खरोखरच ह्याचं कौतुक करतो. आणि मला भाऊ हूपर दिसत आहेत, मी विश्वास करतो, ते तिथे भिंतीच्या बाजूने उभे आहेत, ते युटीका येथील चर्च मधून आहेत. आणि आम्ही तुम्हा सर्वांच्या सहकार्याबद्दल खरोखर प्रशंसा करतो.

21 आता मागच्या संध्याकाळी, जसे शिक्क्यांवर शिकविणे आपल्याला नेहमी आवडते, आणि जसे मंडळींच्या युगांवर शिकविले त्याचप्रमाणे आम्ही हे शिकवितो. आणि ज्यावेळी आपण मंडळींचा युगांवर शिकविणे संपविले जेव्हा मी इथे व्यासपीठावर—वर त्या युगांचे चित्र काढले होते त्यावेळीला काय घडले होते, ते किती जणांना आठवते? तो तिथे खाली उतरला आणि प्रकाशाच्या स्वरूपात मागे भिंतीकड़े जाऊंन त्याने स्वत:ने आपल्या सर्वासमश्र ते चित्र भिंतीवर काढले देवाचा दूत काही सहस्त्र लोकांसमोर इथेच उभा होता.

22 आणि आत्ताही तो—तो काहीतरी अदभूत करत आहे, आणि म्हणून आम्ही महान गोष्टींची अपेक्षा करतो. आपल्याला माहित नाही...फक्त अपेक्षा करून आम्ही वाट पाहतो, माहीत नाही की पुढे काय होईल, फक्त वाट पाहतो. परमेश्वर आपल्यासाठी किती महान आणि अदभूत आहे. आम्ही खरोखर त्याची प्रशंसा करतो!

23 आता मी थोडीशी पार्श्वभूमी देण्यासाठी पाहिले व दुसरे वचन वाचतो. आणि मग दुसऱ्या शिक्क्यासाठी आपण तिसरे व चवथे वचन घेउ. आणि नंतर पाचवे व सहावे वचन ही तिसरा शिक्का आहेत. आणि सातवे व आठवे...प्रत्येकी एकेका घोडेस्वारासाठी आहेत. आणि मी इच्छितो की तुम्ही बघा की, जसजसे आपण पुढे जातो, कशा त्या फिक्क्या घोड्यावरील व्यक्ती बदलत जातात.

24 आणि जर देवाची इच्छा असेल तर पुढच्या रविवारी रात्री तो शेवटचा महान शिक्का उघडला जाईल. आणि जेव्हा हे घडले, तेथे फक्त एकच गोष्ट घडली, "स्वर्गात अर्धा तास शांतता होती." परमेश्वर आपल्याला साहाय्य करो.

25 आता मी तिसरं वचन वाचतो

*त्याने दुसरा शिक्का फोडला तेव्हा दूसरा प्राणी ये असे म्हणाला*

*ते मी हे ऐकले तेव्हा तो दुसरा घोड़ा निघाला...*(चवथं वचन)*...तो अग्निवर्ण होता...आणि त्याच्यावर बसलेल्या स्वाराकडे प्रथ्वीवरील शांतता हरण करण्याचे आणि...लोकांकडून एकमेकांचा वध करविण्याचें...लोकांकडून एकमेकांचा वध करविण्याचें काम सोपविलें होतें त्याला मोठी तरवार देण्यांत आली होती*

26 आता, इथे एक रहस्यमय गोष्ट आहे, तो—तो प्राणी योहानाला म्हणाला, “फक्त ये आणि बघ”. आणि त्याला तिथे ते काय होते ते दिसले नाही. त्याला फक्त एक चिन्ह दिसले. आणि त्या चिन्हाचे कारण...तो म्हणाला, “ये आणि पहा,” पण त्याला केवळ चिन्ह दिसले. ह्याचे कारण हे होते की योहानाने मंडळीला ते चिन्हात्मकरित्या दाखवावे व मंडळीने ते ह्या शेवटच्या युगापर्यंत तसेच बघावे व ह्या युगात तो शिक्का उघडला जावा.

27 आता सर्वांना हे माहित आहे, की शिक्के उघडले जाणार होते. आणि ह्या दिवसांमध्ये असण्याबद्दल आनंदित नाहीत का? [मंडळी म्हणते, “आमेन”—सम्पा.] आणि बघा मित्रांनो, केवळ तेच नव्हे, पण आता नेहमी हे लक्षात ठेवा, गेल्या रविवारी सकाळी जेथे सर्व गोष्टी साधेपणावर आधारित होत्या! बघा? साधं, नम्र अश्या प्रकारे घडते की लोकं त्यावरून जातात व त्यांना कळतही नाही की हे घडलं.

28 आणि लक्षात घ्या, आपण अपेक्षा करतो की प्रभूचे येणे कोणत्याही क्षणी होऊ शकते. आणि...मी असे विधान केले की कदाचित रूपांतर ही असेच होईल. ते होऊन जाईल व कोणाला त्याविषयी काहीही माहित होणार नाही. ते अशाचप्रकारे होईल. बघितलं? आणि सामान्यत...फक्त जाऊन बायबल मध्ये बघा की ते त्याप्रकारे कसे घडेल! बघितलं?

29 येशू ख्रिस्ताच्या येण्याबद्दलच्या महान गोष्टीविषयीसुद्धा, कोणालाही त्याविषयी काहीही माहित नव्हते. त्यांनी विचार केला की, “कोणीतरी विक्षिप्त” मंडळयांनी म्हटले, “फक्त एक धर्मांध...तो खरोखरच वेडा आहे,” म्हटले, “तो वेडामाणूस आहे.” “आम्हाला माहित आहे की तू वेडा आहेस.” *वेडा* म्हणजे “वेडसर”. “आम्हाला माहित आहे की तुला भूत लागले आहे व ते तुला वेडसर बनवत आहे. आणि तू आम्हाला शिकवण्याचा प्रयत्न करतोस? जेव्हा तुझा जन्म अवैधरित्या झाला...तुझा जन्म व्यभिचाराने झाला. तू आमच्यासारख्या धर्मगुरू वगैरे लोकांना शिकविण्याचा प्रयत्न करतोस काय?” अरे बापरे! तो त्यांच्यासाठी एक अपमान होता.

30 जेव्हा योहान आला, ज्याविषयी यशया पासून मलाखी पर्यंत बोलले गेले होते. बाराशे...किंवा सातशे बारा वर्षांपासून संदेष्टयांनी त्याचे येणे पाहिले होते. सर्वजण त्याच्या येण्याची वाट पाहत होते व तो कोणत्याही क्षणी येण्याची अपेक्षा करत होते. परंतु ज्याप्रकारे तो आला, त्याने प्रचार केला व त्याने सेवा केली आणि गौरवात वर गेला.

31 आणि प्रेषितांनाही हे माहीत नव्हते, कारण त्यांनी त्याला विचारले. ते म्हणाले, “आता जर—जर मनुष्याचा पुत्र अर्पिला जाण्यासाठी यरुशलेमेत जात आहे”, म्हणाले, “तर मग शास्त्रात असे का म्हटले आहे की ‘प्रथम एलिया आला पाहिजे’?”

32 येशू म्हणाला, “तो अगोदरच आला आहे पण तुम्हाला हे कळले नाही। आणि जे शास्त्रात त्याने करावे असे लिहिले आहे तेच नेमके त्याने केले. आणि जे सुचबद्ध होते ते त्यांनी त्याचबरोबर केले.” बघितलं? आणि त्यांना हे कळू शकले नाही. त्याने म्हटले, “तो योहान होता.”

आणि नंतर, “अरे!” बघा, ते—ते त्याविषयी जागे झाले.

33 आणि जेव्हा, शेवटी सर्व गोष्टी ज्या त्याने—त्याने केल्या, व जी चिन्हे त्याने त्यांना दाखविली व बोलावून म्हटले, “तुमच्यामधील कोण मला पापी, अविश्वासी असे दोषी ठरवू शकेल? आणि शास्त्राप्रमाणे पृथ्वीवर येऊन माझी सेवा जी मी करेन असे लिहिले आहे त्याप्रमाणे मी केले आहे तर मला दाखवा की मी कुठे पाप केले. बघितलं? मग मी—मी तुला दाखविन तू कसे असायला हवे, आणि मला पाहू दे की तू विश्वास करतोस किंवा नाही.” बघितलं? तो मागे येऊन त्याने विचारले असते, “जेव्हा मी येतो तेव्हा तुम्हाला माझ्यावर विश्वास ठेवणे होते.” बघा, त्यांनी तसे केले नाही, तर मग त्यांनी त्यामध्येच

त्याला पकडले. पण तो म्हणाला, “तुमच्यातील कोण माझ्यावर अविश्वासाचा दोष लावू शकेल? बघितलं, जे करायचे होते तेच मी केले नाही काय?”

34 आणि प्रेषितही जे त्याच्याबरोबर होते तेसुद्धा अडखळले. आपल्याला माहित आहे की वचन काय सांगते. आणि मग, शेवटी, ते म्हणाले, “आता आम्ही विश्वास करतो, आम्ही विश्वास करतो की, कोणाही मनुष्याला तुला सांगण्याची गरज नाही, कारण तू सर्व गोष्टी जाणतोस.”

35 आता मला खरोखर त्याचा चेहरा बघण्यास आवडले असते. तो त्यांच्यावर बघून म्हणाला असेल, “बरं! तुम्ही आता विश्वास करता काय? शेवटी हे तुमच्यावर उदय पावला.” बरे! कदाचित तुम्ही बघत नाही तोपर्यंत हे व्हायचे नसेल. आणि देव सर्व गोष्टी व्यवस्थित करतो, तुम्ही जाणता. त्यासाठी मी—मी त्यावर प्रेम करतो.

36 परंतु आता आपण आपल्या युगाचा विचार करूया, कारण मी जर मी त्याचबद्दल बोलत राहिलो तर आपण ह्या शिक्क्यांवर येणारच नाही.

37 आणि आता, लक्षात घ्या, मला आजाऱ्यांसाठी प्रार्थना करावयास खूप विनंत्या येत आहेत. आणि...माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक विनंतीसाठी मी नेहमी प्रार्थना करत असतो, व तसेच रुमालांसाठी वैगरे. आणि जर आपण हे शिक्के संपवू शकलो, शेवटच्या शिक्क्यापर्यंत, रविवारी सकाळी, आपण...जर परमेश्वराची इच्छा असेल तर आम्ही इथे एक चांगली जुन्या पद्धतीची आरोग्य सभा घेऊ इच्छितो, जेथे आपण पूर्ण सकाळ आजाऱ्यांवर प्रार्थना करण्यासाठी घेऊ. आणि मला—मला पूर्ण खात्री आहे की ही एक वेगळीच आरोग्य सभा असेल, बघा? आणि मला फक्त अशी भावना आहे, तुम्ही बघितलं. आणि म्हणून काही विचित्र नाही, पण काहींसाठी हे विचित्र असेल, पाहा, माझ्या बोलण्याचा काय अर्थ आहे?

38 आता, देवाची कृपा किती महान आहे की ह्या दिवसात तो आपल्याला त्याची गुजे प्रगट करत आहे. आता, आम्ही सर्व विश्वास करतो की आम्ही अंत समयात राहत आहो. आम्ही तसा विश्वास करतो. आणि लक्षात घ्या, गुजे शेवटल्या दिवसात प्रगट होणे होते. आणि कसा तो त्याचे वचन, त्याची गुजे प्रगट करतो? बायबल म्हणते. तो कुठे हे सांगतो तुम्हाला वाचायचे आहे का? आता आपण उघडू आणि बघूया कश्या प्रकारे तो आपली गुजे प्रगट करतो.

39 आता मी इच्छितो की तुम्ही आमोस मधून वाचावे. आमोसचे पुस्तक उघडूया व मी इच्छितो की तुम्ही तिसऱ्या अध्यायातील सातवे वचन वाचा. ठीक आहे, मी सहावे वाचनसुद्धा वाचतो,

> *नगरात रणशिंग...वाजविल्यास लोक घाबरावयाचे नाहीत काय?*
>
> *प्रभु परमेश्वर...आपले रहस्य आपले सेवक संदेष्टे यांस कळविल्याशिवाय खरोखर काहीच करीत नाही.*

40 आता शेवटल्या दिवसांत आपण असताना...आपणाला हे भाकीत करण्यात आले आहे की, एक—एक संदेष्टा उठेल.

41 आता आम्हाला माहित आहे की आमच्याकडे सर्व प्रकारचे संदेष्टे आहेत. आता आजच्या रात्री, आजूबाजूला बघितल्यावर माझ्या हे लक्षात येते की, मी—मी येथे बोलत आहे जेथे अभ्यासक बसले आहेत, आणि माझी तुमच्यासाठी इच्छा आहे की तुम्ही मला समजून घ्यावे हे मला आवडेल. आणि तुम्ही जाणता कि ह्या टेप्स् जगभर पसरतात, बघा, जवळजवळ पूर्ण जगभर. आणि मी इच्छितो की तुम्ही कोणत्याही प्रकारे असा विचार

करू नका की मी एलियाच्या चादरीचा किंवा झग्याचा कोणता पंथ तत्वप्रणाली करण्याचा प्रयत्न करत आहे. आणि सर्व—सर्व गोष्टी, परंतु तुम्हाला माहित आहे की लोकांना बाहेर फेकण्यासाठी, त्या सर्व गोष्टी, ज्या खऱ्या गोष्टी येणार होत्या यांविषयी पूर्वसूचना अश्या होत्या.

42 तुम्हाला माहित होते का, ख्रिस्त येण्यापूर्वी तेथे खोटे—खोटे पुढारी व खोटे मसिहा उठले होते? असे झाले नाही का...जेव्हा ह्या मनुष्यांना मारण्याचा वगैरे प्रश्न आला तेव्हा तो महान शिक्षक गमलीयेल म्हणाला, "त्यांना एकटे सोडा." कारण, "जर हे देवापासून असेल तर तुम्ही देवाविरुद्ध भांडताना आढळाल. पण जर हे देवापासून नसेल..." म्हणाला, "काही काळापूर्वीच एक मनुष्य उठला नाही काय आणि चारशे लोकांना अरण्यात नेले, आणि असेच? आपल्याला त्या गोष्टी माहित आहेत." ते काय होते? ज्या वास्तविक गोष्टी होणार होत्या त्यांविषयी पूर्वचिन्ह होते.

43 आता बघा, सैतान त्या गोष्टी उभ्या करतो. त्याचा धुर्तपणा बघा, ज्याच्याविषयी आपण येथे बोलत आहोत; सैतान, आपण इथे त्याला उघड करित आहोत, वाचनाद्वारे त्याला उघडे करत आहोत, आणि तुम्ही पाहा तो कोण आहे. तसेच...तसेच करायला हवे.

44 आणि, तुम्ही लक्षात ठेवा की सैतानाने तिथे जाऊन साम्यवादी बनण्याचा प्रयत्न केला नाही. तो ख्रिस्तविरोधक आहे. "इतका जवळ की," येशूने म्हटले, "निवडलेल्यांस देखील फसवेल..." आणि तेच आहेत जे ह्या शिक्क्यांमध्ये लपले आहेत, ज्यांची नावे जगाच्या स्थापनेपासून पुस्तकांमध्ये आहेत.

45 सैतान तो एक धूर्त व्यक्ती आहे. आणि जेव्हा सैतान या गोष्टी पुढे होताना पाहतो, तेव्हा तो ते पुढे जाण्याअगोदरच त्याला बिघडावे या हेतूने तो सर्वकाही पणाला लावतो जो तो लावू शकतो. काय आपल्याला माहिती आहे. की अंताच्या दिवसात खोटे संदेष्टे उठतील आणि त्यानंतर लगेच तसे व्हावयास हवे, तसे ह्या महान संदेशानंतर लगेच व्हावयास हवे ज्याला हा भाऊ म्हणेल, जे वास्तविकरित्या एलियाच्या आत्म्याने अभिषेक होवून येईल.

46 आणि ते त्याच्याविषयी चुकतील. त्यांच्यातील काही त्याला मसिहा समजतील. परंतु तो काटेकोरपणे म्हणेल, "नाही." कारण हे योहनाप्रमाणे आले पाहिजे.

47 बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या समयात, जेव्हा तो बाहेर येऊन प्रचार करू लागला तेव्हा ते त्याला म्हणाले, "तू मसिहा नाहीस काय? तूच तो नाहीस काय?"

48 तो म्हणाला, "मी नाही. मी त्याचे पायबंध सोडण्यासही योग्य नाही. पण मी—मी तुम्हाला पाण्याने बाप्तिस्मा देतो, पण तो तुम्हाला पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा देईल." आणि योहानाला पूर्ण खात्री होती की तो पृथ्वीवर होता, तो म्हणाला, "आता, तो तुम्हामध्ये कुठेतरी आहे."

49 परंतु तो त्याला ओळखीत नव्हता जोपर्यंत त्याने ते चिन्ह त्याच्यावर खाली येताना पहिले नाही. आणि नंतर जेव्हा त्याने तो प्रकाश खाली येताना व त्याच्यावर कबुतरासारखा प्रकाशताना पहिला, तो म्हणाला, "तेथे तो आहे, तो तोच आहे." पण तुम्हाला माहित आहे का, योहान एकटाच होता ज्याने हे पहिले. योहान एकटाच होता ज्याने तो आवाज ऐकला. बाकी लोकं जे तिथे होते, कोणीही तो ऐकला नाही.

50 परंतु जितपर्यंत वास्तविक खरा सेवक आला तेव्हा सैतानाने त्यामध्ये सर्वप्रकारे बतावणी केली की, की लोकांच्या मनात भ्रांती उत्पन्न कराव्या. पण जे खरे आणि खोटे ह्यांतला भेद ओळखत नाहीत, तेच अडखळतात. परंतु निवडलेले तसं करणार नाहीत, बायबल म्हणते तो निवडलेल्यांना फसवू शकणार नाही. आणि आता, बायबल

म्हणते, ख्रिस्त येण्याच्या अगोदर, "खोटे ख्रिस्त उठतील व स्वतःला ख्रिस्त म्हणून दावा करतील, आणि म्हणतील, 'बघा, लोकं म्हणतात, तो निर्जन ठिकाणी आहे,' त्यावर विश्वास करू नका, 'तो आतल्या खोलीत आहे,' त्यावर विश्वास करू नका."

51 "कारण जसा सुर्य पुर्वेतून निघून पश्चिमपर्यंत चमकतो, तसेच मनुष्याच्या पुत्राला ही आणावे लागेल." पाहा? होय, तो—तो—तो प्रगट होईल, आणि ती जागतिक गोष्ट असेल. आणि आता, जेव्हा त्यांना समजेल कि काहीतरी असे घडले आहे, तेव्हा पाहा…आता लक्षात ठेवा कि हे, मंडळीचे लोकांतर झाल्यानंतर, रॅपचर झाल्यानंतर, लगेच होईल.

52 आता खोटी नक्कल करणे हे नेहमी असणारच पण आम्ही काहीही करुन जोडलेले असण्याचा हेतू नसावा. नाही श्रीमान.

53 आणि मी विश्वास करतो, जेव्हा हि व्यक्ती येईल, हि व्यक्ती जी येण्याचे भाकीत करण्यात आले आहे, मी वाचनातूनच हे दाखवितो, की हा मनुष्य संदेष्टाच असेल. तो नक्कीच असणार. आणि देवाचे प्रगटीकरण, प्रभूचे वचन त्याच्या संदेष्ट्याकडे येते. हे अगदी बरोबर आहे. आणि परमेश्वर बदलू शकत नाही, तुम्ही पाहा! जर त्याच्याकडे ह्यापेक्षा चांगली प्रणाली असती, तर त्याने ती वापरली असती. पण त्याने सुरुवातीलाच सर्वात उत्तम प्रणाली निवडली.

54 जसे, तो वचन प्रचार करण्यासाठी सूर्य निवडू शकला असता. तो चंद्र निवडू शकला असता. तो हवा निवडू शकला असता. पण त्याने मनुष्य निवडला. आणि त्याने कधीच समुह निवडला नाही, व्यक्ती निवडला! पाहिलं?

55 आणि पृथ्वीवर कधीही दोन मोठे संदेष्टे एकाच वेळेला नव्हते. पाहा, प्रत्येक मनुष्य वेगळा आहे, प्रत्येकाची घडण वेगळी आहे. जर देवाला एक मनुष्य मिळू शकला, तेवढाच त्याला त्याच्या हातात पुरेसा आहे, तो जे करू इच्छितो ते करण्यासाठी…त्याला फक्त एकच मिळायला हवा. नोहाच्या दिवसांत; एलियाच्या दिवसांत; मोशेच्या दिवसांत.

56 मोशेच्या समयात बरेच जण उठले. तुम्हाला माहित आहे त्यांनी काय केले, आणि ते म्हणू इच्छित होते की, "तू एकटाच पूर्ण ह्या समूहामध्ये पवित्र नाहीस," आणि—आणि दाथान व—व कोरह.

57 आणि परमेश्वर म्हणाला, "तू स्वत:ला वेगळे कर व मी पृथ्वी उघडून तिच्यात त्यांना गिळतो." पाहिलं तुम्ही? आणि—आणि…

58 आणि मग लोकं तक्रार करू लागले. तो म्हणाला, "मी—मी सर्वांचा नाश करून त्यांना घालवून देतो."

59 आणि तेथे त्यावेळी, मोशेने ख्रिस्ताची जागा घेतली; स्वतःला खिंडारांमध्ये झोकून तो म्हणाला, "प्रभू असे करू नकोस." पाहिले? आणि…त्याने मोशेला ह्यासाठी अभिषेक केल्यानंतर तो मोशेवर आला नाही कारण तो त्या वेळेला ख्रिस्ताची भूमिका करत होता. मोशेमध्ये तो ख्रिस्त होता. पूर्णपणे.

60 आता आम्ही आज खूप आनंदी आहोत की परमेश्वर आमच्यापुढे स्वत:ला प्रगट करत आहे. आणि मी विश्वास करतो की तो महान दिवस आताच उगवत आहे, उदय पावत आहे. उजेड चकाकण्यास सुरुवात झाली आहे. स्वर्गामधल्या पक्षांनी संतांच्या हृदयात गाण्यास सुरुवात केली आहे. त्यांना माहित आहे की आता ते जास्त दूर नाही. काहीतरी घडणार आहे, घडणारच. जर, "तो काहीच करीत नाही तर…"

61 आता, सर्व शास्त्रलेख प्रेरित आहे. संपूर्ण शास्त्रवचने पूर्णपणे खरी असली पाहिजेत. त्याला पर्यायी मार्गच नाही. तिथेच आपल्या कॅथॉलिक मंडळीतील मित्रांबरोबर माझी भिन्नता आहे. मी विश्वास करतो की ते केवळ मनुष्याने लिहिले नाही. मी विश्वास करतो की हे पवित्र आत्म्यापासूम लिहीलेले आहे. तुम्ही कधी त्यावर लक्ष दिले, की ज्या छोट्या छोट्या गोष्टी ज्या जोडण्यात आल्या किंवा त्याला जोडण्याचा प्रयत्न केला गेला जेव्हा त्या सोडविण्याचा प्रयत्न केला गेला त्यांना प्रत्येकांना बाहेर काढले गेले.

62 आणि ही खरी, सत्य वचने एकमेकांशी इतकी जुळतात की त्यांच्यामध्ये कोणताच विरोधाभास नाही; कुठेच नाही. मला एक साहित्य दाखवा, जे—जे एक वचन स्वतःलाच विरोध न करता लिहिता येईल, एक किंवा दोन वचने. आणि बायबल कुठेच, स्वतःच्या विरुध्द प्रतिपादन करत नाही. मी एक जुन्या टिकाकारात वाचले होते जे असे म्हणते; पण माझ्याकडे खूप वेळेपासून त्याच्यासाठी एक प्रस्ताव होता, की मला दाखववावे असे कुठे आढळते. ते इथे ह्यामध्ये नाहीये. हे अशासाठी आहे की मनुष्याचे मन गोंधळले आहे. परमेश्वर गोंधळला नाही. त्याला माहित आहे तो काय करत आहे. त्याला माहित आहे.

63 बघा, जर परमेश्वर जगाचा न्याय एखाद्या मंडळीद्वारे करणार असेल, जसे कॅथॉलिक मंडळी म्हणते, ठीक आहे, तर मग ती मंडळी कोणती आहे? ज्या मंडळ्या आमच्याकडे आहेत त्यांवर बघा. आपल्याकडे नवशे काहीतरी मंडळींचे समूह आहेत. आता...कसे, एक *ह्या* प्रकारे शिकविते आणि एक *त्या* प्रकारे शिकविते. किती गोंधळाची स्थिती आहे, ज्याला जसे वाटते तसे तो करीत आहे. तुम्ही कोणत्याही प्रकारे काहीही करु शकता. देवाकडे काहीतरी प्रमाण असायला हवे आणि ते त्याचे वचन आहे.

64 आता हे सांगत असताना...मी कॅथोलिक मंडळीची निंदा करीत नाहीए, कारण प्रोटेस्टंट सुध्दा त्यासारखीच भ्रष्ट आहे. परंतु एका धर्मगुरबरोबर बोलताना तो म्हणाला, "भाऊ ब्रँन्हम," तो म्हणाला, "देव त्याच्या मंडळीत आहे."

65 मी म्हणालो, "महाशय देव त्याच्या वचनात आहे, आणि तो वचन आहे," होय महाशय.

तो म्हणाला, "बरे तो आहे...मंडळी पडनारी आहे."

66 मी म्हणालो, "तो तसे म्हणत नाही, पण त्याने म्हटले आहे की त्याचे वचन न पडणारे आहे."

67 तो म्हणाल, "बरे! आपण बाप्तिस्म्याबद्दल तश्या गोष्टी शिकवीत होतो, व अश्या काही गोष्टी."

मी म्हणालो, "कधी?"

म्हणाला, "मागे सुरुवातीच्या दिवसांत".

मी म्हणालो, "तुम्ही हे मान्य करता काय की ते कॅथॉलिक मंडळीमध्ये होते?"

तो म्हणाला, "होय."

68 मी म्हणालो, "मग मी कॅथॉलिक आहे, जुन्या–विचारांचा कॅथॉलिक. मी जुन्या–पद्धतीच्या मार्गावर विश्वास करतो. आज तुम्ही सर्व काही गोंधळ करून टाकला आहे आणि तुम्ही क्वचितच काहीतरी वाचनातून शिकविता. स्त्रियांकडून आणि मेलेल्या लोकांकडून मध्यस्थी, आणि अश्या दुसऱ्या काही गोष्टी, आणि, अरे, मांसाहार न करणे, आणि, अरे, आणि मला माहित नाही, असे बरेच काही, पाहा." मी म्हणालो, "तुम्ही ते मला वचनात शोधून दाखवा."

69 तो म्हणाला, “ते तिथे असणे जरुरी नाही, जोपर्यंत चर्च असे म्हणते, तर ते ठीक आहे. ते काय म्हणते ह्याने काही फरक पडत नाही, पण चर्च.”

70 मी म्हणालो, “बायबलमध्ये म्हटले आहे की, ‘जो कोणी त्यामध्ये एक शब्द घालील, किंवा त्यातून एक शब्द काढील, त्याचा वाटा जीवनाच्या पुस्तकातून काढून टाकला जाईल.’ तर हे वचन आहे! मी वचनावर विश्वास करतो.”

71 आणि आता, त्या वेळेला, आमोस म्हणाला, आणि दुसरी वचने त्याबरोबर असतील, कि जर…

72 आणि तुम्ही हे लक्षात घ्या की आपण फक्त त्यांतील ठळक गोष्टींचा उल्लेख करत आहोत. फक्त…जेव्हा मी तिथे त्या खोलीत जातो, आणि—आणि जेव्हा तो अभिषेक येतो, जर मी तेथे जे काही घडते ते…लिहू शकलो असतो, तर मी येथे तीन महिन्यासाठी कोणत्यातरी एका शिक्क्यावर बोलत राहिलो असतो. परंतु तरीसुध्दा या लोकांना आघात करण्यास योग्य नाही. परंतु हे तर फक्त असेच आहे की लोक समयाच्या गोष्टींवर विश्वास करोत. तुम्ही समजता माझ्या म्हणण्याचा काय उद्देश आहे.

73 आता, हे पाहा, आता, जर, “परमेश्वर कोणती गोष्ट करत नाही,” आमोसने म्हटले, “जोपर्यंत प्रथम तो आपले सेवक संदेष्टयांना प्रगट करीत नाही.” आणि, मग, आपण बघतो तो काय करत आहे. हे असं असलं पाहिजे की तो काहीतरी करण्याचे ठरवत आहे, जे तो आता प्रगट करत आहे. मी विश्वास करतो की देव हा न्यायाच्याद्वारे दृश्यात येण्याची हालचाल करीत आहे. हालावण्याचे ठरवत आहे. तो काहीतरी करण्याचे ठरवत आहे. आणि एक गोष्ट पुन्हा एकदा, हे खरोखर साक्ष देते की आपण शेवटल्या दिवसांत आहोत. आपण आता लावदिकिया युगाच्या शेवटी आहोत, कारण ह्या गोष्टी शेवटल्या दिवसांत प्रगट होणे होते.

74 आता फक्त ह्याचा विचार करा. आपण जे विश्वास करतो त्यात पूर्णपणे मुरण्याचा प्रयत्न करूया की जेणेकरून पवित्र आत्मा आपल्याला माहित करून देईल.

75 आता लक्षात ठेवा, “काहीच प्रगट केले जाणार नाही; परमेश्वर कोणतीच गोष्ट करणार नाही, जोपर्यंत प्रथम तो ती त्याचे सेवक, संदेष्टये ह्यांना प्रगट करत नाही.” आणि तो काहीही करण्याच्या अगोदर ते प्रगट करतो. आणि जेव्हा तो ते प्रगट करतो, तुम्ही आठवू शकता, की काहीतरी त्याच्या मार्गावर आहे. बघा, हे प्रगट होत आहे.

76 आणि ह्या गोष्टी, ज्यांच्याविषयी आपण बोलत आहोत, ह्या शेवटल्या दिवसांत प्रगट होणे होते, अगदी शेवटच्या कर्ण्याअगोदर, शेवटल्या मंडळी युगाच्या संदेशाच्या शेवटी. हे बरोबर आहे. जर तुम्हाला ते वाचायचे असेल तर तुम्ही उघडू शकता…तुम्ही, मी तुम्हाला काल रात्री तीन वेळा संदर्भ दिला, प्रगटीकरण 10:1–7, पाहा. “आणि सातव्या देवदूताची वाणी होईल त्या दिवसांत, देवाची गुज प्रगट होईल व पूर्ण होईल.” आणि एकच गोष्ट बाकी आहे. जेव्हा हे सात शिक्क्याचे पुस्तक उघडेल, तेव्हा देवाचे पूर्ण गुज…

77 का आपण वर्षानुवर्षे त्याचा कसून शोध केला आहे. आणि शास्त्राप्रमाणे, मग ते समजण्याचा कोणताच मार्ग नव्हता, ह्या दिवसापर्यंत, कारण ते लपवले होते. आम्ही त्या चिन्हाला पाहीले आहे ज्याद्वारे ते प्रतिकात्मकरुप त्याचे दर्शविलेले आहे. परंतु हे अंत समय येईपर्यंत स्ष्ट रुपात प्रगट होणार नाही. पाहिले? आता मग शेवटच्या वेळेला आपण तिथे—तिथे असायला हवे.

78 आता, हे लक्षात ठेवा. नका…आणि आता विसरू नका, की, “तो कोणतीच गोष्ट प्रगट केल्याशिवाय करत नाही.” आणि हे सुद्धा विसरू नका कि तो हे इतक्या सामान्य

पद्धतीने करतो की, "हुशार आणि शाहाणे हे ते गमावतील." आता जर तुम्हाला ह्याची टिपण्णी करायची असेल तर हे मत्तय 11:25–26 येथे आहे. आणि लक्षात ठेवा, "तो काहीच करत नाही जोपर्यंत तो ते प्रगट करत नाही." आणि तो अशाप्रकारे प्रगट करतो की हुशार व शिकलेले लोकं ते गमावतात. लक्षात घ्या की जे काही पहिल्या पापाने केले तेव्हा जगाने वचनाऐवजी शहाणपणाची इच्छा धरली. आता, हे विसरू नका, अरे आपण हा विचार करताना किती उपकार व्यक्त करणारे कृतज्ञ असायला हवे!

79 आता ज्या गोष्टी होतात त्यावर बघा! ज्या गोष्टी त्याने आपल्याला सांगितल्या आहेत त्यावर बघा! ह्या प्रार्थनामंदिरामध्ये बघा, तुम्ही लोकं जे आपण ज्यावर वाढलो आहोत. आता मी टेप्सना विचारणार आहे...ठीक आहे, ह्याचे ध्वनिमुद्रण करा. परंतु बघा, मी हे केवळ प्रार्थनामंदिरातील लोकांना सांगणार आहे, तुम्ही जे इथे अगोदरापासून आहा. मी तुम्हांतील कोणावरही येशू ख्रिस्ताच्या नावाने ही जबाबदारी देऊ शकतो की तुम्ही, ज्या घडतील असे मी सांगितलेल्या शेकडो गोष्टींमधील एका गोष्टीवर बोट ठेवा आणि सांगा कि ती घडली नाही. मला एक वेळ सांगा जेव्हा तिथे व्यासपीठावर, जेथे कुठे पण असो, त्याने ज्या कोणत्या गोष्टीविषयी सांगितले, ती बरोबर तशीच्या तशी नव्हती. कसे? काय एका मनुष्याचे मन त्या प्रमाणे असू शकते? खरोखरच नाही.

80 जेव्हा तो प्रकाशाच्या स्वरूपात खाली तिथे त्या नदीकडे दिसला होता, तेहेत्तीस वर्षांपूर्वी, जी ह्या येणाऱ्या जूनमध्ये होतील! तुम्ही जे जुने आहात, तुम्हाला आठवण आहे की मी छोटा मुलगा होतो तेव्हापासून त्या आवाजाविषयी आणि प्रकाशाविषयी सांगत आहे. आणि लोकांनी त्यांच्या डोक्याने थोडा वेगळा विचार केला. नक्कीच, मीसुद्धा तसाच विचार केला असता, कोणीतरी म्हणाले. पण आता तुम्हाला त्याविषयी आश्चर्य करण्याची गरज नाही. आणि मंडळीने 1933 पासून आश्चर्य केले नाही, त्या दिवशी खाली त्या नदीजवळ जेथे मी शेकडो लोकांना बाप्तिस्मा देत होतो.

81 मला आठवते, त्या मारा मुलाने मला सांगितले होते, तो म्हणाला, "बिली, तू खाली त्या लोकांना बुडी मारायला नेत आहेस?" छोटा जिम मारा तिथे खाली, मला वाटते तो आता ह्यात नाहीये. मला वाटते त्याला तिथे बाहेर मारण्यात आले; कोणी एका स्त्रीने त्याला गोळी घातली. पण त्याने—त्याने मला विचारले होते "तू खाली त्या लोकांना बुडी मारायला लावण्यासाठी जात आहे का?"

82 मी म्हणालो, "नाही श्रीमान. मी त्यांना आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा देण्यासाठी जात आहे."

83 आणि तिथे एक स्त्री होती जी त्या घोळक्यामध्ये त्या लोकांबरोबर जात होती. तिने दुसऱ्या एका स्त्रीला म्हटले, ती म्हणाली..."असा त्याविषयी काहीतरी शेरा केला." ती म्हणाली, "बरे, मला बुडी मारण्यात काही हरकत नाही." म्हणाली, "ते ठीक आहे. मला हरकत नाही."

84 मी म्हणालो, "परत जा आणि पश्चाताप कर. तू येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घेण्यासाठी योग्य नाहीस." पहिले?

85 ही काही खेळण्याची गोष्ट नव्हे. हे ख्रिस्ताचे शुभवर्तमान आहे जे वचनाच्या कामगिरीने प्रगट केले गेले आहे. आता, जर तुम्ही म्हणता, "निरर्थक बडबड व मूर्खपणा," तर तुम्ही त्याला दुसऱ्या कुठेतरी ठेवले असते. परंतु, लक्षात ठेवा, वचनामध्ये ह्याची खात्री दिली आहे की तसं होईल आणि बरोबर तसंच होईल. आणि इथे हे आहे.

86 मग, खाली तिथे त्या दिवशी जेव्हा ते नदीपाशी उभे होते! आणि देवाचा दूत, ज्याविषयी मी तुम्हाला सांगितले की ते एका—एका ताऱ्याप्रमाणे किंवा काहीतरी असे

एका अंतरावर, आणि नंतर ते जवळ आले, आणि तुम्हाला सांगितले की तो मौल्यवान प्रकाश हिरवापाचूप्रमाणे दिसत होता. आणि तिथे तो आला एकदम खाली जिथे मी बाप्तिस्मा देत होतो.

87 जेव्हा, बिझनेसमॅन इथे खाली शहरामध्ये, म्हणाले, “त्याचा अर्थ काय होता?”

88 मी म्हणालो, “ते माझ्यासाठी नव्हते. ते तुमच्यासाठी होते. मी विश्वास करतो. पाहिलं? ते तुमच्यासाठी होते, जे देवाने केले, तुम्हाला समजावण्यासाठी की मी तुम्हाला सत्य सांगतो.” एक लहान मुलाकडून, जो साधारण एकवीस वर्षांचा, त्यांनी—त्यांनी ह्यावर विश्वास केला नाही, तुम्ही पाहा, कारण हे एका लहान मुलासाठी खूप जास्त आहे. आणि मग मी विचार करित होतो...

89 इथे भाऊ रॉबरसन, जे आपल्या विश्वस्तापैकी खाजिंदारांपैकी एक आहेत, मी त्यांना इथे काही मिनिटांपूर्वी बघितले. ते मला त्या दिवशी हॉस्टनबद्दल सांगत होते, ज्यावेळी हे चित्र, जे तुम्ही बघत आहात, घेतले गेले होते. आणि मी...त्या वादविवादावर, मी एका रात्री त्याबद्दल काहीतरी सांगण्यास सुरुवात केली होती. भाऊ रॉय हे एकटेच...आणखीन एका मनुष्याबरोबर, एकटेच त्या समूहामध्ये होते ज्यांच्याकडे ध्वनीमुद्रक होता. तो जुन्या पद्धतीच्या धातूच्या तारांच्या ध्वनीमुद्रकांपैकी एक होता. मी भाऊ रॉबरसन व त्यांच्या पत्नीला आता बघत आहे. मग, आणि—आणि, ह्या, सौ. रॉबरसन आजारी होत्या.

90 भाऊ रॉय हे एक अनुभवी सैनिक होते. आणि त्यांचे पाय फाटले आणि त्यांनी त्याला मृत असे बाहेर ठेवले. तो सैन्यामध्ये—मध्ये एक अधिकारी होता. आणि ज्या जर्मन 88 रणगाड्यामध्ये तो होता, त्यावर आघात झाला होता ज्याने त्याला जवळजवळ मारले, त्याच्या चिंधड्या उडल्या. त्यांनी त्याला खूप वेळेपासून मृत असे बाहेर ठेवले होते. आणि ते म्हणाले तो कधीही चालणार नाही, कारण दोन्ही पाय खूप गंभीर होते, त्यांच्यातील धमन्या वगैरे. परंतु आता ते माझ्याबरोबर एकदम बरोबर चालू शकतात.

91 परंतु हे काय होते? तेथे काहीतरी होते जे त्याने बघितले होते आणि तो हॉस्टनमध्ये गेला. आणि तो मला त्याच्या पत्नीविषयी सांगत होता. आणि त्याच्याकडे—त्याच्याकडे तार आहे; तो ती ध्वनीमुद्रकावर लावणार आहे. आणि इथे सभा संपल्यावर तो ती तुम्हा सर्वांसाठी वाजवून दाखवेल, अशी मी आशा करतो. आणि त्याच्याकडे त्या जुन्या धातूच्या तारांच्या ध्वनीमुद्रकावर, माझ्या हॉस्टनमध्ये आयोजित केलेल्या सभा आहेत. आणि नंतर त्याची पत्नी, तो म्हणाला, तिथे आली आणि त्याला हे त्या दुसऱ्या दिवसापर्यंत कळले नव्हते.

92 ती, ओह, ती खूप दुःखी होती. ती आजारी होती, आणि ती प्रार्थनेच्या रांगेमध्ये येऊ इच्छित होती. ते मला ओळखत नव्हते आणि मी त्यांना माझ्या जीवनात त्याअगोदर कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे ती तिथे खिडकीजवळ बसून बाहेर बघत होती, आणि अशी निरस, तुम्हाला माहित आहे, आणि नाराज, आणि इच्छा करत होती की तिला प्रार्थना पत्रक मिळावं कि जेणेकरून ती प्रार्थनेच्या रांगेमध्ये येऊ शकेल.

93 आणि, असे झाले की, त्या रात्री ती रांगेत आली, किंवा दुसऱ्या रात्री, किंवा असे काहीतरी. मी विश्वास करतो, त्याच रात्री. आणि ती रांगेत आली. आणि जेव्हा ती व्यासपीठावर आली, पवित्र आत्म्याने तिला सांगितले, म्हणाला, “आता तू इथली नाहीयेस. तू न्यू आल्बनी नावाच्या शहरातली आहेस.” आणि म्हणाला, “तू आज खिडकीकडे बसून बाहेर बघत होती व पूर्णपणे ह्या चिंतेत होती की प्रार्थना पत्रक मिळावे.” हे तिथे आहे, ध्वनीमुद्रकावर, खूप वर्षांपूर्वी.

94 आणि नंतर सभेच्या सुरुवातीला, जेव्हा पवित्र आत्मा तिथे होता...ती त्यांतली पहिली सभा होती. आमच्याकडे केवळ तीन हजार लोकं होती, आणि नंतर आठ हजार आले, आणि नंतर जवळजवळ तीस हजारांपर्यंत गेले. आणि मग नंतर...जेव्हा मी बोलत होतो...त्यांतील सर्वात पहिल्या सभेमध्ये, मी म्हणालो, "मला माहित नाही की मी हे का म्हणत आहे." आता हे टेप्सवर आहे. "पण, हे, आपण...हे माझ्या काळामधील महत्वाच्या घटनांमधील एक होणार आहे. ह्या सभेमध्ये काहीतरी घडणार आहे, ते कुणीही आतापर्यंत जे बघितले त्यापेक्षा महान असणार आहे."

95 आणि हे फक्त आठ किंवा नऊ, दहा रात्रीनंतर होते, जेव्हा, देवाचा दूत तीस हजार लोकांसमोर दिसला, आणि खाली आला, आणि चित्र घेतलं गेलं. ते तिथे आहे, आता ह्या वेळेला, जे जगातील एकमेव अदभुत छायाचित्रन केलेले चित्र असे वॉशिंग्टन डीसी मध्ये कॉपीराईट केले आहे.

96 नंतर मी बोललो, तुम्हाला माहित आहे, कधीकधी पारखण्याने मी म्हणतो, की, "एक व्यक्ती मृत्यूछायेखाली आहे. तेथे एक छायेचे गडद वलय आहे. ते मरणाच्या पथास आले आहेत."

97 आणि नंतर इथे वर, पूर्व पाईन्स मध्ये, किंवा मला वाटते, दक्षिण पाईन्स मध्ये, जेव्हा मी तिथे होतो, मागील सभेसाठी. एक बाई, जी तिथे बसली होती, काहीतरी तिला म्हणाले, "लवकर त्याचे छायाचित्र घे," जेव्हा मी एका बाईबरोबर बोलत होतो. आणि तिथे ते होते. मला वाटते ते एका अधिकृत अहवालामध्ये येईल, मागे येऊन गेले आहे, काही वेळेपासून. तेथे ते गडद वलय त्या स्त्रीवर टांगलेले दिसते.

98 तिने अजून एक छायाचित्र टिपले, बरोबर त्याच वेळी जेव्हा पवित्र आत्म्याने घोषणा केली. ते निघून गेले होते. म्हणाला, "तू बरी होणार आहेस. प्रभुने तुला बरे केले आहे. कर्करोग गेला आहे." आणि तिथे ते होते. ती बरी झाली होती. पहिले? तिथे तुम्ही आहा. पहिले?

99 हे फक्त हेच दाखवते कि परमेश्वर जाणतो हा दिवसाचा कोणता प्रहर आहे, आपण जाणत नाही. आपल्याला केवळ त्याची आज्ञा पाळणे आहे.

100 आता आपण ह्यावर बोलत राहू शकतो, पण आपण फक्त एका मिनिटासाठी, इथे ह्या मागच्या शिक्क्यावर बघूया, जेणेकरून आपण ह्याचे त्याबरोबर मिश्रण करू शकू. आता, फक्त एक उजळणी, काही क्षणां...काही क्षणांकरिता, पहिल्या शिक्क्यावर.

101 पहिला शिक्का फोडताना, आपल्या लक्षात येते की सैतानाकडे एक—एक उत्कृष्ट धार्मिक मनुष्य आहे. तुम्ही त्या पांढऱ्या घोडेस्वाराचे अवलोकन केले का? जो, त्यांनी, अशी विचारधारणा होती की ती...सुरुवातीच्या काळातील मंडळीचे पुढे जाणे आहे; पण, अरे, बापरे, हे वर्षानुवर्षे शिकविले जात आहे, पण हे असे असू शकत नाही. तुम्ही फक्त बघा, जेव्हा बाकी उरलेले, जेव्हा आपण त्या सर्वांना एकत्र बांधू, तेव्हा बघा हे काय आहे, पाहा. आता, आणि अजूनपर्यंत मला ठाऊक नाही की त्या उरलेल्यांमध्ये काय असणार आहे. पण मला माहित आहे की ते अगदी बरोबर असे यायला हवे, कारण हे सत्य आहे. हे सत्य आहे. ती रोममधील विविध पदक्रम असलेली मंडळी आहे, अगदी बरोबर.

102 हे लोक खरोखरच ढळक विषयापासून दहा लाख मैल दूर आहेत, जे असा विचार करतात की यहुदी लोकं ख्रिस्तविरोधक आहेत. तुम्ही कधीही असा विचार करू नका की यहुदी ख्रिस्तविरोधक आहेत. त्यांचे डोळे हेतुपुरस्कर आंधळे केले होते, कि जेणेकरून आपल्याला मध्ये येण्यासाठी मार्ग मिळावा, आपल्याला पश्चातापासाठी वेळ मिळावा.

103 पण ख्रिस्तविरोधक हा एक परराष्ट्रीय आहे. खरोखरच. तो सत्याची नक्कल करणारा एक आहे; *विरोधी*, "च्या विरुद्ध." आता, हा महान सामर्थ्याचा पुरुष, अरे, तो कसा महान बनला, व—व शेवटी त्याला सिंहासन देण्यात आले. आणि, सिंहासनावर बसवल्यानंतर त्याला मुकुट घालण्यात आला. आणि आता, तो, त्यानंतर, देवाऐवजी त्याची उपासना करण्यात आली.

104 आता, पाहा, हे येण्यापूर्वी, मला तुम्हाला काहीतरी विचारायचे आहे. तो कोण होता? पौलावर काय होते ज्याने 2 थेस्सलनीकरांस पत्रातील 2:3 मध्ये म्हटले की एक मनुष्य येईल? का त्या माणसाने युगाच्यापुढे पाहिले आणि हे बघितले? तो देवाचा संदेष्टा होता. खरोखर. का तो...

105 तो म्हणाला, "आत्मा स्पष्टपणे सांगत आहे, की पुढील काळी त्यांचे विश्वासातून पतन होईल, आणि ते फूस लावण्याला दाद देतील..." तुम्हाला माहित आहे *फूस लावणे* म्हणजे काय. मंडळीमध्ये फूस लावणारा आत्मा म्हणजे चर्चमधील सर्व धर्माधिकारी आहे. "फूस लावणारा, धर्माधिकाऱ्याचा आत्मा, सैतानाची कार्ये, मंडळीतील ढोंगी."

106 "हेकेखोर, उच्च-विचारांचा," ज्ञान, तुम्ही पाहा, चलाख, बुद्धिमान; "सुभक्तीचे बाह्य स्वरूप असलेले." (फक्त जाऊन, म्हणतात, "बरे, आम्ही ख्रिस्ति आहोत; आम्हाला चर्चला गेले पाहिजे.") "सुभक्तीचे बाह्य स्वरूप केलेले, पण प्रगटीकरण, आत्म्याचे सामर्थ्य व कार्ये ह्यांना नाकारणारे; अशांपासून दूर राहा." पाहिले? आता लक्षात घ्या, तो म्हणाला, "कारण अश्या प्रकारचे घरोघरी जाऊन भोळ्या स्त्रियांस वश करितात..." त्याचा अर्थ पवित्र आत्म्याने भरलेल्या स्त्रिया नव्हे. "भोळ्या स्त्रिया ज्या नाना प्रकारच्या वासनांनी बहकलेल्या आहेत."

107 नाना प्रकारच्या वासना! त्या प्रत्येक छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये सहभागी होतात, आणि सर्व प्रकारच्या मंडळांत; आणि त्यांना त्याच्या मर्जीप्रमाणे जगणे आवडते, आणि, तरीही, "आम्ही चर्चला जातो, आम्ही दुसऱ्यांसारखेच चांगले आहोत." नृत्ये, मौजमज्जा, केस कापणे, रंगविणे, त्यांना वाटेल तसे कपडे घालणे, आणि, तरीही, "आम्ही—आम्ही पेंटेकोस्टल्स आहोत. आम्ही—आम्ही ही दुसऱ्यासारखे चांगले आहोत." अरे! तुमची स्वतःची कृत्ये तुमची ओळख देतात. खरं आहे. लक्ष द्या.

108 पण त्याने म्हटले, "सत्याला न मानणारी व देवाने नापसंत केलेली आहेत." सत्य काय आहे? वचन, जो ख्रिस्त आहे. "सत्याविषयी."

109 "ओह, तुम्ही म्हणता...तू, तू स्त्रियांविरुध्द बोलणारा आहेस. तू स्त्रियांचा द्वेष करणारा आहेस. तू *हे* करतो, *ते* करतो."

110 नाही, महाशय. हे सत्य नाही. हा खोटेपणा आहे. मी स्त्रियांचा द्वेष करत नाही. नाही, महाशय. त्या माझ्या बहिणी आहेत, जर त्या बहिणी आहेत. पण ही गोष्ट मी...

111 प्रेम सुधारक आहे. जर ते सुधारक नसेल तर ते प्रेम नाही. आणि जर हे प्रेम असेल, तर, जर हे प्रेम असेल, ते—ते फिलिओ प्रेम आहे आणि आगापे प्रेम नाही. मी तुम्हाला ते सांगेन. त्याच्याकडे कोणाएका चांगल्या दिसणाऱ्या स्त्रीसाठी थोडंसं फिलिओ प्रेम असू शकेल पण आगापे प्रेम एक वेगळी गोष्ट आहे, ते असे प्रेम आहे जे गोष्टी सुधारते आणि परमेश्वराबरोबर अशा ठिकाणी भेट होते जेथे आम्ही अनंतामध्ये राहू शकू. पाहिले? जरी त्याचा अर्थ तसा वाटतो, मी त्या अर्थाने बोललो नाही, पण मी...तुम्हाला माहित आहे मी काय मी—मी...मी आशा करतो की तुम्ही समजाल. ठीक आहे.

112 आता, पण, लक्षात घ्या, त्याने म्हटले, “जसे यान्नेस व यांब्रेस ह्यांनी मोशेला अडविले, तसे तेही अडवतील. पण त्यांचे मूर्खपण लवकरच उघड झाले.”

113 का? जेव्हा मोशेला काहीतरी करण्याची कामगिरी सोपविण्यात आली, ते खूप पायाभूत वाटले, पण, तो शक्य तितका प्रामाणिक राहून तिथे खाली गेला. आणि देवाने त्याला म्हटले, ही घे, ही काठी घे, आणि खाली टाक आणि त्या काठीचा साप बनेल. आणि तो फारोपुढे जाऊन, जसे देवाने त्यावर काम सोपविले होते, तसाच उभा राहिला आणि ती काठी खाली टाकली, आणि तिचे सापामध्ये रुपांतर झाले.

114 आणि ह्यात काही शंका नाही, फारो म्हणाला, “एक हलकी जादूगिरीची चाल!” त्यामुळे तो जातो आणि त्याच्या यान्नेस व यांब्रेस ह्यांना आणतो. म्हणाले, “आम्हीही हे करू शकतो.” आणि त्याने त्याची काठी खाली टाकली, व त्यांचे साप झाले.

आता मोशे काय करू शकला असता?

115 ते काय होते? ते असे दाखवत होते की, देवाच्या प्रत्येक अस्सल गोष्टीसाठी, सैतानाकडे त्या गोष्टीची नक्कल करणारा एक आहे. लोकांना मुद्द्यापासून बाजूला सारण्याकरिता ते नक्कल करतात.

116 मोशेने काय केले, “बरे, मला वाटते मी काहीतरी चूक केली आहे. बरे होईल की मी परत जातो”? असे म्हणाला. तो केवळ खंबीरपणे उभा राहिला, कारण त्याने त्याच्याकडे बजावलेली कामगिरी प्रत्येक शब्दाप्रमाणे केली होती.

117 आणि त्यानंतर पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे, मोशेच्या सापाने तो दुसरा साप खाऊन टाकला. पहिले? तुम्ही कधी विचार केला का कि त्या दुसऱ्या सापाचे काय झाले असेल? तो कुठे गेला? मोशेने काठी उचलली व ती घेऊन तो बाहेर निघून गेला. त्याने तिच्याने चमत्कार केले. आणि तो साप ह्या दुसऱ्या काठीच्या मध्ये होता. पाहिले? हे किती महान आहे? नाही का? होय, महाशय.

118 आता, ख्रिस्तविरोधक हळूहळू प्रकाशात येतो. माझी इच्छा आहे की तुम्ही ह्याकडे लक्ष दयावे. आता, जेव्हा तुम्ही ऐकता...

119 आता माझ्या कॅथॉलिक मित्रांसाठी, फक्त एका मिनिटासाठी फक्त स्वस्थ बसा, आणि आता; आणि नंतर आपण बघणार आहोत प्रोटेस्टंट कुठे आहेत; आपण सर्व कुठे आहोत, पाहा.

120 लक्ष दया, पहिली मंडळी, जेव्हा कॅथॉलिक मंडळी म्हणते की ते पहिले होते, मूळ मंडळी, ते खरोखर बरोबर आहेत. ते होते. त्यांनी पेंन्टेकॉस्टच्या दिवशी सुरुवात केली. तिथेच कॅथॉलिक मंडळीची सुरुवात झाली. आता, पहिले मी ह्यावर विश्वास करत नव्हतो जोपर्यंत मी इतिहास वाचला नव्हाता आणि शोधले की ते बरोबर आहे. त्यांनी पेंन्टेकॉस्टला सुरुवात केली. परंतु ते वाहत गेले आणि तुम्ही पाहता ते कुठे आहेत.

121 आणि जर पेंन्टेकॉस्टल्स वाहत गेले, ज्या वेगाने ते आता वाहत आहेत, तर त्यांना दोन हजार वर्षे लागणार नाहीत. आतापासून शंभर वर्षांमध्ये ते कॅथॉलिक मंडळी आता आहे त्यापेक्षाही दूर असतील. हे बरोबर आहे.

122 पण लक्ष दया, कसा, हा सफेद घोडेस्वार. आता आपण केवळ छोटीशी पार्श्वभूमी तयार करत आहोत, जोपर्यंत आपण शिक्क्यावर येत नाही. आता लक्षात घ्या तो सफेद घोडेस्वार, जेव्हा तो बाहेर गेला, तो—तो तीन टप्प्यांत काय करतो. सैतान, जसे मी तुम्हाला दुसऱ्या रात्री सिद्ध करून दाखवले, हा एका त्रैक्यामध्ये आहे, अगदी देवाप्रमाणे.

पण तीन टप्प्यांत, प्रत्येक वेळी, तोच सैतान आहे. त्याच्या टप्प्यांवर लक्ष दया. पहिल्या टप्प्यात तो येतो…

123 पवित्र आत्मा उतरला आणि लोकांचे सर्वकाही सामाईक होते. आणि देवाचा आत्मा त्यांच्यावर होता. आणि प्रेषित घरोघरी जाऊन लोकांबरोबर भाकर मोडत होते. आणि तेथे महान चिन्हे व अद्भूते होती.

124 आणि—आणि नंतर, पहिली गोष्ट जी तुम्हाला माहित आहे, सैतानाने वर येण्यासाठी कुरकुर चालू केली.

125 नंतर, थोड्या वेळानंतर, हे गुलाम व भूमीवरचे गरीब, ज्यांना पवित्र आत्मा मिळाला, ते साक्ष सांगत वेगवेगळ्या ठिकाणी गेले. त्यांनी त्यांच्या धान्यांना साक्ष सांगितली.

126 आणि काही अवधीनंतर, तेथे, ओह, सैन्यातील अधिकारी आणि—आणि असे वेगवेगळे लोक येऊ लागले. ख्यातनाम व्यक्तींनी ह्या मनुष्याचे शौर्य व त्यांनी केलेली चमत्कार व चिन्हे बघितली, आणि त्यामुळे त्यांनी ख्रिस्तित्वाचा स्वीकार केला.

127 बरे, नंतर, तुम्ही पाहा, जेव्हा त्याने ख्रिस्तित्व कवटाळले, आणि ते खाली एका जागेमध्ये भेटत, एका काळोख्या, घाणेरड्या दिवाणखान्यात, आणि हातांनी टाळ्या वाजवत, आणि ओरडत, आणि अन्य भाषेमध्ये बोलत, आणि संदेश मिळत असे. का, तो कधीच, त्याच्या—त्याच्या स्पर्धकामध्ये किंवा ते जे काही, त्याच्या व्यवसायामध्ये, हे घेऊन जाऊ शकत नव्हते. "त्याने त्यावर तसा विश्वास ठेवला नसता." नक्कीच नाही. त्यामुळे, त्याला त्यावर मुलामा देणे भाग होते. त्यामुळे, त्यांनी एकत्र येण्यास सुरुवात केली आणि विचार करण्यास सुरुवात केली की, "आता आपण काहीतरी थोडेसे वेगळे तयार करूया."

128 आणि, येशू, त्वरित त्यावेळी, पहिल्या मंडळींच्या युगात, त्याने त्यांना सांगितले. इथे प्रगटीकरण दुसऱ्या अध्यायात, "निकोलाइतांच्या ह्या कृत्यांमुळे, मी तुमच्या विरुद्ध आहे."

129 *निकुलाईत* याचा अर्थ लोकांना किंवा मंडळीला "जिंकावे." दुसऱ्या शब्दांत, त्यांना सर्वजणांऐवजी एक तयार करायचा आहे, त्यांना कोणी एक पवित्र मनुष्य तयार करायचा आहे. त्यांना एका प्रकारचे…त्यांना ह्याला, ज्यांतून ते बाहेर निघाले होते त्या मूर्तिपूजेचे स्वरूप दयावयाचे होते, आणि शेवटी त्यांनी तसेच केले.

130 आता पाहा, पहिले, "निकलईत." *निकलईतांच्या* शिक्षणाला बायबलमध्ये "ख्रिस्तविरोधक" म्हटले आहे, कारण ते ख्रिस्ताच्या व प्रेषितांच्या मूळ शिकवणुकीच्या विरुद्ध होते.

131 मला ह्या मनुष्याचे नाव सांगायचे नाही. तो एक महान मनुष्य आहे. मी इथे काही वर्षांपूर्वी त्याच्या सभेमध्ये होतो. आणि त्याला माहित होते की मी तिथे आहे, कारण मी त्याच्या हातात हात हलवला होता. आणि तो म्हणाला, "ओह, तुम्हाला माहित आहे, आज काही असे आहेत ज्यांना ते पेंन्टेकॉस्टल्स म्हणतात." आणि तो म्हणाला, "ते, ते प्रेषित कृत्यांवर आधारित आहेत." आणि तो म्हणाला, "तुम्ही पाहा, प्रेषितांची कृत्ये ही मंडळीसाठी केवळ एक परांची होती."

132 तुम्ही कल्पना करू शकता का, एक मनुष्य ज्याने बायबलचा अभ्यास केला आहे, एक धाडसी वृद्ध मनुष्य, ज्याने बायबलचा अभ्यास केला आहे आणि असा शेरा करतो? त्यावरुन ते असे वाटते की…त्याने—त्याने ते पवित्र आत्म्यामध्ये होऊन बोललेले नाही.

133 कारण कोणीही सामान्य समजुतीने हे जाणेल की, प्रेषित कृत्ये हि प्रेषितांची कृत्ये नव्हती. ती पवित्र आत्म्याची कृत्ये होती जो प्रेषितांमध्ये होता. तुम्हाला माहित नाही काय आपण कश्या प्रकारे मंडळयांच्या युगामध्ये याचा नमुना बघितला? ते प्राणी तिथे बसून कोशाकडे बघत होते. मत्तय, मार्क, लूक आणि योहान तिथे उभे राहून हे बघत होते. आणि तिथे काय घडले, ज्याचा परिणाम म्हणून मत्तय, मार्क, लूक आणि योहान ह्यांनी लिहिले.

134 हेच काय ते झाड बाहेर काढते, त्याची पहिली फांदी, आणि तेच घडले. आणि जर कधी त्या झाडाने अजून एक फांदी बाहेर काढली तर ते त्याच्या मागे अजून एक प्रेषित कृत्ये लिहितील. कारण, तुम्ही पाहा, ते सारखेच जीवन त्या सारख्याच गोष्टींमध्ये असणे आहे.

135 तर आता, आज, आपण जेव्हा आपल्या संप्रदायी मंडळ्यावर बघतो, मेथोडिस्ट, बॅप्टिस्ट, प्रेसबीटेरियन, लुथरन, चर्च ऑफ क्राईस्ट मंडळी (अशी म्हटली जाणारी) आणि पेंटेकॉस्टल्स आणि अशा, आपणाला त्या कुठे सापडतात? त्या तुम्हाला सापडत नाहीत.

136 मी हे कबुल करेन की, पेंटेकॉस्टल मंडळी ह्याच्या जास्त जवळ आहे कारण ते इथे लावदिकिया मंडळीच्या युगात आहेत. त्यांच्याकडे सत्य होते व त्यांनी ते नाकारले. ते त्याबरोबर कोमट झाले, व देवाने त्यांना त्याच्या तोंडातून ओकून टाकले. हे अगदी वचनाप्रमाणे आहे.

137 तुम्ही वचनांना खोटे बोलण्यास लावू शकत नाही, पाहिले? ती नेहमी खरीच राहणार. असा प्रयत्न करू नका...एकच गोष्ट की, वचनामध्ये तुमची विचार मांडणी करण्याचा प्रयत्न करू नका...किंवा वचन तुमच्या विचाराने मांडू नका. परंतु...तुम्ही स्वतःला वचनाप्रमाणे सरळ करा. तेव्हाच तुम्ही परमेश्वराबरोबर धावता. हरकत नाही की तुम्हाला किती काही सोडावं लागेल, किंवा बाजूला सारावं लागेल, त्याबरोबर सरळ व्हा. पाहिले?

138 पाहा जेव्हा ते पहिल्यांदा पडले तेव्हा त्याने काय केले. बरे, जर देवाने पहिल्या वेळी अशी भूमिका घेतली तर दुसऱ्यांदाही त्याला तीच भूमिका घ्यावी लागेल. त्याला प्रत्येक वेळी तशीच भूमिका घ्यावी लागेल, नाहीतर त्याने पहिल्यांदाच चुकीची भूमिका घेतली आहे.

पहा देव नाही करू शकत, आपण नाशवंत लोक चुकी करू शकतो.

139 देवाचा पहिलाच निर्णय परिपूर्ण असतो. आणि ज्या मार्गाने तो काही गोष्टी करतो, त्यापेक्षा उत्तम दुसरा कोणता मार्ग असूच शकत नाही. तो त्याची सुधारणा करू शकत नाही कारण सुरुवातीपासूनच ते परिपुर्ण आहे. जर ते नसेल तर तो अनंत नाहीये. आणि जर तो अमर्याद आहे, तर मग तो सर्वज्ञानी आहे. आणि जर तो सर्वज्ञानी आहे तर तो सर्वशक्तीमान आहे. आमेन! त्याला देव असण्यासाठी तसेच असायला हवे. पाहिले? तर मग आता, तुम्ही—तुम्ही असं म्हणू शकत नाही, “त्याने जास्त ज्ञान मिळविले.” त्याने जास्त ज्ञान मिळविले नाही, तो—तो तोच सर्व ज्ञानाचे उगमस्थान आहे. पाहिले?

140 आपले इकडचे ज्ञान सैतानापासून येते. आपल्याला ते एदेन मधून मिळाले, जिथे आपण विश्वासाबरोबर ज्ञानाची अदलाबदली केली. हव्वेने हे केले.

141 आता, पहिल्यांदा त्याला ख्रिस्तविरोधक म्हटले. दुसऱ्या टप्प्यात त्याला खोटा संदेष्टा म्हटले कारण तो आत्मा लोकांमधून होऊन देहधारी झाला.

142 तुम्ही आठवा, आता त्या पांढऱ्या घोडेस्वाराकडे जेव्हा त्याने सुरुवात केली तेव्हा मुकुट नव्हता, पण नंतर त्याच्याकडे...त्याला मुकुट देण्यात आला. का? तो

सुरुवातीपासूनच निकलईतांचा आत्मा होता, आणि नंतर मनुष्यामध्ये देहधारी झाला; आणि नंतर त्याला मुकुट देण्यात आला, आणि त्याला सिंहासन मिळाले आणि मुकुट देण्यात आला. आणि नंतर त्याने एका मोठ्या काळासाठी त्याची सेवा केली, जसे आपण पाहणार आहोत जेव्हा...शिक्के फोडल्यानंतर.

143 आणि नंतर आपल्याला दिसते की त्या मोठ्या काळानंतर, सैतानाला स्वर्गातून बाहेर हाकलण्यात आले. आणि वचनाप्रमाणे तो खाली आला आणि स्वतःला उच्च स्थानी बसविले. फक्त विचार करा, स्वतःला त्या मनुष्यामध्ये उच्च स्थानी बसविले आणि एक पशु बनला. आणि त्याच्याकडे अधिकार होता, सर्वोच्च अधिकार, जसे त्याने केले, सगळे चमत्कार आणि सर्व, ते—ते, किंवा हिंसा आणि रक्तपाताचे संघर्ष आणि असे सर्वकाही जे—जे काही रोम तयार करू शकले. ठीक आहे. त्याने निर्दयी हत्या केली, रोमी शिक्षा. ओह, येथे फक्त आम्ही वचनाच्या शास्त्रलेखाची फोड येथे करु शकतो.

144 लक्षात ठेवा, येशू ख्रिस्त रोमी शिक्षेखाली मेला. देहांत शिक्षेद्वारे

145 जो संदेश माझ्या हृदयात आहे, पुढील सभेमध्ये प्रचार मारण्यासाठी, शुभ शुक्रवारच्या दुपारी, तो तीन, चार गोष्टी पूर्ण करतो, पाहा. "तेथे त्यांनी त्याला क्रूसी खिळीले." "*तेथे*," यरुशलेम ही जगातील सर्वात पवित्र, सर्वात धार्मिक जागा होती. "*त्यांनी*," जगातील सर्वात पवित्र (असायला हवे होते) लोक, यहुदी. "तेथे त्यांनी त्याला *क्रूसी* खिळले." रोमी लोकांनी निर्माण केलेली सर्वात क्रूर शिक्षा. "*त्याला* क्रूसावर खिळीले." काय? आत्तापर्यंत जगलेली सर्वश्रेष्ठ व्यक्ती. "तेथे त्यांनी त्याला क्रूसावर खिळीले." अरे, बापरे!

146 परमेश्वर मला साहाय्य करो कि मला हे बिसनेस मेनच्या गटाला असे झोके घेत सांगता यावे की त्यांना समजेल की ते कुठे उभे आहेत. ठीक आहे. आता, काही वेगळे नाही, काही ओंगळ नाही, पण केवळ हे असे हादरावे यासाठी की ते भाऊ बघू शकतील की त्यांचे मान्यवर व पवित्र पिता, आणि ज्या गोष्टी ते ह्या बिसनेस मेनच्या दैनिकामध्ये लिहीत आहेत, तो मूर्खपणा आहे. खिस्ती लोकांनी कोणत्याही मनुष्याला "पिता" असे संबोधु नये. त्यांनी हे सुरु केले. मी त्यांना होईल त्यासर्वांमध्ये मदत करण्याचा प्रयत्न केला. तुम्ही पाहा आता ह्या टेप्स् कुठे जातात. म्हणजे, माझे सर्व संपले. मला ह्या संबंधात आणखीन काही करायचे नाही. ठीक आहे. पहिल्यांदा, खिस्त आठवा.

147 प्रथम, निको...निकोलाईत, आणि निकलइतांच्या युगाने काय मागितले? त्यांनी मागितले की ह्या लोकांच्या गटांतून पळा जे हातांनी टाळ्या वाजवितात आणि लज्जास्पद दिसतात...जसे ते पेंटकॉस्टच्या दिवशी दिसत होते, मद्य प्यालेल्या मनुष्यांसारखे करत, आत्म्यामध्ये नाचत व अशा काही गोष्टी. त्यांना त्यातली एकही गोष्ट पाहिजे नव्हती. त्यांनी म्हटले ते मद्य प्यायलेले आहेत. आणि जेव्हा ख्यातनाम व्यक्तींनी...हे ऐकले! आता हे चुकवू नका. कदाचित तुम्हाला हे मूर्खपणा वाटेल, पण हेच सत्य आहे. जेव्हा मान्यवर त्यांच्यामध्ये येऊ लागले, ते ह्यासाठी झुकू शकले नाहीत.

148 देवाला काय महान बनवते, हेच कि तो इतका महान आहे की तो खाली झुकू शकतो. हेच त्याला महान बनविते. ह्यापेक्षा मोठे काहीच नाही. आणि तो इतका खाली झुकला जितके कोणीही झुकू शकत नाही. कोणीही मनुष्य इतका कधीही झुकला नाही. तो स्वर्गाचा राजा होता आणि तो या—या पृथ्वीवरील सर्वात खालच्या शहरात आला, यरीहोत. आणि तो इतका नम्र झाला की त्या शहरातील सर्वात छोटया मनुष्यालाही त्याच्याकडे खाली बघावे लागले. काय हे बरोबर आहे? जक्कय. हे बरोबर आहे. कोणत्याही मनुष्याला न द्यावे अश्या वाईट नावांनी त्याला संबोधिले, "एक जादूगर, एक भूत, बालजबुल."

जगाने त्याच्याबद्दल असाच विचार केला. सर्वात क्रूर मरणाने मेला. त्याला डोके टेकण्यास जागा नव्हती. प्रत्येक संघटनेने हाकलून लावले.

149 परंतु देवाने त्याला इतके उंच केले की स्वर्ग बघण्यास त्याला खाली डोकवे लागेल. बघा देव कसा नम्रपणात, पहिले? आणि त्याने त्याला इतके महान नाव दिले की स्वर्गातील प्रत्येक कुटुंबाला त्याच्या नावावरून नाव देण्यात आले, आणि पृथ्वीवरीलही प्रत्येक कुटुंबाला. पृथ्वीवरील प्रत्येक कुटुंबाला "येशू" असे नाव दिले. स्वर्गातील प्रत्येक कुटुंबाला "येशू" असे नाव दिले. आणि असे नाव की प्रत्येक गुढघा टेकला जाईल, आणि प्रत्येक जिव्हा कबूल करील, की तोच प्रभू आहे, इथे किंवा नरकामध्येही. नरक त्यापुढे झुकेल. सर्वकाही त्यापुढे झुकेल, पाहिले? परंतु प्रथम हा नम्रपणा होता की तो इतका महान झाला. पहिले? देवाला उंच करूदया. "जो कोणी स्वत: ला नम्र करील, देव त्याला उंच करील." पाहिले?

150 आता आपल्या लक्षात येते की हा *निकलईत* आत्मा ज्ञानाची इच्छा करत होता, जास्त चलाख. त्याला त्यामध्ये तर्कवितर्क करायचे होते आणि मंडळी त्यापुढे पडली, ज्याप्रमाणे एदेन बागेमध्ये वचनाविरुद्ध ज्ञानाद्वारे तर्कवितर्क केले गेले. आणि मंडळी त्यापुढे पतन पावली.

151 ते काय होते? आता, समजा, ही येथली मंडळी घ्या, आणि एक लोकांचा समुह घ्या, जसे आपण आहोत, जर तुम्ही खरोखर आत्म्याने भरलेले नसता. आणि आपण घेऊया, समजा...आता, आपल्या शहराच्या महापौरांच्या विरुद्ध काही नाही. मला वाटत नाही की मी त्यांना ओळखतो, श्री. बोटोर्फ. काय ते अजून महापौर आहेत, श्री. बोटोर्फ? पाहा... श्री. बोटोर्फ हे माझे चांगले मित्र आहेत, पाहा. पण, असे समजा की, शहराचे महापौर, आणि सर्व पोलीस दल, आणि—आणि सर्व सैन्य, आणि ते—ते सर्व इथे आले. तुम्हाला माहित आहे पहिली गोष्ट काय घडेल, जर त्यांच्या डोक्यात छोटी काही गोष्ट असेल, आणि त्यांनी मंडळाबरोबर आणि आजूबाजूला इथे लोकांबरोबर बोलण्यास सुरुवात केली आणि म्हणाले, "आता तुम्हाला माहित आहे का? हे थोडंसं वेगळं असायला हवं." जर तुम्ही आत्म्याने भरलेले नसाल, आणि इथे व्यासपीठामागे एक खरा आत्म्याने भरलेला मनुष्य असेल, तर पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे, तुम्ही त्यांची मागणी पूर्ण कराल. कदाचित हि पिढी नाही; कदाचित पुढची पिढी.

152 आणि अशाच प्रकारे ह्याची सुरुवात झाली आहे, पहिले? का? ते म्हणत होते, "इथे बघा, हे अधिक रास्त आहे." तुम्ही, तुम्ही ऐकले असते.

153 समजा एक मनुष्य येथे आला, जो असे म्हणू शकेल, "हे चर्च खूप छोटे आहे. आपण मोठे चर्च बांधूया. मी तुमच्यासाठी इथे एक बांधीन, त्याचा खर्च एवढे रुपये होईल, पाच लाख डॉलर्स. आणि हे तिथे दाखविले जाईल. मी हि गोष्ट प्रसारित करतो." तुम्हाला माहित आहे, जेव्हा ते असे करतात, तेव्हा ते देहामध्ये नऊ वेळा कुऱ्हाडीला धार लावतात, ही त्यांची पध्दत आहे. नंतर पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे, जर ते करील, तो त्याला जुळतील अश्या गोष्टी करील. "तुम्ही काहीच बोलू शकणार नाही, कारण भाऊ जॅक डो तिथे मागे, ते ह्या चर्चचे अर्थव्यवस्थापक आहेत." पहिले? आणि नंतर तुम्ही कोणत्यातरी विद्यालयातून एक छोटा रिकी आणता, ज्याला देवाविषयी तेवढीच माहिती आहे जेवढी इजिप्तच्या आदीवासी जमातीला रात्रीबद्दल आहे, आणि तो तिथे येऊन त्या मनुष्याच्या मागण्या पूर्ण करील, कारण तो त्याला नेहमी नवीन कार विकत घेऊन देतो, त्याला सर्वत्र फिरवितो, आणि त्याच्यासाठी *ह्या, त्या* आणि *अशा* गोष्टी विकत घेतो.

154 आता, बरोबर अशाच प्रकारे ह्याची सुरुवात झाली. बरोबर. लक्ष दया, ज्ञान आणि चलाखी! त्यांनी म्हटले, “आता इथे पाहा, काय याला अर्थ नाही का? आता ह्याने काय फरक पडतो, की...आपल्या—आपल्या स्त्रिया त्यांचे केस कसे ठेवतात?” पण बायबल म्हणते ह्याने फरक पडतो. केवळ ती एक गोष्ट घ्या, बाकी शंभर गोष्टींबरोबर. पहिले? त्याने फरक पडतो. देव म्हणतो त्याने फरक पडतो, तर त्याने फरक पडतो.

155 पण, तुम्ही पाहा, जर त्यांनी ह्या गोष्टी चालू केल्या, आणि विश्वस्त मंडळ, आणि डिकन्स् आणि सर्व, पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे, पाळक एकतर मध्ये असतो किंवा तो बाहेर असतो. बस्स. पाहा, ती लोकं आहेत ज्यांनी त्याला मतदानात निवडून दिले. ठीक आहे.

156 आता हे लक्षात घ्या की आत्मा पुढे सरकू लागला, आणि ज्या मंडळींमध्ये एवढे मान्यवर होते, आणि अशा खूप पैसा येत होता, आणि खूप पैसा होता, त्यांनी सुरुवात केली आणि काही काळानंतर त्यांनी हे ऐकले आणि त्याला भुलले, सैतानाच्या धुर्त चातुर्याने.

157 आणि हीच ती गोष्ट होती जी हव्वेने एदेन बागेमध्ये केली होती. आता तुम्ही हे ऐकले. हे बरोबर आहे. पाहा, एक शारीरिक स्त्री, आदामाची वधु, तो तिच्यापुढे, ती त्याची पत्नी अशी येण्यापूर्वी, वचनाविरुद्ध सैतानाच्या योजनेला भुलली, वचनावर तर्क केल्याने. आदाम हव्वेकडे त्याची पत्नी ह्या नात्याने राहण्याअगोदार, सैतानाने त्यावर तिथे प्रहार केला. हे बरोबर आहे. तुम्ही, *वधुरुपी झाड* ज्यावर मी प्रचार केला, तो ऐकला आहे. तो ह्याविषयी बोलतो, पाहा. ठीक आहे. आता लक्ष दया, तिथे, हव्वा तर्क केल्यामुळे भुलली, आता, त्याने, सैतानाने त्यावर तर्कवितर्क करण्याचा प्रयत्न केला.

ती म्हणाली, “पण प्रभूने म्हटले...”

158 तो म्हणाला, “ओह, तुला माहित आहे, पण खरंच देव असे करणार नाही. पाहिले? तू, तुला शहाणे व्हायचे आहे. तुला काहीतरी माहित करायचे आहे. का, तू काही नसून एक मुकं बालक आहेस. पहिले? तुला काहीतरी माहित पडले पाहिजे.” जर तो सैतान नाही! अरे, बापरे!

159 जर ते यांतील काही नसेल आधुनिकतेमध्ये, पाहा, “ओह, तो केवळ देव–वेड्या लोकांचा समूह आहे, त्यांच्यावर लक्ष देऊ नका, तुम्ही पाहा. जाऊ नका...पहिले?”

160 आता, नैसर्गिकरित्या, मनुष्य जातीतील सर्वप्रथम वधु, तिचा पती तिच्याकडे येण्याअगोदर, ती कपेंतून पडली, सैतानाचे खोटे ऐकून, देवाने तिला त्याच्या वचनामागे सुरक्षितता देऊन. जर ती त्या वचनामागे राहिली असती तर ती कधीच पडली नसती. आता हे नैसर्गिक आहे, लक्ष दया, ती नैसर्गिक स्त्री.

161 आणि शाप काय होता, खरा शाप जो परमेश्वराच्या वचनामागून बाहेर पडण्यामुळे होता?

162 आता लक्षात ठेवा, तिने त्यातले जवळजवळ अठ्ठयान्यव टक्के विश्वास केला. पण तुम्ही केवळ एक गोष्ट जाऊ दिली, पहिली? तिने त्यांतील खूप वचनांवर विश्वास ठेवला. ओह, खरोखरच. ती काही म्हणे, आणि सैतान कबूल करी कि ते बरोबर आहे. तो केवळ तुम्हाला केवळ एका कोपऱ्यात घेऊ शकला, तर त्याला तेवढेच पुरे आहे, पहिले? एकच गोष्ट तुम्हाला करावी लागते की बंदूक गोळीला *अशाप्रकारे* खूपजोर लावून ती निशाणा चुकवेल. पहिले? तेवढेच पुरे. आता, तिने त्यांतील खूप काही विश्वास केला पण तरीही तिने ते चुकविले.

163 आता, आणि हा—आणि हा ह्याचा परिणाम होता की, तिने तर्कवितर्काच्या एका छोट्या डागामुळे, वचन सोडले.

164 बरे, आता म्हणा, “स्त्रियांविषयी काय?” किंवा, “तुम्हाला तशा कोणत्या विषयावर का बोलायचे आहे?” पण त्यांतील कोणतीही छोटी गोष्ट. “काय फरक पडतो जरी हा प्रारंभीचा पुरावा असला तरी?” ह्याची त्याला काहीतरी जोड आहे! तुम्हाला कळले…

165 हे सरळ होणे जरुरीचे आहे. आपण सात मंडळ्यांच्या युगामध्ये हे जवळजवळ गृहीत धरीत आलो. पण तो समय आला आहे जेव्हा देव त्याविषयी बोलत आहे. आणि तो केवळ बोलत नाही, तर तो ते दाखवत आहे, आणि त्याचे समर्थन करतो, आणि ते सिद्ध करतो. हे बरोबर आहे. जर तो हे करत नाही, तर तो देव नाही, बस्स. देव त्याच्या वचनामागे उभा राहतो.

166 आता लक्षात घ्या. आता नैसर्गिक स्त्रीमुळे शाररिक मरण आले, कारण तिने स्वतःला ज्ञानी बनविण्यासाठी, तर्कवितर्क ऐकले, वाचनामागे राहून देवाने तिला जे सांगितले ते करण्याऐवजी ती स्वत:ला ज्ञानी करू इच्छिले. तिला ज्ञान हवे होते, आणि ती ज्ञानी होऊ इच्छित होती. आणि तिने तर्कवितर्क ऐकले आणि—आणि तिने संपुर्ण मानवी वंश गमाविला, पहिले?

167 आता, ह्या वेळेला, आत्मिक स्त्री, खिस्ताची वधु, जिने पेंटकोस्टच्या दिवशी सुरुवात केली, सुरुवातीच्या प्रेषितीय मंडलीबरोबर, तिनेही नायसिया परिषदेत तेच गमावले. ली, तुला माहित आहे हे बरोबर आहे. आणि नायसिया परिषदेमध्ये—मध्ये, जेव्हा तिने तिच्या आत्मिक जेष्ठत्वाच्या हक्कांची अदलाबदल केली, कॉन्स्टनटाइनच्या मोठ्या मंडळ्या व त्यांनी ज्या गोष्टी तिथे दिल्या त्या घेण्यासाठी, आणि तिने काही रोमन शिकवणुकींसाठी आपला ज्येष्ठत्वाचा अधिकार विकला. आता कॅथॉलिकांसाठी हे कठीण आहे. परंतु प्रोटेस्टनांनीही तेच केले आणि स्वतःला “त्या कळवंतीनीची, त्या वेश्याची” कन्या असे सादर केले, जसे इथे बायबलमध्ये आहे. हे अगदी बरोबर आहे, ते प्रत्येक जण! तिथे अपवाद नाहीत.

168 परंतु थोडेसे आहेत जे नेहमी ह्यांतून वेगळे राहिलेले आहेत, तेच वधु आहेत.

169 लक्षात घ्या, पाहा, तिचा पती तिच्याकडे येण्याअगोदर, तिने आपला ज्येष्ठत्वाचा हक्क गमावला. पाहिले? लग्नाअगोदर तिने आपले सद्गुण गमावले.

170 आणि आता तुम्ही आठवा कि तिथे, ती म्हणाली, “मी राणीप्रमाणे बसली आहे. मला कसलीही गरज नाही.” तिथे त्या लावदिकिया युगात. “मी श्रीमंत आहे आणि वस्तूंची भरपूरी आहे आणि असे सर्वकाही. आणि, ओह, पूर्ण जग माझाकडे पाहात आहे. मी एक महान पवित्र मंडळी आहे, आणि असे सर्वकाही. आम्ही *ह्या* प्रकारचे आहोत.” पूर्ण युग.

171 आणि तो म्हणाला, “तुला माहित नाही की तू नग्न, आंधळी, दीन, दरिद्री, गरीब आहेस, आणि तुला हे माहित नाही.” हि अवस्था आहे. आता, जर पवित्र आत्मा सांगतो की शेवटल्या दिवसांत अशी अवस्था असेल, तर ती तशीच असणार! त्याच्या सभोवती जाण्याचा कोणताच मार्ग नाही. हे अशाच प्रकारे आहे.

172 आता पाहा. आता, जेव्हा तिने अगोदर तिथे आपला जेष्ठत्वाचा हक्क विकला, तिचा सद्गुणांचा हक्क, वचनाचा, तिने काय केले? जेव्हा हव्वेने हे केले, तिने सृष्टीला गमावले, तिच्यामुळे संपूर्ण सृष्टी पतन पावली.

173 आता लक्षात घ्या, आणि जेव्हा मंडळीने ते केले, आत्मा आणि वचन ह्यांऐवजी तत्वे स्वीकारली, तेव्हा तिने पूर्ण व्यवस्था शापित केली. प्रत्येक संप्रदायी व्यवस्था,

जी आतापर्यंत होती किंवा होणार होती, हि तिच्याबरोबर शापित झाली, कारण दुसरा पर्याय नाही.

174 जेव्हा तुम्ही, काहीतरी समजण्यासाठी, मनुष्यांचा एक समूह घेता, एकाचे डोके *असे* आहे, आणि एकाचे डोके *तसे* आहे, आणि एकाचे डोके *असे* आहे. आणि ते सर्व गोष्टी एकत्र करतात व त्यांना हलवितात, आणि जेव्हा त्यातून काही बाहेर निघते, तेच तुम्हाला मिळणार.

175 अगदी तसेच त्यांनी नायसियन परिषदेत केले. अगदी तसेच मेथोडिस्ट, प्रेस्बिटेरियन, ख्रिस्ताची मंडळी, आणि बाकीचे सर्व करतात. आणि कोणीही मनुष्य, ह्याचा काही परिणाम नाही की देव त्याला काय प्रगट करतो, तुम्हाला तिथे त्याच प्रकारे शिकवावे लागेल जसे त्यांचे संप्रदाय, त्यांची ओळखपत्रे—ओळखपत्रे म्हणतात, नाहीतर ते तुम्हाला बाहेर फेकतील. आता, मला सांगू नका. मी तिथे होतो, पाहा, आणि मला हे माहीत आहे.

176 आणि अगदी हेच ते आहे जे घडले आहे आणि त्यामुळे संपूर्ण व्यवस्था शापित आहे. ह्यात काही आश्चर्य नाही की देवदूताने म्हटले, "तिच्यांतून बाहेर निघा, माझ्या लोकांनो, की तुम्ही तिच्या पिडांचे वाटेकरी नसावे." कारण तिला...ती शापित आहे, आणि तिला देवाच्या क्रोधाच्या शापामुळे दुःख सोसावे करावा लागणार आहे, कारण तिने आपले सद्गुण व हक्क विकले. पाहिले? परंतु...अरे, बापरे!

177 पण, लक्षात ठेवा. हि सर्व परिस्थिती पाहूनसुद्धा देवाने योएल 2:25 मध्ये वचन दिले, जर तुम्हाला ह्याचे टिप्पणी करायची असेल, "शेवटल्या दिवसांत..."

178 जेव्हा तो म्हणाला, "जे झुंडीने येणाऱ्या टोळांनी सोडले, ते चाटून खाणाऱ्या टोळांनी खाल्ले; जे चाटून खाणाऱ्या टोळांनी सोडले, ते—ते अधाशी टोळांनी खाल्ले; जे अधाशी टोळांनी खाल्ले..." असे पुढे, टोळांमागे टोळ आले आणि त्या मंडळीला खाल्ले जोपर्यंत शेवटी बुंध्याखेरीज काहीच उरले नाही. बघा! जे रोमी लोकांनी सोडले, ते लुथर लोकांनी खाल्ले; जे लुथर लोकांनी सोडले, ते मेथोडिस्ट लोकांनी खाल्ले; आणि जे मेथोडिस्ट लोकांनी सोडले, ते पेंटेकॉस्टल लोकांनी खाल्ले; पाहा जोपर्यंत ती केवळ झाडाच्या खोडाचा बुंधा अशी राहिली.

179 आणि तुम्हाला हे माहित आहे काय? तुम्ही ते टोळ घ्या, अधाशी टोळ आणि चाटून खाणारे टोळ, आणि असे सर्व, आणि त्यांना पुस्तकामध्ये शोधा. तो वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये तोच टोळ आहे.

180 तुमचा मुद्दा धरून ठेवा. आणि असेच हे शिक्के आहेत! हा एकच टोळ आहे. तुम्ही हे बघाल जेव्हा आपण हे बाहेर काढणार आहोत, त्यामुळे मी तुम्हाला आता सांगतो. तो प्रत्येक वेळी एक सारखाच टोळ आहे. ते चार टोळ; इथे चार आहेत. आणि तिथे ते आहेत, ते एकच आहेत. हा तो एकच आत्मा आहे. एकाने जे सोडले, ते दुसऱ्याने खाल्ले; आणि *जे* ह्याने सोडले, ते त्याने खाल्ले; अशा प्रकारे, जोपर्यंत त्यांनी ते बुंध्यापर्यंत आणले.

181 पण योएल म्हणाला, "मी पुनर्रचना करेन, असे परमेश्वर म्हणतो, जे एवढ्या वर्षांत टोळांनी खाल्ले आहे."

182 हे काय आहे? तो हे कसे करणार आहे; जर ह्याची सुरुवात, ख्रिस्ताच्या शिकवणुकीविरुद्ध, वचनाऐवजी दुसरी शिकवण घेऊन, खिस्तविरोधक अशी झाली? आणि अनेक वर्षांमध्ये, सुधारकांनी ह्यावर जोर दिला होता, जसे बायबल म्हणते.

183 "पण शेवटल्या दिवसांत, वाणींच्या वेळी..." प्रगटीकरण 10:1-7, तो म्हणाला, "शेवटल्या दिवसांत जेव्हा सातवा दूत कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल तेव्हा देवाची सर्व गुजे पूर्ण होतील." मलाखी 4, म्हणते की "तो एलियाला पाठविल पृथ्वीवर, भट्टीसारखा तप्त दिवस येण्याअगोदर आणि तो पुन:स्थापना करील आणि मुलांना बापांच्या विश्वासाकडे परत आणिल." तो मूळ प्रेषितिय पेन्तिकोसत्ल विश्वास पुन्हा स्थापित करण्याचे वचन दिले आहे आता हे एवढे सरळ आहे जसे वचनात सांगितले आहे आता ह्या विषयी वचन दिले आहे आणि जर आपण शेवटल्या दिवसांत आहोत तर काहीतरी घडायला हवे पाहिले आणि ते घडत आहे आणि आपण ते बघत आहोत.

184 सैतानाचे त्रैक्य लक्षात घ्या. तोच व्यक्ती येतो; फक्त एकपासून दुसरे असे रूप घेऊन. तशाच प्रकारे त्या किड्यांनी केले, ते टोळ, एकपासून दुसरे, अगदी बरोबर. निकलईत, "आत्मिक खिस्तविरोधक." पोप, "खोटा संदेष्टा." "पशु," सैतान स्वतः, त्या रुपात. तो हे करू शकत नाही...

185 आता, जेव्हा तुम्हाला हे कळत आहे, तुम्ही हे तुमच्या मनावर ठेवा. तुम्ही त्या घोडेस्वारांना तोपर्यंत निघताना पाहणार आहात. पाहा, मी एक चित्र तुमच्यापुढे ठेवत आहे. जर मी हे काळ्या फलकावर काढले असते, तर तुम्हाला अधिक चांगले समजले असते. पाहा, मी बघत आहे.

186 पहिले, आता. तुम्ही हे लक्षात ठेवा. पहिली गोष्ट कि तो एक, तो एक "खिस्तविरोधक आत्मा" आहे. योहानाने असे म्हटले. "मुलांनो, खिस्तविरोधकाचा आत्मा आज्ञाभंजकाच्या मुलांमध्ये अगोदरपासूनच कार्य करत आहे." पाहा, त्या गोष्टीची सुरुवात झाली होती. आणि नंतर ती त्यानंतरच्या मंडळी युगात "एक बोलणे" असे गणण्यात आली. आणि, त्यानंतरच्या मंडळी युगात, ती "एक शिकवण" बनली. आणि त्यानंतरच्या मंडळी युगात, तिला "मुकुटमंडीत" केले. आता हे कुठेही तुम्ही वाचू शकतील असे आणि एवढे सरळ नाही का? पहिले? पाहा तिथे तो आला.

187 आता, प्रथम, त्याला संबोधिले गेले (काय?) "ख्रिस्तविरोधक आत्मा," कारण तो वचना विरुद्ध होता. त्यानेच सुरुवात झाली. अगदी हेच ह्या संपूर्ण गोष्टीने केले, देवाच्या वचनापासून फिरणे. अशासाठी नव्हे कि हव्वेने कदाचित एखाद्या दिवशी काईनाला धापट मारली असेल. पाहिले? त्यामुळे हे घडले नाही. पहिली गोष्ट ज्यामुळे सर्व घडले ती ही होती की ती वचनापासून फिरली. ती वचनापासून फिरली. आणि पहिली गोष्ट जी ती वेश्येगिरी जिवंत देवाची मंडळी, ख्रिस्ताची वधू, ह्यांमध्ये सुरु केली, ती वचनापासून फिरली आणि देवाच्या वचनापासून फिरुन तिने रोमी शिकवण स्वीकारली. प्रत्येक संस्थेला काय झाले? त्यांने पण तीच गोष्ट केली.

188 आता, असे वचन दिले की शेवटल्या दिवसांत तो पुनः स्थापनेसाठी एक मार्ग तयार करील. देवाचे वचन पृथ्वीवर पडेल, जसे त्याने प्रारंभी केले, आणि, ओह, पुन:स्थापना करील (काय?) ज्याने सुरुवात झाली. "वचनाच्या विरुद्ध." आणि ह्या व्यक्तीने काय केले पाहिजे, जेव्हा तो देवाच्या आत्म्याने अभिषिक्त होऊन येतो? तो केवळ, "पुत्रांचा विश्वास वडिलांकडे आणतो." त्याचप्रकारे तो पुनःस्थापना करतो. आणि तुम्हाला हेच वचन जे इथे आहे, त्याच जागी आढळेल, हेच तो करणार आहे.

189 येशूने म्हटले, "जर कोणी मनुष्य माझ्यामागे येतो! आणि जो कोणी माझ्यावर विश्वास ठेवतो, जी कार्ये मी करतो ती तोही करील." आणि जेव्हा त्यांनी त्याला काही गोष्टी करण्यास सांगितले, तेव्हा तो म्हणाला, "मी तेच करतो जे मला पिता दाखवितो. मी काहीच करत नाही जोपर्यंत मी ते प्रथम बघत नाही. जे काही पिता करताना मी पाहतो,

तेच मी करतो. येथवर जसे पिता करतो, तसेच मीही करतो." पाहिले? तुम्ही हे पाहत नाही काय? हे एखादे वर्तमानपत्र वाचण्यासारखे का वाटत आहे. पाहिले?

आता आता नंतर प्रथम तो, एक "ख्रिस्तविरोधक" बनला.

190 आता, तो केवळ आत्म्यामध्ये ख्रिस्तविरोधक होऊ शकत नव्हता. नंतर, तो ख्रिस्तविरोधक बनला, आणि त्या आत्म्याने एक मनुष्य घेऊन त्याला त्याच गोष्टी शिकविल्या ज्या तो खिस्तविरोधक आत्मा करत होता, आणि तो मनुष्य, "खोटा संदेष्टा" बनला, त्या खिस्तविरोधक आत्म्यासाठी. आता एक मनुष्य जो एखादया संस्थेमध्ये आहे त्याबद्दल काय? तुम्ही पाहून घ्या. मला माहित नाही तुम्ही ह्याविषयी काय विचार करता. ठीक आहे.

191 आता, शेवटी तो "एक पशु" बनला. आता, थांबा, आणि आपण थोड्या वेळात त्याकडे येऊ, पाहा. ठीक आहे.

192 आता सैतानाचे त्रैक्य ह्या प्रकारे असताना; प्रत्येक वेळी, सैतान. सैतान, "खिस्तविरोधक आत्मा." ख्रिस्तविरोधक आत्म्याचे रूपांतर, "खोटा संदेष्टा." नंतर, "तो पशु" बनला. पहिले? केव्हा…तो एक दुष्टात्मा नव्हता जो त्या ख्रिस्तविरोधकामध्ये होता; पण जेव्हा सैतान स्वतः हाकलला गेला, तो खाली येऊन ती जागा घेतली जिथे दुष्टात्मा होता. नंतर, नंतर, सैतान, मनुष्यामध्ये देहधारी होतो. हि केवळ पुनरावृत्ती होत आहे.

193 यहुदा इस्कार्योत तोच होता. आणि त्याने काय केले? जे खिस्ताविरोधी होते त्यांतील तो एक होता काय? तो तर खजिनदार होता, त्याच्याबरोबर चालला. खरोखरच, अगदी त्यांच्याबरोबर चालत होता. तिथे गेला आणि भुते काढली, आणि अगदी बरोबर तेच केले जे त्यांनी केले.

194 आणि खिस्त देवाचे रूप होता; देव हाडामांसाचा बनलेला, इमानुएल. आणि यहुदा हा नाशाचा पुत्र होता. आणि येशू देवाचा पुत्र होता. देवाचे रूप; सैतानाचे रूप.

195 काही लोकांना त्यावेळी केवळ तीन क्रूस दिसतात. तिथे चार होते. गुलगुथा ह्या ठिकाणी तीन होते, जे आपण पाहातो. येशू मधोमध, एक चोर त्याच्या डावीकडे, एक चोर त्याच्या उजवीकडे.

196 आणि पाहा. एक चोर दुसऱ्याला म्हणाला, किंवा येशूला म्हणाला, "जर…" आता, तुम्हाला माहित आहे की तो वचन आहे. पण, "जर तू वचन असता, तू स्वतःला वाचविले नसते काय? तू ह्याविषयी काही केले नसते काय?"

197 हीच गोष्ट आज आहे. तुम्ही ह्या जुन्या सैतानांना येऊन म्हणताना ऐकले नाही काय, "जर तुम्ही दैवी आरोग्यावर विश्वास करता, *इथे* कोणाचेतरी डोळे आहेत, तुम्ही त्यांचे डोळे उघडणार नाही काय?" "मला आंधळे कर! मला आंधळे कर!" हा तोच जुना सैतान आहे. पाहिले? "क्रुसावरून खाली ये, आम्ही तुझ्यावर विश्वास ठेवू." "जर तू देवाचा पुत्र असशील, ह्या धोंड्यांची भाकर कर." तोच सैतान.

198 तुम्ही केवळ चालते व्हा, पाहा. नाही, येशूनेही तसेच केले. त्याने त्यापैकी एकासाठीही बावळटपणा केला नाही.

199 त्याच्या हातावर पट्टी ठेवली…त्याच्या मौल्यवान डोळ्यांवर, *अश्या* प्रकारे. आणि त्यांनी काठी घेऊन त्याच्या डोक्यावर मारली. म्हणाले, "आम्हाला सांग! जर तू संदेष्टा आहेस तर आता आम्हाला सांग तुला कोणी मारले." त्यांनी काठी एकमेकांकडे दिली. "आता आम्हाला सांग तुला कोणी मारले, आणि आम्ही विश्वास करू की तू संदेष्टा आहेस." त्याने आपले तोंड उघडले नाही. तो केवळ तिथे बसून राहिला. पाहिले? तो

बावळटपणा करत नाही. तो जसे पिता म्हणतो तसेच करतो, तुम्ही पाहा. पाहिले? त्यांना हे करू दे. त्यांची वेळ येत आहे. चिंता करू नको. होय महाशय. आता, त्यांनी त्याच्या वस्त्रांना स्पर्श केला, त्यांना काहीच शक्ती जाणवली नाही.

200 पण एक गरीब स्त्री, जिला गरज होती, तिने फक्त त्याच्या वस्त्राला स्पर्श केला. तो मागे फिरला व म्हणाला, “मला कोणी स्पर्श केला?” उ–हु. हे काय? एक वेगळा स्पर्श. हे ह्यावर अवलंबून आहे, तुम्ही त्याला कसा स्पर्श करता, तुम्ही पाहा, पाहा, तुम्ही काय विश्वास करता. आता, तुम्ही पाहिले?

201 आता, सैतान स्वतःला ख्रिस्तविरोधकाच्या अवतारातून खोटा संदेष्टा दाखविणार आहे. आणि यहूदी लोकांच्या दिवसात, “ख्रिस्तविरोधक” हे सुरुवातीच्या मंडळीत होते. अंधार युगात, तो जगाला, “खोटा संदेष्टा” असा प्रकट झाला. तिला पाहा तेथे “अमंगळपणाच्या प्यालासह”? आता, हे तर मंडळी युगासाठी.

202 परंतु मंडळी आपल्या घरी जाण्याच्या वेळेनंतर, तो पशू बनेल. तो सैतानी अवतार धारण करील. तो स्वतः अग्णीवर्ण अजगर असेल. बापरे! माझे म्हणणे तुम्ही समजता ना? तो आपल्या लोकांत मग अवतरेल. त्याचे लोक त्याच्या सामर्थ्याने बांधलेले आहेत. या सगळ्या खोट्या संदेष्ट्याने भविष्यवाणी केल्या आहेत. “नाश पावण्यासाठी देव त्यांच्यामध्ये भ्रांतीचे कार्य पाठवील, असे की ते खोटेपणावर विश्वास ठेवतील.” “वचन नाकारले जाईल व सुभक्तीचे केवळ बाह्य स्वरुप असेल.”

203 देव कार्यरत आहे, आपल्या जागी, त्रैक्यात. न्यायीपण; पवित्रीकरण; आणि स्वत:आपल्या लोकांमध्ये तो उतरेल, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याद्वारे.

204 तसेच, सैतानही ख्रिस्ताच्या मागे, छाया स्वरुप दर्शवितो. हो, आता पाहा, सैतान स्वतःला अवतारात प्रकट करतो...आता लक्ष द्या. सैतान...

205 जेव्हा येशू स्वतःला आपल्या लोकांत अवतरतो, तेव्हा ख्रिस्तामध्ये असलेले जीवन हे त्या व्यक्तिमध्ये उतरते.

206 द्राक्षवेला जीवन काढून ते जर दुधी भोपळ्याच्या वेलात घातले, तर काय होईल? ते पुढे होऊन भोपळा उपजणार नाही, ते द्राक्षेच देतील. पीच नावाच्या झाडातून जीवन काढून ते जर पेअरच्या झाडात घातले, तर काय होईल? ते पेअर उपजतील काय? नाही तर पेअर धारण करतील. जीवन दर्शवीते ते काय आहे, म्हणून पाहा?

207 जेव्हा तुम्ही म्हणता, लोक म्हणताना ऐका त्यांना पवित्र आत्मा मिळाला आहे, आणि हे वचन नाकारतात, तर तेथे काहीतरी चुकत आहे. पवित्र आत्म्यानेच ते वचन लिहीले आहे.

208 आणि येशूने असे म्हटले आहे, “जर कोणा माणसांमध्ये माझा आत्मा असेल, तर तो माझी कृत्ये करील.” तुम्हाला ते वाचावयाचे आहे काय? तुम्हाला ते लिहून घ्यायचे आहे काय? ते संत योहान 14:12. होय. ठीक आहे. “जो माझ्यावर विश्वास ठेवतो, जी कृत्ये मी करितो ती तोही करील; किंबहूना त्याहूनही अधिक करील, कारण मी पित्याकडे जातो.” पाहाल? नंतर त्याने स्वतःला पवित्र केले व शुध्द केले यासाठी की, त्याने देवासमोर उभे राहावे. त्या शाईचा थेंब तेथे पडला, आणि त्याला पलिकडील भगदाडातून घेतले. पाहीले?

209 आता पाहा. सैतानाला, जेव्हा तो स्वतःला आपल्या लोकांत प्रकट करतो, तेव्हा ते तीच कार्ये करीतात जी तो करितो. तुम्ही पाहत नाही काय? त्याने काय केले? त्या निष्कलंक स्त्रीला, फसविण्यासाठी तो आला. आणि तेच काय ते तो दुष्ट आत्मा करत

आहे, त्या जागी येऊन म्हणतो...लहान पाळक कोठेतरी सुरुवात करीत आहे, त्याला येऊन म्हणतो, “ओह, तुम्ही जर आमच्याबरोबर सामील झाले तर!” ओह! ओह! तसेच दुष्टाचे काम. आता, हेच सत्य आहे! आणि जेव्हा सैतान त्याच्या मंडळीमध्ये अवतरतो, दुष्ट बनण्यासाठी, तर हे ते आहेत, ज्यांनी ठार मारणे व हिंसा करणे आरंभतात आणि तशासारखे इतर गोष्टी. कारण, सैतान हा ठार मारणारा आहे, आणि प्रारंभापासूनच तो लबाड आहे. आणि एक...पाहा, ठीक आहे.

210 सैतान काय करतो, जेव्हा तो लोकांमध्ये अवतरतो? तेव्हा तो काय करतो? हे त्याचे कर्तव्य आहे की, त्याने धुर्त असावे. तो धुर्त आहे. तुम्ही पवित्र शास्त्रात शोधा आणि मला दाखवा की कुठे देवाने कधी बुध्दीमान व्यक्तींशी संबंध ठेवला आहे, शोधकरुन पाहा. आणि जाणा की नेहमीच हे बुध्दीमानच दुरात्म्याने ताब्यात घेतलेले आहेत की, नाहीत? हा फार मोठा शब्द आहे, परंतु सत्य आहे. मी तुम्हाला आव्हान करतो की तुम्ही हाबेलापासून काईनापर्यंतची चौदा, पिढ्यांची संतती पाहा व अवलोकन करा आणि पाहा की, कोण हे चलाख व्यक्तींच्या बाजूने आहेत आणि कोण नम्र जनांच्या बाजूने आहेत. आहा.

211 येशूने अशाप्रकारचे लोक का निवडले नाहीत? त्याला मासेमारी करणारे कोळी सापडले आणि अशी मनुष्ये ज्यांना स्वतःच्या नावाची स्वाक्षरीही करता येत नव्हती, अशांना त्याने मंडळीच्या मुख्य जागी बसविले. हे सत्य आहे. ज्ञान हे काहीच नाही, ते—ते ख्रिस्ताच्याविरुध्द आहे. जगीक ज्ञान हे कायम ख्रिस्ताविरुध्द असते. येशूने कधीच असे सांगितले नाही की, तुम्ही जाऊन सेमेनरीस बांधा, त्यानेही ते बांधले नाही व त्याच्याकडे काही बायबलच्या शिक्षणसंस्था नव्हत्या. तो म्हणाला, “वचन प्रचार करा! सुवार्ता प्रचार करा!” आणि मग जर त्याने म्हटले, “विश्वास ठेवणाऱ्याबरोबर ही चिन्हे असत जातील,” पाहा, तुमच्याकडे ते असले पाहीजे. दुसऱ्या शब्दात तो म्हणाला, “जा व सर्व राष्ट्रांना देवाच्या सामर्थ्याचे प्रमाण दर्शवून दाखवा.”

212 आता पाहा, सैतानाचे काम हे आहे की, देवाचे वचन त्याने बिघडवून विकृत करावे, ज्ञानाच्या तर्काद्वारे. बापरे! मग त्याच्याशी कारणीभूत असलेल्याची तो किर्ती करुन मुळ वचन नाकारते...

213 तुम्ही—तुम्ही—तुम्ही माझ्याबरोबर थोडसं सोसून, हे समजून घ्याल का? कारण, हे तुम्ही चुकवू नये, असे मला वाटते. मला तुम्हाला त्याची छाया दाखवू दे, यासाठी की तुम्ही ते छायेत आणि वचनात पाहू शकाल, आणि सर्वकाही. तुम्ही—तुम्ही...तुम्ही गोंधळात राहून निघून जाऊ शकत नाही.

214 जुन्या करारात, जेव्हा एक मनुष्य गुलाम म्हणून विकला जाई; तेथे योबेलचे वर्ष येत असे, प्रत्येक पन्नास वर्षी. एकोणपन्नासाव्या वर्षी, आणि मग योबेल वर्ष. आणि जेव्हा गुलाम ते ऐकत, आणि त्याला मुक्त होऊन जावयास वाटे, अशा—अशा स्थितीत त्याला मुक्त होण्यापासून कोणी रोकत नसे. तो त्याचा फावडा फेके, व म्हणे, “खूप झाले,” चल आता घरी. तुतारी वाजलेली असे. हे सत्य आहे.

215 परंतु त्याला जर जाण्यास वाटत नाही, आणि तो आपल्या मालकाजवळ गुलाम म्हणून जर समाधानी असेल, तर–तर त्याला मंदिरात घेऊन जाई व आरी घेत...तुम्हाला माहीत आहे आरी काय आहे. आणि ते त्याच्या कानाला आरीने टोचत, आणि ती खूण असे, की, त्याने कधीच परत जाऊ नये. हे खरे आहे ना? त्याला आपल्या मालकाची सेवा करावी लागे सर्व स्थितीत. मी त्याची काळजी करीत नाही की, त्यानंतर कितीही का योबेलची तुतारी वाजेना, आणि काहीही का होवेना. त्याने त्याचा संपूर्णतः ज्येष्ठत्वाचा अधिकार विकून टाकला आहे, मुक्त होण्यापासून.

216 आणि जेव्हा मनुष्य शुभवर्तमानाचे सत्य तुडवितो, सैतान त्याच्या (कोठे?) कानाला खूण करतो. आणि त्याला बहिरे करतो यासाठी की, त्याने यापुढे कधीही सत्य ऐकू नये, आणि त्याचा नाश होतो. तो ज्या गटात असतो त्यात राहतो, जर त्याने सत्य ऐकले नाही. नाही.

217 "तुम्ही सत्य जाणाल व सत्यच तुम्हाला बंधमुक्त करील." पाहा, सत्यच बंधमुक्त करते.

218 जे देवाचे आहेत, ते आल्यावर देव त्यांना खूण देतो. देव आपले आहेत, त्यांना खूण देतो, त्यांच्याकडून त्याचे अभिवचनयुक्त वचन प्रकट करतो. हे अगदी बरोबर आहे, संत योहान 14:12. आणि अजून एक जर तुम्हाला लिहायचे असेल; मार्क16. येशूने म्हटले, "विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील."

219 आता काही वेळेलाही ते पाहूया. काय तो विनोद करीत होता काय? [मंडळी म्हणते, "नाही."—सम्पा.] त्याचा अर्थ फक्त...त्याचा अर्थ फक्त प्रेषित होते काय, जसे काही जण म्हणतात? ["नाही."]

220 पाहा, त्याची पार्श्वभूमी वाचा. "तुम्ही जा..." कुठे? [मंडळी म्हणते, "सर्व जगामध्ये."—सम्पा.] "सर्व जगामध्ये." "सुवार्ता सांगा..." कोणाला? ["साऱ्या सृष्टीला."] "साऱ्या सृष्टीला." अजूनपर्यंत एक तृतीयांश लोकांपर्यंत सुध्दा ह्या शुभवर्तमानाचा प्रसार झाला नाहीए. "ही चिन्हे संपूर्ण जगात असत जातील, प्रत्येक सृष्टी जेथे जेथे हे शुभवर्तमान गाजविले जाईल. विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील," ते फक्त मुठभरासाठी नाही.

221 जसे एकेवेळी एक व्यक्ती म्हणत होता, "देवाने फक्त बारा प्रेषितांनाच आरोग्य वरदान दिले होते..." ओह! जेव्हा त्या व्यक्तिने उठून हे म्हटले होते, त्यांतील काही बंधुजन येथे बसलेले होते. पाहा, पाहा, थोड्या वेळेतच, त्याने पुरेसे असे सांगुन टाकले.

222 म्हणून ध्यान द्या. "संपूर्ण जगात, संपूर्ण सृष्टीला, ही चिन्हे असत जातील."

223 सैतानाची अविश्वासाची खूण धारण करु नका. आता, आज रात्री तो ती खूण तुम्हाला लावू इच्छितो. तो दरवाजाच्या मदतीने तुमचे कान टोचेल, आणि तुम्ही बाहेर निघून जाल व म्हणाल, "मला त्याविषयी काही माहीत नाही."

224 तुम्ही घरी जा व वचनाचे मनन करा, आणि मग प्रामाणिक राहा, आणि प्रार्थना करा; कारण, सर्वकाही एकदम—एकदम पूर्णरित्या वचनाप्रमाणेच या वेळेत होत आहे, या वेळेतला एक पवित्र काळ. याला वर्षापासून, सिध्द करण्यात आले आहे. आणि ही ती वेळ व निश्चित काळ आहे.

225 आणि आता त्या सैतानाला तुमच्या कानांना टोचू देऊ नका, त्याची ती अविश्वासाची खूण. पाहा? याचे कारण हेच की तो सुरुवातीपासूनच अविश्वास करणारा होता. त्याने संशय घेतला. ठीक आहे. ओह...त्या सैतानाला हे वचन घेऊन देऊ नका व त्याचे ज्ञान पणाला लावू देऊ नका, आणि त्याच्या अर्थाला ओढू ताणू नका आणि—आणि त्याच्या ज्ञानाने व तर्कवितर्क शक्तिने ते विकृत करु नका. तुम्ही फक्त नम्र राहा, व म्हणा, "देवाने असे म्हटले आहे, आणि ते तसेच आहे." आता ओह...

226 आम्हाला आता उशीर होत आहे, म्हणून आम्ही येथे थांबणे योग्य ठरेल आणि येथून पुढे सुरु करु.

227 आता आम्ही दुसऱ्या शिक्क्याकडे जाऊया. वधला गेलेला व पुनरुत्थित कोकरा जेव्हा तो शिक्का उघडतो, आणि दुसरा प्राणी जो वासरासारखा आहे, तो म्हणाला, "ये

आणि पाहा या शिक्क्याचे रहस्य." पाहा? आता आम्हाला समजते की, कोकराच, प्रत्येक शिक्के खोलतो हे स्मरणात ठेवा. आणि तो दुसरा प्राणी...

228 आता जर तुम्ही सात मंडळीच्या युगांना क्रमाने जर मनन करीत ह्या प्राण्यांना पाहीले, तर...पहिला हा सिंह होता, नंतरचा वासरासारखा, किंवा एक—एक...बैल, किंवा त्यासारखा. तुम्ही पाहा.

229 आणि त्या प्राण्याने म्हटले, "ये आणि पाहा," आता, जेव्हा कोकरा शिक्का फोडतो. आणि मग तो पाहण्यास जातो. आणि जेव्हा तो आत चालत जातो, काय घडते. आता पाहूया आम्हाला काय सापडते? "ये आणि पाहा." तेथे एक रहस्य शिक्क्याने बंद होते, ते जवळजवळ दोन हजार वर्षापासून होते. पाहुया आता ते काय आहे.

230 आता आम्ही येथे पाहतो (काय?) तो लाल रंगाचा घोडा पुढे निघून जातो. आता, माझी समज याविषयी, त्याच्या हातात असलेली ती मोठी तरवार...आता आम्ही यातील तीन गोष्टीकडे पाहूया. पुढच्या पंधरा–वीस मिनिटांसाठी. आपण तेथे वाचूया आणि पाहा तो येथे काय म्हणत आहे. "आणि तेव्हा दुसरा घोडा पुढे चालला..." 4थे वचन.

> ...*तेव्हा दुसरा घोडा पुढे चालला, तो अग्नीवर्ण होता,* (पहिला हा पांढरा होता.); *त्यावर बसलेल्या पुरुषाकडे पृथ्वीची शांती हरण करण्याचे...आणि लोकांकडून एकमेकांचा वध करविण्याचे काम सोपविले होते: त्याला मोठी तरवार दिलेली होती.*

231 आता, येथे हे चिन्हात्मक आहे, आणि आम्ही त्याकडे फार जवळून पाहूया. परंतु, माझ्या समजूतीप्रमाणे, जे मला आतापर्यंत उत्तम कळले आहे, तुम्ही पाहा, येशूने याविषयी मत्तय 24मध्ये भविष्य वर्तविले आहे. समजले? तो म्हणाला, "तुम्ही लढायांविषयी ऐकाल व लढायांच्या आवया ऐकाल आणि फक्त लढाया आणि आवया, लढाया आणि लढाया. आणि परंतु" म्हणाला, "परंतु तेवढ्यात शेवट होत नाही. पाहा, कारण वेळ अजून आला नाही." पाहा, त्यांनी येशूला तीन प्रश्न विचारले. समजले? आणि त्याने त्या तिघांचे उत्तर दिले.

232 येथे येऊन आमचे बंधुजन गुंतागुंतीमध्ये सापडतात, ते त्याविषयी सांगण्याचा प्रयत्न करतात...जे एडवानटिस्ट बंधुजन हे त्यांचा सातव्या दिवसाशी व मागील गोष्टींबरोबर तुलना करतात..."बालकांना जन्म देणारे व स्तन पाजणाऱ्या स्त्रीया असतील त्यांचे दुःख फारच होणार कारण शब्बाथ दिवसामुळे वेशीबंद राहतील," आणि अशाप्रकारे बोलतात. देवा! ह्या प्रश्नाशी त्याचा काही एक संबंधही नाहीए. पाहा, काहीही संबंध नाहीए. समजते?

233 त्यांनी विचारले होते, त्यावर तो उत्तर देत होता. परंतु त्याने—त्याने—त्याने ते पूर्णरितीने शेवटच्या दिवसांसाठी ते लागू केले नव्हते. त्याने म्हटले, "तू ऐकशील..." आता आम्ही येथे यावर अभ्यास करीत आहोत. आम्ही अधिक काही गोष्टींचा अभ्यास पुढील काही रात्री करणार आहोत. पाहा, त्याने म्हटले, "तुम्ही लढायांविषयी ऐकाल आणि लढाईच्या आवया ऐकाल, आणि अजूनही काही ऐकाल. परंतु तरीही ते नाहीए... पाहा, ते—ते मग परत येतील, मग ते तुम्हाला सोपवून देतील. परंतु तो समय अजून आला नाही."

234 परंतु जेव्हा तो त्या वेळेवर आला, तेव्हा तो त्या विषयावर बोलण्यास जाणार होता, जे त्यांनी प्रश्न विचारले होते, म्हणजे "जगाच्या अंताविषयी"

235 "या सर्व घटना कधी होतील, जेव्हा तेथे धोंड्यावर धोंडा राहणार नाही? त्याचे चिन्ह काय असेल? आणि जगाचा अंत कधी येईल?" पाहा त्यांनी तीन गोष्टींविषयी विचारले.

जेव्हा तो त्या प्रश्नावर आला की, "जगाचा अंत कधी होईल?"

236 तो म्हणाला, "जेव्हा तुम्ही अंजीराच्या झाडाला पालवी फुटलेली पाहाल, तेव्हा तुम्ही समजा की, तो दाराशीच आहे. आणि मी तुम्हास खचित सांगतो की, हे पूर्ण होईपर्यंत ही पीढी नाहीशी होणारच नाही." धर्मनिंदक योग्य अनुवादाशिवाय त्यावर लादून राहू इच्छितात! पाहा? त्याने म्हटले, "ही पीढी," ज्यावेळी तो बोलत होता, तेव्हाची पीढी नव्हे, तर ती पीढी जीने अंजीराच्या झाडाला पालवी फुटलेली पाहीली.

237 आता मला तुम्हाला काही विचारावे असे वाटते. तुम्ही येथे सरळ समोर पाहा. इस्त्राएल आता, पहिल्यांदाच 2500 वर्षानंतर एक राष्ट्र बनले. यरुशलेमात आज रात्री, जगातला प्राचीन झेंडा फडकत आहे. इस्त्राएल आपल्या जन्मभूमीत आहे.

238 एके वेळी येथे एक भाऊ होता, ज्याला मिशनरी बनण्याची इच्छा होती. त्याला वाटले की, यहुदी लोकांमध्ये मिशनरीचे कार्य करावे. मी म्हटले, "तुम्हाला यदाकदाचित संधी मिळेलही." लोक विचार करतात, पूर्ण देश! नाही महाशय.

239 इस्त्राएल हा एक व्यक्तीमध्ये नव्हे, तर एका राष्ट्रात बदलला गेला आहे. "एक राष्ट्र एका दिवसात जन्म पावेल." ते इस्त्राएल राष्ट्र होय. "संपूर्ण इस्त्राएल वाचेल." ह्याची आठवण ठेवा, हे पौल म्हणाला आहे. "संपूर्ण इस्त्राएल वाचला जाईल." आता लक्ष द्या, "संपूर्ण इस्त्राएल." ते अगदी बरोबर आहे.

240 आता याकडे अवलोकन करा. "परंतु", तो म्हणाला, "जेव्हा तुम्ही अंजीराच्या झाडाला पाहता व सर्व इतर झाडे पाहता, त्यांना पालवी फुटलेली पाहता." आता लक्ष द्या. असे कधीच घडले नव्हते, 2500वर्षात, की इस्त्राएल आपल्या जन्मभूमीत यावा. एक नाटीका आमच्याकडे आहे, *मध्यरात्री होण्यास तीन मिनिटे*, तुम्हाला माहीत आहे. तेथे तो एक देश आहे. सहा ठिपके असलेला दाविदाचा तारा, असा तो झेंडा फडकत आहे, आणि अशाप्रकारे सर्व गोष्टी.

241 संप्रदायाकडे मागील काही वर्षामागे अशाप्रकारचे संजीवन कधी होते काय, जसे अगोदर होते? आता यावर अभ्यास करा. आम्ही आपल्या भूमीत आहोत.

242 कधी तसे सांप्रदायिक मंडळ्या अशा बहरल्या गेल्या होत्या कोणा माणसाधीन सेवकाद्वारे, जसे बिली ग्रॅहम; मेथॉडीस्ट, बॅप्टीस्ट आणि इतर? कधी असा कोणी व्यक्ती होता काय, इतिहास शोधून पाहा, जो मंडळीमध्ये औपचारिकरित्या गेला, त्याच्या नावाचा शेवट हा हाम (एच–ए–एम) होता.? मी फक्त विचारतोय. ए–बी–ई...

243 ए–बी–आर–ए–एच–ए–एम, अब्रहाम आता पाहा. अब्रहामाच्या नावाची 7 अक्षरे आहेत. ए–बी–आर–ए–एच–ए–एम.

244 परंतु आमचे भाऊ बीली ग्रॅहम याचे नाव जी–आर–ए–एच–ए–एम सहा अक्षरी आहे, नाही सात. ते जगात, म्हणजे स्वभाविक मंडळीमध्ये सेवकाई करीत आहेत.

245 स्वभाविक मंडळीही, सदोमातील, लोटाला दर्शविते. आणि जेव्हा ह्या व्यक्तिने तेथे खाली जाऊन प्रचार केला आणि त्यांना सुवार्तेद्वारे आंधळ केलं.

246 परंतु तेथे एक जण होता, जो अब्रहामाबरोबर राहिला आणि अब्रहामाने त्यास. "एलोहिम, प्रभू," म्हटले. आता जेव्हा अब्रहामाने तीन जण येताना पाहीले, तो म्हणाला, "माझा प्रभू."

247 जेव्हा लोट दोघांना येताना पाहतो, तो म्हणतो, "माझे प्रभू." येथेच तर फरक आहे. पाहा, येथे त्रैक्य देवत्वाचे काम? पाहा.

248 येशूने म्हटले, “जसे लोटाच्या दिवसात होते.” तुम्ही पाहता ना? न्याहाळा. आणि गणती करा.

249 आता, एक जण तेथे आत्मिक मंडळीसाठी आला. वधुसाठी, अब्रहाम जो सदोमात, सुरुवातीपासूनच नव्हता. आणि पाहा, त्याने काय केले. त्याने कधी प्रवचने केली नाहीत, जसे ते करीत होते. त्याने त्यांना शिकविले, परंतु त्यानंतर त्याने त्यांच्यासमोर एक चिन्ह दाखविले होते. त्याने मसिहाचे चिन्ह दाखविले. त्याची पाठ त्याच्या तंबूकडे केलेली होती, आणि तो म्हणाला “अब्राहाम.” आता लक्षात ठेवा, त्याचे खरे नाव काही दिवसांअगोदर अब्राम होते. परंतु तो म्हणतो, “अब्राहाम, तुझी बायको, सारा कुठे आहे?” काही दिवसांअगोदर तिला साराय नाव होते?

अब्राहाम म्हणाला, “ती तुझ्यामागे तंबूमध्ये आहे.”

250 आणि तो म्हणाला, “अब्राहाम मी…” येथे पुन्हा तुमचे सर्वनाम येते. “मी तुला अभिवचन दिल्याप्रमाणे मी तुला भेटेन.” तुम्ही पाहता की, काय ते आहे? पाहा, एक मनुष्य, त्याच्या कपड्यांवर धुळ होती, वासराचे मांस खात होता, आणि गाईचे दूध पित होता, आणि मक्याची भाकर खात होता. होय, महाशय, देव, एलोहिम, शरीरात प्रकट झाला होता!

251 त्याने अभिवचन दिले आहे, या अंतिम दिवसात. पुन्हा स्वतः देहामध्ये आपणास प्रकट करिल! लक्ष द्या.

“अब्राहाम, तुझी पत्नी, सारा कुठे आहे?”

“ती तंबूमध्ये, तुझ्यामागेच आहे.”

म्हणाला, “मी तुला भेटेन.”

252 आणि ती कुलीन महीला, अर्थातच, जवळजवळ शंभर वर्षाची, तंबूमध्ये पडद्यामागे एक प्रकारे आपल्या मनात हसली. ती म्हणाली, “मी जख्ख म्हातारी,” आम्ही जाणतो की, एक पती व पत्नी या स्वरुपात त्यांच्यात ते संबंध कधीच बंद झाले होते, कैक वर्षापूर्वीच; कारण तो शंभर वर्षाचा आणि—आणि—आणि ती नव्वद वर्षाची. म्हणाली, “हे कधीच होऊ शकत नाही.”

253 आणि तो म्हणाला, “ती का हंसली?” आश्चर्य जनक! त्याची पाठ त्या तंबूकडे होती, “ती का हंसली, म्हणाली, ‘हे कसे होऊ शकेल?’” पाहा त्याने त्याला एक चिन्ह दाखविले.

254 आता त्याने आश्वासने दिली आहेत की, ह्यांची पुनरावृत्ती, पुन्हा अंतीम काळात होईल.

255 आणि दोन व्यक्ती तेथे खाली गेले आणि वचनाचा प्रचार केला. आणि त्यांना बाहेर येण्यास सांगितले, कारण ते ठिकाण जळले जाणार होते, आणि अशाप्रकारे आणि. ती जळाली. आणि लोट कचरु लागला; जो स्वभाविक मंडळीला दर्शवितो, पापांमध्ये खितपत पडला होता, आणि पापाच्या दलदलीत रुतला होता, परंतु अजूनही संस्थेबरोबर कामांसाठी धडपड करीत होता. परंतु वधु…

256 तो एक मनुष्य त्यांच्याकडे कधीच गेला नाही. तो फक्त गेला आणि छायारुप वधुला पाचारण केले. आता आम्ही अंतिम दिवसात आहोत. पाहा? आता अवलोकन करा.

“तुम्ही म्हणता, ‘देव देहात प्रकट झाला’?”

257 येशूने म्हटले, स्वत:, “तुम्ही माझ्यावर दोष कसा लावू शकता?” म्हणाला, “काय तुमच्या बायबलमध्ये हे लिहीले नाही काय. तुमचे नियमशास्त्र, ते संदेष्टे ज्याच्याकडे देवाचे वचन येते…” येशूने म्हटले, “वचन संदेष्ट्यांकडे येते,” आणि तुम्ही त्यांना ‘देव’ म्हणता. कारण तो सर्वबाबतीत वचनाप्रमाणे होता.” तो म्हणाला, “आता कारण देवाचे वचन म्हणते, देवाचे वचन संदेष्ट्यांकडे येते आणि तुम्ही त्यांना देव म्हणता कारण देवाचे वचन त्यांच्याकडे येते.” म्हणाल, “तर कसे तुम्ही मला दोष लावता जेव्हा मी म्हणतो की, मी देवाचा पुत्र आहे?” त्यांच्याच नियमशास्त्राने, त्यांना निरुत्तर केले होते. तुम्हीही त्याच स्थितीत आहात. समजले?

258 आता आम्ही कुठे आहो? आता आम्ही अंतिम घटकेत आलो आहे. आता फार लक्षपूर्वक ऐका.

259 आता आम्ही पाहतो की, लढाया होतील आणि लढायांच्या आवया ऐकाल. आणि आता आम्ही अंजीराच्या झाडाला पालवी फुटताना पाहतो. आणि जी दुसऱ्या झाडांना ही पालवी फुटत आहे. मेथॉडिस्ट, बॅप्टीस्ट, प्रेसबेटेरियन, आणि सर्व यांना पालवी फुटली आहे, एक महान संजीवन चालू आहे.

260 आता मी विश्वास करतो की, देव आपल्या वधुला जमा करीत आहे, या शेवटच्या ताशी, निवडलेलेच. ओह, बापरे! आता लक्ष द्या.

261 आता, योहानाने काय पाहिले ते विचारात घ्या. मग ज्या गोष्टी त्याने पाहिल्या. “एक लाल रंगाचा घोडा; आणि त्यावरील स्वार पुढे जातो, त्याला अधिकार देण्यात आला होता की, त्याने मोठ्या तरवारीद्वारे वध करावा.” आता, येथे माझे प्रकटीकरण याबाबत आहे. हा सैतान आहे, पुन्हा. हा सैतान आहे, पुन्हा, वेगळ्या स्वरुपात. आता, आम्ही जाणतो की—की शिक्क्यांचा संबंध…जसे मी कोणत्या एका रात्री म्हणालो होतो. आणि तुतारीचा संबंध हा—हा—हा यादवी युध्दाशी आहे. तुम्ही पाहा, लोकांमध्ये, राष्ट्रांमध्ये. परंतु तुम्हाला दिसेल येथे की ह्या मनुष्याकडे एक तरवार आहे. म्हणून ते मंडळीशी संबंधीत आहे. त्याचा संबंध हा राजकारणाच्या युध्दाशी आहे. आता तुम्ही तसा विचारही करु शकणार नाही. परंतु एक मिनिटभर त्यावर लक्ष लावा. फक्त थोड्या मिनिटांसाठी, आपली दृष्टी त्यावर लावा.

262 या घोड्यांचे रंग कसे बदलतात, ह्याचे अवलोकन करा. तोच घोडेस्वार, परंतु घोड्याचा रंग बदलला. आणि एक घोडा हा पशू आहे. आणि एक पशू- श्वापद हे बायबलमध्ये एक चिन्हात्मकरित्या दर्शविलेले आहे, ते सामर्थ्य-शक्तिला दर्शविते. तिच प्रणाली स्वार असून एका वेगळ्या रंगात, शक्तित, एका निर्दोष स्वच्छ अशा पांढऱ्या रंगातून लालसर रंगात दिसते. समजले? त्याकडे आता लक्ष द्या, तो कसा येत आहे.

263 जेव्हा त्याने सुरुवातीला सुरु केले, तेव्हा तो न्यायी होता, सुस्थितीत, तो त्या लोकांमध्ये—मध्ये एका छोट्याशा सिध्दान्ताचा स्वरुप होता, ज्याला निकलाईताची शिकवणूक म्हटली जाते. अर्थात, या स्थितीत ते कोणाचा वध करु शकत नाही. हे प्रकटीकरण 2:6, जर तुम्हाला ते लिहायचे आहे. तर तो कोणाचा वध करु शकत नव्हता. हा तर फक्त एक सिध्दान्त होता, लोकांमध्ये तो एक आत्मा होता. आता, तो कोणाचाही वध करु शकत नव्हता. ओह, तो फार निष्पाप होता, जो ह्या पांढऱ्या घोड्यावर स्वार होता. “ठीक आहे, तुम्हाला माहित आहे आमच्याकडे एक महान जगभर पसरलेली मंडळी आहे. जिला आम्ही मंडळी म्हणू शकतो.” ते आताही असे करीत आहेत. ही खरी गोष्ट आहे. पाहा? “आम्ही…” ओह, तो पूर्णत: निरुपद्रवी आहे. आणि, ओह, तो खूप निरुपद्रवी

आहे. “तो फक्त लोकांचा समुह आहे. आम्ही सर्व सहभागीतेसाठी एकत्र येऊ.” पाहा, तो फार निरुपद्रवी आहे; तो पांढरा आहे, तो पांढरा घोडा होता. समजले?

264 आता, मान्यवर, आणि उत्तम कपडे धारण केलेले, आणि शिक्षित असे, तुम्ही जाणता की, हे असे आहे की एक जातीचे पक्षी, हे एकत्र त्याच जातीच्या पक्ष्यांबरोबर येतात. तुम्हाला माहीत आहे, “आम्ही—आम्ही सर्वांना एकत्र मिळवू. आणि त्या थोड्या लोकांचा समुह, अडखळण होऊन ते वेगळे होऊन निघून जात आहेत, तर जाऊ दे. परंतु आमच्या—आमच्याकडे अधिक चांगल्या प्रतीचे मंडळीत येत आहेत. जर आम्ही या लोकांपासून वेगळे होऊन एकत्र मिळू, तर आमचा समुह हा गवंडी आणि अशा लोकांसारखा समुह बनला जाईल. आम्ही—आम्ही सर्व गोष्टींची सुधारणा करु, नाहीतर, आम्ही—आम्ही विचित्र व्यक्ति वाटू जसे ते आहेत.” आणि...अशा विचित्र लोकांच्या राहण्याचे ठिकाणात नव्हे, परंतु मी काय म्हणतो तुम्ही जाणता. म्हणून एका खऱ्या विश्वासी व्यक्तिला हे विचित्र वाटेल. आता, परंतु, अन्यथा दुसऱ्या शब्दांत “आम्हाला लहान समुह हवा, एक लहान महासंघ ज्याला आम्ही आमचा म्हणू शकू.” ही एक शिकवण, परंतु फार निरुपद्रवी वाटण्यासारखी. “बंधुजनांनो, तुम्हा लोकांविरुध्द आमचे काही नाही, काहीच नाही. तुम्ही आपल्या जागी बरोबर आहात. परंतु तुम्हाला माहीत आहे, आम्हाला असे वाटते की, आमचीही काही कामे आहेत...जर आम्ही आपसात एकत्र होऊ.” समजले? होय महाशय, ते घडून येईपर्यंत की ते एकत्र यावे, तो पर्यंत हे असेच घडत गेले.

265 परंतु जेव्हा हा भीषण, ठकविणारा आत्मा (हे, मनुष्या!) जितपर्यंत शिकवणुकीच्या स्वरुपाचा, आत्मा हा ख्रिस्ताची जागा घेण्यासाठी, एका मनुष्यात देहधारी होईल. त्याची भक्ती ही ख्रिस्ताप्रमाणे व्हावयास हवी. मग ती भक्ती होऊ लागली. दुसऱ्या शब्दात वॅटिकनच्या वरती...मी तेथे होतो. हे रोमन अंकामध्ये असे लिहीले आहे, “**वायकर वियस फिली दी**,” आता, तुम्ही त्या रोमन अंकाखाली एक रेघ ओढा आणि त्याचा अर्थ असा आहे, “देवाच्या पुत्राऐवजी.” तो, दुसऱ्या शब्दात तो वायकर आहे तुम्हाला माहीत आहे का वायकर म्हणजे काय? कशाची तरी जागा घेणे. तो वायकर आहे, “ज्याने परमेश्वराच्या पुत्राचे स्थान ग्रहण केले आहे.”

266 आणि बायबल म्हणते, “येथे अकलेचे काम आहे, ज्याला बुध्दी आहे, त्याने त्या श्वापदाचे नाव त्या संख्येवरुन काढावे, त्या संख्येवरुन माणसाचा बोध होतो. ती त्याची संख्या सहाशे सहासष्ट होय.” आता, तुम्ही **वायकर वियस फिली दी** हा घ्या, व एकरेष ओढा. रोमन अंकामध्ये ‘वी’ हे पाच आणि ‘आय’ हे एक...दाखविते आणि त्याप्रमाणे पुढे करत जा आणि पाहा तुम्हाला सहाशे सहासष्ट संख्या कशी नाही मिळत.

267 बायबल म्हणते, “तो देवाच्या मंदिरात बसेल, व देवासारखा भजनीय बनेल.” जेव्हा ती लहानशी शिकवणूक ही देहधारी होईल, ती दुसऱ्याची जागा घेईल. “म्हणजे देवाच्या पुत्राची जागा ग्रहण करील.” पाहा? बापरे! हा भीषण, ठकविणारा आत्मा आहे! जर तुम्ही ते वाचू इच्छिता, दोन थेस्सलनीकरांचे पत्र 2:3, यामध्ये ते वाचा आणि पाहा की ते कुठे आहे.

268 आणि अर्थातच तुम्हाला हे आठवेल की, सैतान हा सर्व राजकारणाच्या शक्तीचा मुख्यजनक आहे. किती जणांना हे माहीत आहे? [मंडळी म्हणते “आमेन”—सम्पा.] तुम्हाला लिहायचे आहे काय? मत्तय 4:8, “सैतानाने येशूला एका अतिशय उंच डोंगरावर नेऊन, त्याला काळाच्या एका क्षणात, जगातील सर्व राज्ये व त्यांचे वैभव दाखविले.” ह्या व्यक्तिविषयी बोलला! तो म्हणाला, “मी हे सगळे काही तुला देईन, जर तू माझ्या

पाया पडून नमन करशील.” आणि येशूला हे माहीत होते की, तो त्या सर्वांचा वतनदार बनणार आहे.

269 हेच ते लोक म्हणाले, “तुम्ही ते देव वेड्या लोकांचा समुह आहा!”

270 काय, म्हणून जग आम्हाला मिळेल! “लीन जन पृथ्वीचे वतन पावतील.” हेच येशूने सांगितले. पाहा? समजले?

271 लक्ष द्या, येशूला माहीत होते की, ते वतन त्यालाच मिळणार आहे. म्हणून तो म्हणाला, “अरे सैताना निघून जा.असे लिहीले आहे,” तुम्ही पाहा वचनाद्वारे त्याने पुन्हा प्रतिक्रिया दिली. “‘प्रभू तुझा देव याला नमन कर व केवळ त्याचीच सेवा कर.’” समजले?

272 आता—आता, जेव्हा—जेव्हा तो, जो भुतांचा प्रमुख, तो देहधारी होतो. या धार्मिक व महत्त्वाच्या व्यक्तिमध्ये, जसे बायबल भविष्यवाणी करते, मग तो त्याची मंडळी व राज्य ऐक्यात आणिल. दोन्हीही त्याचे स्वत:चे सामर्थ्य ऐक्यात आणिल. समजले?

273 जेव्हा ख्रिस्तविरोधकाचा आत्मा निघाला, तेव्हा तो एक आत्मा होता. मग तो काय बनला? तेव्हा तो बनला...आता तो शिक्षा पाहा. जेव्हा तो आत्मा पुढे निघून गेला, तेव्हा तो ख्रिस्तविरोधक होता, ख्रिस्ताच्या शिक्षणाविरुध्द. ठीक आहे. नंतर जी गोष्ट केली... जे ख्रिस्ताने त्याच्या मंडळीसाठी करण्यासाठी पुढे ठेवले आहे, ते पापाच्या विरुध्द आहे. “ओह, त्याचा अर्थ तसा नाही. त्याचा अर्थ तसा नाही. ती गोष्ट कोणा मनुष्यांसाठी होती. ती गोष्ट तर शेकडो वर्षे जूनी आहे. ते आमच्यासाठी नाहीए.” समजले? हा, *विरोधी* आहे, “विरुध्द” मग ते बनले...

274 आता, स्वार बाहेर गेला, त्याच्या—त्याच्याकडे कोणताही मुकूट नाही, परंतु त्याला एक देण्यात आला होता, तो पांढरा घोडा; त्याच्याकडे धनुष्य होते, बाण नव्हते. समजले? म्हणून नंतर जेव्हा तो पुढे गेला...

275 मग, काही अवधीनंतर, त्याला मुकूट देण्यात आला, कारण तुम्ही आत्म्याच्या मस्तकावर मुकूट ठेवू शकत नाही. परंतु, जेव्हा, तो आत्मा आपल्या रहस्यमय कालखंडात, दुय्यम प्रकारच्या कार्यात देहधारी बनला, एका खोट्या संदेष्ट्याच्या स्वरुपात, ज्याने मुकूट धारण केले, ख्रिस्तविरोधी आत्म्याच्या कार्यासाठी आता, आम्ही त्याला पाहतो, आता, तो बनतो, जेव्हा तो ते घेतो. मग, सैतानाने पहिल्यापासूनच, जगाच्या राजकारणाच्या शक्तिचा ताबा घेतला आहे.

276 आता तो एका अशा ठिकाणी येतो जेथे तो एक सार्वत्रिक सामर्थ्याची मंडळी बनविण्यास जातो, तो धार्मिक अधिकार घेण्यास जातो. आणि माझ्या भावांनो तुम्हाला ते समजत नाही...हा देश प्रकटीकरण 13व्या अध्यायात दिसून येतो, त्यात एक पशू एका कोकऱ्यासारखा बाहेर निघून येतो. आणि त्याला दोन शिंगे आहेत, एक धार्मिक आणि राजकारणाचे ही सामर्थ्याला दर्शवितात; परंतु त्याने तिचे कार्ये केली, जी त्याच्या अगोदरच्या पशूने केली होती.

277 ही विचित्रच गोष्ट आहे की, अमेरिकेचा अंक13 आहे, आणि हा स्त्रीचा अंक आहे. ही मोठी विचित्रच गोष्ट आहे, आणि ती आम्हाला प्रकटीकरणाच्या 13व्या अध्यायात दिसून येते. आम्ही सुरुवात करतो ती झेंड्यावर 13पट्ट्या, आणि 13 तारे या द्वारे. सर्वकाही “13, 13, 13, 13,” आहे. सर्व काही “स्त्री, स्त्री, स्त्री,” आहे.

278 आणि शेवटी ते समाप्त होईल. (माझा अंदाज वर्तवितो), एक स्त्री, त्या राष्ट्रावर सत्ता करील. आठवा, हे तीस वर्षापूर्वी मी म्हणालो आहे. आणि—आणि सात गोष्टी ज्यांचे मी

भाकीत केले होते. त्यांतील पाच गोष्टी होऊन चुकल्या आहेत आणि त्यांना मनुष्य मिळाला आहे, जो तिला बरोबर आणिल आणि तुम्ही आपली मते देता तुमच्या राजकारणाद्वारे. होय, हुंह! ठीक आहे.

279 खूप काही सांगण्यासारखे आहे, परंतु त्या गोष्टी समजने अवघड आहे, जे तुम्ही समजू इच्छिता. आता पाहा. मी तुम्हाला येथे फार वेळपर्यंत थांबविणार नाही. परंतु थोडा वेळच थांबवीन, कारण उद्यादेखिल मला प्रचार चालू ठेवावा लागेल.

280 पाहा, ध्यान द्या. जेव्हा सैतान आता, सर्वजण, जे जाणतात की, सैतान हा जगाच्या राजकारणाच्या शक्तिचा ताबेदार आहे. [मंडळी म्हणते–"आमेन."—सम्पा.] त्याने तसे सांगितले आहे. मत्तय याचा 4था अध्याय, तुम्हाला सापडले काय, 8वे वचन. सर्व राज्ये त्याच्या मालकीची आहेत. म्हणून त्याचे कारण ते लढाया, युध्दे, हिंसा करीत आहेत. आता लक्षात घ्या.

281 काय हे आश्चर्य कारण नाही का? त्यांना ती तरवार देण्यात आली, यासाठी की त्यांनी दुसर्यांस मारावे. ओह, ओह, ओह, बाप रे! लक्षात घ्या.

282 आता, जेव्हा तो ते करतो, त्याच्याकडे अजूनही संघराज्यावादी सामर्थ्य मिळाले नव्हते. परंतु त्याने सुरुवात त्या दुरात्म्याकडून खोट्या शिकवणूकीने केली होती. आणि ती शिकवण ही सिध्दांत बनली. तो सिध्दांत खोट्या संदेष्ट्यात देहधारी झाला.

283 आणि मग तो त्याच्या योग्य जागी गेला. आता, तो इस्त्राएलात कधीच गेला नाही. तो रोममध्ये गेला; नायसिया, रोममध्ये.

284 एक परिषद आयोजीत करण्यात आली, आणि त्यांनी एक मुख्य बिशपाची निवड केली. आणि मग हे करुन त्यांनी राज्य व मंडळीला एकत्र केले. त्याने आपले धनुष्य सोडून दिले. तो आपल्या पांढऱ्या घोड्यावरुन उतरला. तो आपल्या लाल रंगाच्या घोड्यावर स्वार झाला, यासाठी की तो कोणालाही ठार मारील, जो त्याच्या मतांना सहमत नाही. येथे तुमचा शिक्का आहे. तोच तो व्यक्ती! तुम्ही त्याच्याकडे तितपर्यंत दृष्टी लावा, जितपर्यंत आपली दृष्टी लावून राहील. जितपर्यंत तो अनंतकाळात विलीन होत नाही. पाहा, तो आपल्या दोन्ही शक्तिचे एकीकरण करतो.

285 या घडीला, आजही, हीच गोष्ट करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. आणि आश्चर्य कारक गोष्ट, कदाचित तुम्ही समजणार नाही. परंतु, आज या बॅप्टीस्ट समुहात जो लुईजविले येथे आहे...तुम्ही रेडियोवर ऐकले आहे. एक वक्ता उठून उभा राहतो...किती जणांनी त्याचे ऐकले आहे? खरे आहे, पाहा? ठिक आहे, येथे तुम्ही याच स्थितीत आहा. त्यांनी कॅथॉलिक मंडळीमध्ये एकाप्रकारे सामिल होण्यास विचारले आणि खरे पाहता आम्हाला कॅथॉलिक मंडळीमध्ये सामिल व्हायचे नाही, परंतु आम्हाला त्यांच्याबरोबर सहभागिता करावी लागेल...आणि, ही गोष्ट लुईसविले मध्ये आज चालू आहे. जेव्हा परमेश्वर शिक्के फोडून आपल्या लोकांना उघड करीत आहे व दाखवित आहे की, "तुम्ही हे करु नका पाहा!" हे दोन्हीही एकत्र कार्य करीत आहेत? लक्षात असू द्या, तारवामध्ये, कावळा आणि कबूतर दोन्ही पक्षी हे एकाच खांबावर बसले होते. नक्कीच. याची आठवण ठेवा.

286 आता आम्ही पाहीले, त्याने मंडळी आणि राज्याची, आपली दोन्ही शक्ति यांचे एकीकरण केले, धर्मनिरपेक्षता. मग तुम्ही काय करायला जात आहा? त्याने आपला स्वतःचा धर्म स्थापित केला. आणि आता त्याला जे वाटेल, ते तो करु शकतो. मग, त्याचा हा हक्क बनला की जो कोणी त्याच्या बरोबर सहमत होत नाही त्याला ठार मारावे. तेच त्याने केले. आणि त्याने तसेच केले. आणि—आणि ते...त्याने ते जीवंत देवाचे खरे

संतजन त्यांच्या बाबतीत केले, ज्या संतजनांनी वचन राखले आणि या मतप्रणालीला ते सहमत झाले नाहीत. त्यांना त्याने ठार मारले.

287 आता, भाऊ लीवाया आणि तुम्ही जे नायसिया युग आणि आरंभाच्या मंडळीचे शिक्षक आहात, मला माहित नाही की तुम्ही हे वाचले आहे किंवा नाही. जर तुम्ही वाचू इच्छिता, तर ते तुम्हाला *स्मुकरच्या ग्लोरियस रिर्फोरमेशन* या पुस्तकात वाचावयास मिळेल.

288 आणि तुम्हाला त्यात सापडेल की, जेव्हा हिप्पोचा संत अगुस्तीन हा रोमन मंडळीचा एक धर्मगुरु बनला, त्याला एक संधी मिळाली, ती अशी की एके वेळी पवित्र आत्म्याने त्याच्यावर येण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याने त्याला नाकारले. शिक्षक म्हणून, किती जणांना हे माहीत आहे? म्हणून त्याने पवित्र आत्मा नाकारला. हे आजच्या प्रोटेस्टंट मंडळीचा नमूना आहे, ज्यांनी पवित्र आत्म्याला नाकारले आहे. तो परत हिप्पो येथे गेला, आणि तोच तो व्यक्ति होता, ज्याने त्या कागदावर आपली स्वाक्षरी केली होती. ज्यावर लिहीले होते, "परमेश्वरापासून हे प्रकटीकरण आहे, ते ठीक आहे आणि परमेश्वराला संतुष्टकारक आहे की, प्रत्येक वेळी ठार मारला जावा, जो रोमन कॅथॉलिक मंडळीवर विश्वास करीत नाही."

289 आता ऐका. मी हा संदर्भ हुतात्मे झालेल्यांच्या पुस्तकातून मी एक प्रसंग सांगत आहे, "हिप्पो येथील संत आगस्तीनच्या समयापासून, ते 1586 पर्यंत," रोमन हुतात्म्याचे पुस्तक माहिती दते की, "रोमन कॅथॉलिक मंडळीने 6,80,00,000 प्रोटेस्टंट जीवे मारले." काय त्याची तरवार लाल होती? तो लालरंगाच्या घोड्यावर स्वार होता? हे काय आहे? तेच सामर्थ्य व तोच स्वार. येथे तो शिक्का आहे. त्यांनी ही कबुली दिली. सहा कोटी ऐशी लाख हे हुतात्मा झालेले, हे सोडूनही बाकीचे जे ठार मारले गेले ते वेगळे. ओह, दया कर! या अंधार युगात, लाखों सिंहाला भक्ष्य म्हणून बनले, आणि त्यांचा वध वेगवेगळ्या प्रकारे करण्यात आला, कारण ते कॅथॉलिक तत्वप्रणालीला झुकले नाहीत. तुम्हाला हे माहीत आहे.

290 तुमच्याकडे किती वेळ आहे? [मंडळी म्हणते, "पुष्कळ वेळ. संपूर्ण रात्र."—सम्पा.] ठिक आहे. मला काही वाचू द्या. माझ्याबरोबर वळा, मला काही तुम्हाला दाखवायचे आहे. या—या गोष्टीचे चित्रण करा, एक मिनिटासाठी. हे माझ्या मनात आताच आले आणि आपण ते वाचूया. प्रकटीकरणाकडे वळूया, 17वा अध्याय प्रकटीकरणाचा. अजूनही आमच्याकडे पंधरा मिनिटे आहेत. ठिक आहे. आता ध्यानपूर्वक ऐका. आता अधिक ध्यानपूर्वक जसे आम्ही वाचत आहो. ज्या तुम्हाकडे बायबल आहेत, त्याकडे वळा, मी तुम्हाला थोडा अधिक वेळ देत आहे. यासाठी की ते तुम्हाला मिळावे.

291 भाऊ ली, तुम्हाला ते मिळाले काय? मला ते स्मूकरच्या पुस्तकात सापडले, *ग्लोरियस रिफार्म*, या पुस्तकात पाहा. हे सरळपणे रोमच्या हुतात्मांच्या पुस्तकातून घेतले आहे. जे वॅटीकनमध्ये आहे.

292 आता, त्यांनी हे संत पॅट्रीकच्या लोकांना छळण्यापर्यंत केला होता. आणि मग त्यांनी संट पॅट्रीक याला—याला संत म्हणू लागले. वा! संत पॅट्रीक हा तेवढाच कॅथॉलिक होता, जेवढा मी आहे; आणि तुम्ही जाणता की मी किती कॅथॉलिक आहे. पाहा. त्याने रोमन कॅथॉलिक मंडळीच्या तत्त्वप्रणालीचा तिरस्कार केला होता. त्याने पोपकडे जाण्याचे नाकारले होते. होय महाशय...काय तुम्ही कधी दक्षिण आयरलॅंडपर्यंत गेला आहात, जेथे त्याच्या शिक्षणसंस्था होत्या? तुम्हाला माहीत आहे, त्याचे नाव हे पॅट्रीक नव्हते? किती

जणांना हे माहीत आहे? त्याचे नाव हे सुकेट होते, हे खरे आहे. तो आपल्या बहिणीला हरवून बसला होता...समजले? ठीक आहे.

293 आता, ध्यान द्या. प्रकटीकरणाच्या 17व्या अध्यायात. आता सर्वांनी आपले हृदय उघडण्याचा प्रयत्न करा. आता पवित्र आत्माच तुम्हाला शिकवो.

> *...नंतर सात वाट्या घेतलेल्या सात देवदूतांपैकी एकजण येऊन माझ्याबरोबर बोलू लागला...*

294 आता, तुम्ही पाहता की, येथे सात वाट्या आहेत. तुम्ही जाणता की जसे आपण या सात शिक्क्यांचा अभ्यास करीत आहोत, हे सर्व काही एकाच वेळी घडते. पीडानंतर, सात मंडळीच्या युगानंतर तसेच आहे. सर्व काही त्या एका पुस्तकामध्ये शिक्क्यामध्ये बंद केलेले आहे. आणि सर्व काही जे घडत आहे, ते आळीपाळीने घडत आहे. एक दुसऱ्यात जातो आणि मग दुसऱ्यात आणि दुसऱ्यात येथे दोन आत्मे कार्यरत आहेत. एक परमेश्वराचा व दुसरा सैतानाचा आत्मा. समजले?

> *...त्यांच्याकडे शेवटच्या सात वाट्या होत्या आणि तो म्हणाला, इकडे ये, म्हणजे अनेक जलप्रवाहांवर बसलेल्या मोठ्या कलावंतिणीचा झालेला न्यायनिवाडा मी तुला दाखवितो.*

295 आता पाहा येथे, येथे त्या "जलांकडे."

296 "वेश्या," काय आहे? ती एक स्त्री आहे. ती पुरुष असू शकत नाही. आणि मंडळीमध्ये, बायबलमध्ये स्त्रीला काय दर्शविलेले आहे? मंडळी. का? ख्रिस्ताची नवरी आणि त्यासारखे तुम्ही पाहा, ती स्त्री आहे, मंडळी.

297 आता, "जलप्रवाह", हे काय आहेत? येथे लक्ष द्या, 15वे वचन.

> *आणखी तो मला म्हणाला, जेथे कलावंतीण बसली आहे, तेथे जे जलप्रवाह तू पाहीले ते लोक,...जनसमुह,...राष्ट्र, व निरनिराळ्या भाषा बोलणारे असे आहेत.*

298 ही मंडळी संपूर्ण जगावर सत्ता करीत होती, पाहा, "पुष्कळ जलप्रवाहावर ती बसलेली आहे,"

> *तिच्याबरोबर पृथ्वीवरील राजांनी जारकर्म केले,* आत्मिक जारकर्म (तिचे सिध्दांत घेतले, निकलाइतांची शिकवण), *आणि तिच्या जारकर्मरुपी द्राक्षारसाने पृथ्वीवर राहणारे मस्त झाले.*

299 मुला, तू त्या पिणाऱ्याच्या समुहाबद्दल बोलतोस काय, जे त्यावर आहे! तु...

> *मग मी आत्म्याने संचरित झालो असताना त्याने मला रानात नेले: आणि एक स्त्री दृष्टीस पडली...*

300 आणि तुम्हाला माहीत आहे काय? कॅथॉलिकांचे स्वतःचेच लेखन हे स्विकार करतात की, ही त्यांचीच मंडळी आहे. किती जणांना हे माहीत आहे? त्यांच्या स्वतःच्या लेखनातच हे आहे. माझ्याकडे *फॅक्ट्स ऑफ अवर फेथ*, म्हटले गेलेले, पुस्तक आहे, आता पाहा, हे तर धर्मगुरुकडे असते. ठीक आहे. ठीक आहे.

> *मग मी आत्म्याने संचरित झालो असताना, त्याने मला रानात नेले; तेव्हा देवनिंदात्मक नावांनी भरलेल्या, आणि सात डोकी व दहा शिंगे असलेल्या किरमीजी रंगाच्या श्वापदावर बसलेली, एक स्त्री माझ्या दृष्टीस पडली.*

301 आता, तुम्ही फक्त ते पाहा, ते चिन्ह, ती “सात डोकी”. आता तुम्ही पाहता, जेथे हे म्हटले आहे, “आणि—आणि—आणि…जी डोकी तू पाहतोस, ते सात डोंगर आहेत, ज्यावर ती स्त्री बसते.” रोम हे सात डोंगरावर वसलेले आहे. समजले? आता यामध्ये काही चूक नाहीच, पाहा, “सात डोकी.” “आणि दहा शिंगे,” तुम्ही जाणता ही दहा राज्ये, आहेत आणि वैगेरे.

*ती स्त्री जांभळी…व किरमीजी…वस्त्रे ल्याली होती. आणि सोने मौल्यवान रत्ने व मोत्ये ह्यांनी शृंगारलेली होती. तिच्या हातात अमंगळ पदार्थांनी आणि तिच्या जारकर्मांच्या—जारकर्मांच्या मळाने भरलेला सोन्याचा प्याला होता, अमंगळ पदार्थाने भरलेला.*

302 तो ख्रिस्त विरोधकाचा आत्मा, “जारकर्म” पाहा, “शिकवणुक”, ज्याद्वारे देवाबरोबर जारकर्माचे पाप केले. समजले? आता, ती तर एक नवरी असायला हवी होती, आणि ती तर व्यभिचाराचे पाप करीत आहे. पाहा? जसे हव्वेने केले, जसे मंडळीने तेथे तसे केले. समजले?

*तिच्या कपाळावर* ***मोठी बाबेल****, हे नाव लिहीले होते…*

303 आणि कोणीही हे जाणतो की, “**बाबेल**” म्हणजे रोम.

***…कलावंतीणीची व पृथ्वीवरील अमंगळपणाची आई, हे गुढ अर्थाचे नाव लिहीलेले होते.***

304 आणि 6वे वचन ऐका.

*ती स्त्री पवित्रजनांच्या रक्ताने व येशूच्या साक्षीच्या रक्ताने मस्त झालेली, माझ्या दृष्टीस पडली, तिला पाहून मला फार आश्चर्य वाटले.*

305 ती या सर्वांसह फार सुरेख होती, क्रुस आणि असे सर्व तिने परीधान केले होते! “या जगात ती किती अपराधी असेल, जिने संत जनांचे रक्त प्यायले?” त्याला गोंधळात टाकले. आता तो तिला हे सांगण्यास जात आहे.

*देवदूताने मला म्हटले, तुला आश्चर्य का वाटले? ती स्त्री आणि…तिला वाहून नेणारे श्वापद ह्यांचा गूढ अर्थ मी तुला सांगतो…*

306 आता, पाहा ही गोष्ट त्या शिक्क्यातील एकाही शिक्क्याखाली येत नाही. हे काही दुसरे आहे. समजले.

*आणि तो म्हणाला,…ती सात डोकी आणि दहा शिंगे*

*जे श्वापद…तू पाहीले ते होते आणि नाही, ते अथांग* (ज्याला पाया नाही, तो पोप), *डोहांतून वर येणार आहे व नाशाप्रत जाणार आहे. जगाच्या स्थापनेपासून ज्याचे नाव ‘जीवनाच्या पुस्तकात* (येथे निवडलेले आहेत) *लिहीले’ नाही, अशा पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांना, ते श्वापद होते, नाही, तरी हजर आहे; असे पाहून आश्चर्य वाटेल…*

307 कधी, कसे तुमचे नाव जीवनाच्या पुस्तकात लिहीले गेले? त्या संजीवनाच्या सभेला उपस्थित राहून काय? नाही, महाशय. “तर जगाच्या स्थापनेपासून.”

*…जे श्वापद तू पाहीले ते होते, आणि नाही तरी हजर आहे.*

308 पाहा, “ते श्वापद,” एक मरेल, दुसरा त्याची जागा घेईल. “तो होता; तो नाहीए; तो होता; तो नाहीए; होता; तो नव्हता.” आणि ती त्या नाशाप्रत जाणार आहे, अशा मार्गाने. समजले? ठीक आहे.

*आणि येथे—येथे अकलेचे काम आहे. ज्याला बुध्दी आहे.*

309 किती जण हे जाणतात की, नऊ प्रकारची आत्मिक वरदाने आहेत, त्यांतील एक ज्ञान आहे? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] ठीक आहे.

*ती सात डोकी, म्हणजे सात डोंगर आहेत; त्यावर ती स्त्री बसली आहे.*

310 ओह, तुम्हाला त्यासाठी संपूर्णतः आंधळे, बहिरे आणि मुके असायला हवे. त्याची छाप न घेण्याकरिता. समजले? ठीक आहे.

*...तेथे सात राजे आहेत, त्यापैकी पाच पडले आहेत, एक आहे* (निरो) *आणि...एक अद्याप आला नाही; तो आल्यावर त्याला थोडा वेळ राहावे लागेल.*

311 तुम्ही आठवा त्याने काय केले? शहराला आग लावली, आणि त्याचा दोष त्याने ख्रिस्ती लोकांवर लावला आणि त्याने आपल्या आईला घोड्याच्या मागे डहाळीला बांधून शहरातील रस्त्यावरुन धावण्यास लावले आणि जेव्हा रोम शहर आगीत जळून चालले होते, तेव्हा तो सारंगी वाजवीत होता. ठीक आहे.

*आणि श्वापद जे होते, आणि नाही, आणि तोच आठवा राजा आहे...*

312 मुर्तीपूजक रोम, पोपचे रोम राज्यात बदलले गेले. जेव्हा अवतारित ख्रिस्त विरोधकाचा आत्मा हा देहधारी झाला आणि त्याला मुकूट घातला गेला, तो रोमचा मुकूट धारी राजा बनला, दोघांमध्ये मंडळीमध्ये व राज्यात, एकत्रीतपणे. ओह, भावा! पाहा, हे सर्व अशांनी भरलेले आहे. पाहा?

*...तो त्या सातांपासून झालेला आहे आणि तो नाशाप्रत जाणार आहे...* (तो किती काळ राहणार आहे? ते आपली प्रणाली बदलत नाहीत.)

*...जी दहा शिंगे तू पाहली ती दहा राजे आहेत, त्यांना अद्यापी राज्य मिळाले नाही; तरी त्यांना श्वापदाबरोबर एक तास राजांच्यासारखा अधिकार मिळतो.*

313 हे हुकूमशाहा आहेत, तुम्ही पाहा, निश्चितच. "ते सर्व एकमेकांचे होतात." आणि पाहा, येथे. हे साम्यवादाविषयी म्हटले जात नाहीए. पाहा?

*ते एक विचाराचे आहेत आणि ते आपले सामर्थ्य व अधिकार श्वापदाला देतात.*

*हे कोकऱ्याबरोबर लढतील, परंतु कोकरा त्यांस जिंकील; कारण तो प्रभूंचा प्रभू आणि राजांचा राजा आहे, आणि जे त्याच्या बरोबर आहेत, ते पाचारण केलेले...निवडलेले आणि विश्वासू आहेत.*

*आणखी तो मला म्हणाला, जेथे कलावंतीण बसली आहे. तेथे जे जलप्रवाह तू पाहिले, ते लोकं...जनसमुह...राष्ट्रे व निरनिराळ्या भाषा बोलणारे असे आहेत.*

*...जी दहा शिंगे व जे श्वापद तू पाहिले, ती कलावंतिणीचा आणि करार मोडतील...*(मी याविषयी गेल्या रात्री बोललो आहे.)*...द्वेष करतील व तिला ओसाड व नग्न करतील. तिचे मांस खातील व तिला अग्नीत जाळून टाकतील.*

314 तुम्हाला माहीत नाही काय बायबल म्हणते जहाजाचे तांडेल, व असे सर्व, म्हणाले, "हाय! हाय ते महान शहर! कसा एका तासात त्याचा सर्वनाश झाला!" पाहीले?

*कारण देवाने त्यांच्या मनात घातले की त्यांनी त्याची इच्छा पूर्ण करावी, व त्यांची राज्ये त्या पशूला देण्यासाठी तयार व्हावे, जेणेकरुन देवाचे वचन पूर्ण होईल.*

*...ती स्त्री जी तू पाहीली, ती एक महान शहर आहे, जी पृथ्वीवरील सर्व राजांवर राज्य करते.*

315 मला एक सांगा. रशिया सर्वांवर राज्य करत नाही. आपण सर्वांवर राज्य करत नाही. एकच राजा आहे, जो सर्वांवर राज्य करतो...जसे त्या नबुकद्नेसराच्या स्वप्नातील लोखंड जे त्या प्रत्येक पायांच्या बोटातून पडत होते. ते रोम आहे. रोम हा एक देश म्हणून करीत नाहीए; ती एक मंडळी म्हणून करते. स्वर्गाखालील प्रत्येक देश रोमकडे आहे.

316 ह्यात काही आश्चर्य नाही की त्यांनी म्हटले, “त्याच्या बरोबर कोण युध्द करील?” तो बोलू शकतो, “शांती” [भाऊ ब्रॅन्हम एकदा त्याच्या बोटांनी चुटकी वाजवतो—सम्पा.] आणि त्याने निर्णय होतो. प्रत्येक कॅथलिक म्हणते, “‘भांडू नका.’” आणि—आणि ते भांडत नाहीत. बस. “जे तो करु शकतो ते कोण करु शकते?” कोणीच नाही. हे बरोबर आहे. “म्हणून जे चमत्कार तो करु शकतो, त्यावर आश्चर्य करतात.” तो युध्द थांबवू शकतो. [भाऊ ब्रॅन्हम एकदा त्याच्या बोटांनी चुटकी वाजवतो.] एकच गोष्ट त्याला करावी लागेल की फक्त म्हणावे, “थांबा.” बस्स. पण तुम्हाला वाटते तो तसे करेल? नक्कीच नाही.

317 लक्षात घ्या, हे नक्की दाखवते, “ते एक दुसऱ्याला ठार मारतील. ते एकमेकांना ठार मारतील.” पहिल्यांदा, त्याच्या धनुष्याला बाण नव्हते. परंतु, त्याच्या “महान तलवारीने” हे केले. त्याने मोठी कत्तल केली, नंतर, तो सफेद घोड्यावरुन, लालसर घोड्यात बदलला, तोच, खरोखर, सैतान, त्याच्या तलवारीबरोबर.

318 येशूने काय म्हटले? येशूने म्हटले, “जे तलवार घेतील त्यांचा त्याने नाश होईल.” लढू नका. पाहीले? येशूने, त्या रात्री जेव्हा त्याने म्हटले, आणि पेत्राने त्याची तलवार मागे घेतली. समजले? त्याने जसे केले तसेच करा. फक्त पुढे जा.

319 आता, आता लक्षात घ्या. त्याच्याकडे तलवार आहे. तो पुढे जात आहे, त्याच्या हातात एक तलवार आहे, लालसर रंगाच्या घोड्यावर स्वार, जो कोणी त्याच्याशी सहमत होत नाही त्याची कत्तल करुन त्यातून पार जात आहे.

320 आता तुम्हाला हे समजते [मंडळी म्हणते. “आमेन”—सम्पा.] किती जणांना कळते. आता, की तो शिक्का काय आहे? [“आमेन.”] ठीक आहे. आता, येशूने काय म्हटले? “जे कोणी तलवार घेतील ते तलवारीने नाश पावतील.” काय हे बरोबर आहे? ठीक आहे. ठीक आहे. तो घोडेस्वार व त्याच्या राज्यातील प्रत्येक गोष्ट जे युगापासून ठार करत आहेत, ज्यांनी रक्तसाक्षी संतांचे रक्त पाडले आहे. त्यांचा येशू ख्रिस्ताच्या तलवारीने वध केला जाईल. जेव्हा तो येईल “जे तलवार घेतात त्यांचा तलवारीने वध केला जाईल.” त्यांनी मतप्रणाली व ख्रिस्तविरोधक ह्याची तलवार घेतली, आणि खरे होते. त्यांना कापले, खरे उपासक, प्रत्येक युगामध्ये, लाखांमध्ये. आणि जेव्हा ख्रिस्त तलवारीसह येईल, कारण त्याच्या मुखातून निघणारे वचन ही तलवार आहे, तो त्याच्या पुढील प्रत्येक शत्रूचा वध करील. तुम्ही ह्यावर विश्वास करता काय? “दुष्मनांचा वध करा.”

321 आता आपण एक मिनिट इथे जाऊया, प्रकटीकरण. आपण आता बघू की हे मी असेच बोलतो की वचन असे म्हणते. प्रकटीकरण 19:11

*नंतर मी स्वर्ग उघडलेला पहिला* (आमीन), *तो पाहा, एक पांढरा घोडा आणि विश्वसनीय व सत्य असा म्हटलेला एक स्वार त्याच्यावर बसलेला मला दिसला. तो नीतीने न्यायनिवाडा करितो व लढतो.*

*त्याचे डोळे…अग्नीच्या ज्वालेसारखे आहेत व त्याच्या डोक्यावर…पुष्कळ मुकूट आहेत…*

322 ओह भावा! त्याच्या संतांद्वारे त्याला मुकूटमंडीत केले आहे. तुम्ही पाहा,

*…आणि त्याच्यावर एक नाव लिहीलेले आहे, ते त्याच्या वाचून कोणालाही कळत नाही.*

323 लक्षात ठेवा, आपण—आपण करु शकत नाही, आपल्याला ते माहीत नाही, पाहा, ते काय आहे. "आणि त्याने वस्त्र घातले होते…" आपण पाहूया.

*आणि रक्तात बुचकळलेले वस्त्र त्याने अंगावर घेतले होते: आणि त्याला हे नाव देण्यात आले.* ("आहे" असे नाही, पण "देण्यात आले") *देवाचा शब्द.*

324 कारण, तो आणि शब्द एकच आहेत. पाहिले? आता लक्षात घ्या, "त्याची नावे" असे नाही. ऊ–हू! "त्याला नाव देण्यात आले. 'देवाचा शब्द.'" त्याला केवळ एकच नाव माहीत आहे; दुसरे कोणतेच नाव नाही.

*आणि स्वर्गातील सैन्ये, पांढऱ्या घोड्यावर बसून पांढरी व शुध्द अशी तागाची तलम वस्त्रे अंगावर घालून त्याच्यामागे चालत होती.* (हे संतांचे नितीमत्त्व आहे. पाहीले?)

325 आता पाहा. येशूने काय म्हटले? "तो जो तलवार घेतो…" ठीक आहे. लालसर घोड्यावरील स्वार इथे तो कुठे येत आहे. "तो जो तलवार घेतो…" तुम्ही कदाचित अडसष्ठ दशलक्ष (6,80,000,00) मारले असतील. अनेक युगांपासून, तेव्हापासून; कदाचित त्याहूनही अधिक. पण येशूने म्हटले, "तो जो तलवार घेतो तो त्यानेच नाश पावेल." पाहा.

*आणि त्याच्या मुखातून तीक्ष्ण धारेची तलवार निघते,…*

326 इब्री, चौथा अध्याय म्हणतो, "देवाचे वचन दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण आहे, सांधे व मज्जा ह्यांना आरपार भेदून जाणारे" आणि हे वचन काय करते? "ते मनातील विचार व हेतू ह्यांचे परिक्षक असे आहे." बरोबर.

*…त्याच्या मुखातून एक तीक्ष्ण दुधारी…एक तीक्ष्ण तलवार निघते, तीने तो राष्ट्रांस मारील आणि तो त्यांवर लोखंडी दंडाने अधिकार गाजवील; आणि सर्व समर्थ देव ह्याच्या तीव्र क्रोधरुपी द्राक्षारसाचे कुंड तो तुडवितो.*

*आणि त्याच्या वस्त्रावर व त्याच्या मांडीवर,* ***राजांचा राजा आणि आणि प्रभूंचा प्रभू*** *हे नाव लिहीलेले आहे.*

327 जसे ते ढोंगी, देवाच्या वचनाविरुध्द, आणि कारण ते सहमत नव्हते, आणि ही गोष्ट…सैतानाने त्याच्याकडे असलेली सर्व राजकीय शक्ती एकत्र केली, आणि त्याच्याकडे असलेले आत्मिक सामर्थ्य एकत्र केले, आणि एक मंडळी तयार केली जी प्रत्येक राष्ट्रामध्ये घुसेल. आणि त्याने हे दशलक्ष पट दशलक्ष एवढे टाकले…जेव्हा तो त्याच्या सफेद घोड्यावरुन उतरला व किरमीजी घोड्यावर चढला, आणि त्याने त्याची तलवार घेतली व तो पुढे गेला.

328 पण देवाने म्हटले, “त्याच गोष्टीने जिच्याद्वारे त्याने विपर्यास केला, किंवा करण्याचा प्रयत्न केला, चुकीच्या शिकवणुकीने; तोच शब्द सामर्थ्याने येईल, येशूच्या मुखातून निघून, आणि त्याची व त्याच्यापुढील सर्व गोष्टींची कत्तल करील.” आमेन.

329 तिथेच दुसरा शिक्का आहे. तुम्ही त्यावर प्रेम करता? [मंडळी म्हणते “आमेन”—सम्पा.] अरे बापरे! हे **प्रभू परमेश्वर असे म्हणतो आहे**. [मंडळी खूप हर्षित होते.] देवाला गौरव असो! देवाला गौरव असो! जर ही सर्व प्रकटीकरणे, आणि दृष्टांत, आणि सर्व काही, बरोबर त्या—त्या मुद्द्यावर बोलले आहेत तर! आणि किती जणांना हे माहीत आहे? तुमचे हात वर करा. शंभर इथले सर्वजण, त्याचे हात वर करुन हे बरोबर आहे. आणि हे असेच होईल. लक्षात ठेवा हे असे आहे. अरे मित्रा!

रक्ताने भरलेल्या झऱ्याकडे या,
जे इम्मान्युएलच्या धमण्यातून काढले आहे;
जिथे पापी पुराखाली उड्या मारतात.
त्यांचे सर्व अपराधी डाग गमावतात.

330 या, जर तुम्ही कधीच ठेवला नसेल, त्यावर विश्वास ठेवा. एकही शक्यता ठेवू नका; नका, नका, जर तुमच्या जीवनात काहीतरी असेल, मित्रांनो.

331 आपण इथे आहोत काहीतरी घडण्यासाठी तयार होत आहे.[भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठावर चार वेळा ठोकतात—सम्पा] मला माहीत नाही का? मला माहीत नाही कधी? मला माहीत आहे काय घडणार आहे, पण मला माहीत नाही ते कधी घडणार आहे, परंतु ते घडायलाच हवे कारण तो ह्या क्षणी ते प्रकट करत आहे. तो काहीच करत नाही, जोपर्यंत तो त्याची माहिती देत नाही. आमोस 3 तो प्रथम कळवितो. आणि त्याने वचन दिले की ह्या गोष्टी शेवटल्या दिवसात येतील. आणि सातव्या मंडळी युगाच्या शेवटी, जेव्हा दूत येतो, हे तेथेच असेल. हे प्रकट केले जाईल, ते फोडलेले शिक्के प्रकट केले जातील, आणि इथे ते आहेत. आता, हे प्रभूच्या नावामध्ये आहे. ह्याचा विश्वास कर, मित्रा. होय, महाशय, बाबेलमधून बाहेर या!

332 मला काहीतरी सांगायचे आहे संपविण्यापूर्वी कारण, माझ्याकडे…मला साडेनऊपर्यंतच वेळ आहे. आणि ही अगदी आताच वेळ झाली आहे.

333 बिली आणि मी, जेव्हा आम्ही विमानातून उतरलो, भारतामध्ये, आमची तेथील शेवटची भेट. मी एका—एका कागदावर बघत होतो जे त्यांनी आणले होते, इंग्लिशमध्ये लिहीले होते. आणि ते असे, “भूकंप संपला असावा; ते पक्षी परत येत आहेत.” नंतर त्यामध्ये सविस्तर माहीती दिली होती. ते…तिथे काहीतरी मजेदार घडले.

334 आपल्याकडे जसे विणलेले कुंपण आहे, तसे भारतात नाही. ते दगडं उचलतात, आणि त्याचे कुंपण बनवितात. आणि ते त्यांची बरीचशी घरं दगडांनी बांधतात, केवळ त्यांना रचून ठेवतात. आणि तिथे गरम हवामान आहे, आजूबाजूला, ओह, कुठेही, भारताच्या बजूला, जर तुम्ही उंच पर्वतांवर नसाल तर. आणि खाली कलकत्ता व अशा ठिकाणी लोक केवळ रस्त्यावर पडून राहतात, भुकेमुळे मरतात व असे सर्व.

335 आता, मग, आणि ते त्यांच्या घरांवर मनोरे बांधतात. ते त्यांच्या घराभोवती कुंपण घालतात. त्यांच्या घरासाठी मनोरा बांधतात, मनोरा जेथे त्यांची विहीर असते तिथे बहुदा असतो. ते ती, त्यांच्या गुराढोरांसाठी व इतर गोष्टीसाठी खणतात, नंतर त्याभोवती त्यांचे कुंपण घालतात.

336 आणि, अचानक, काहीतरी घडण्यास सुरवात होते. ते छोटे पक्षी, तुम्हाला माहीत आहे, त्या दगडांमध्ये जातात, आणि ते त्यांची घरटी बांधतात आणि त्यांच्या पिल्लांना वाढवतात आणि काहीतरी घडण्यास सुरुवात होते.

337 दररोज, जेव्हा गरमी वाढते, सर्व गुरढोरे एकत्र येऊन त्या भिंतीच्या आडोशाला उभे राहतात; थंडाव्यासाठी.

338 आणि सर्व छोटे पक्षी त्या ठिकाणी राहतात. आणि, एकाएकी, ते सर्व पक्षी, कोणत्यातरी अज्ञात कारणासाठी...आता, तुम्हाला माहीत आहे, आपण त्या दिवशी छोट्या पक्ष्यांविषयी काय बोललो; पाहीले? कोणत्यातरी अज्ञात कारणामुळे, ते सर्व उडून गेले. आणि ते बाहेर गेले, आणि त्यांच्या घरट्यांकडे परत आले नाही. ते बाहेर शेतात गेले, आणि ते झाडांवर बसले, आणि जे काही त्यांना मिळू शकले, किंवा खाली जमिनीवर.

339 गुरेढोरे परत आले नाही. मेंढ्या परत आल्या नाहीत. ते शेतातच राहीले, आणि एकमेकांना बिलगून राहिले. आणि हा एक उत्तम मार्ग आहे. त्यांना माहीत होते की काहीतरी घडणार होते.

340 आणि नंतर, अचानक, एक भूकंप आला, आणि भिंती हलवून पाडल्या, कुंपण पाडले, आणि सर्वकाही.

341 नंतर ते छोटे पक्षी परत येऊ लागले. तीन किंवा चार दिवसापर्यंत परत आले नाही; नंतर परत येऊ लागले. ते म्हणाले, "भूकंप आता संपला असणार; ते पक्षी परत येत आहेत."

342 का? तुम्ही विश्वास करत नाही का की तोच परमेश्वर ज्याने त्या पक्ष्यांना, आणि गुरांना आणि मेंढरांना, नोहाच्या दिवसांत, तारवात जाण्यास लावले, तो अजूनही तोच परमेश्वर आहे, जो त्यांना सुरक्षिततेकडे पळण्यास लावील? काय हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते, "आमेन"—सम्पा.]

343 आता, मला काहीतरी सांगू दे. भावा. काहीतरी घडण्यासाठी तयार होत आहे. आणि ह्या सर्व मोठ्या, जुन्या धर्मोपदेशक भिंती कोसळणार आहेत आणि अगदी पलीकडे जाऊन सहमत होतील. कारण ते असं करणार आहेत; हे इतके निश्चित आहे, जितक्या निश्चितपणे मी इथे उभा आहे. "त्या पशूची एक प्रतिमा आहे," जेवढा निश्चितपणे मी इथे उभा आहे तेवढंच निश्चित; आणि ह्या राष्ट्राने ती घेतली, परमेश्वराच्या वचनाप्रमाणे. ऐका, जेव्हा तुम्हाला ते थोडसं गमतीदार वाटेल. तुम्ही त्या भिंतीपासून दूर पळा. दूर पळा! तुम्ही तिथे मराल! तसे करु नका! त्यातून बाहेर निघा! ह्या सर्व गोष्टींपासून दूर पळा! सुरक्षिततेकडे पळून जा. जितक्या जलद तुम्ही पळू शकता तितके. देवाकडे दयेची विनवणी करा.

344 केवळ काहीतरी असे घेवू नका, "बरे, माझी आई मेथोडिस्ट होती, त्यामुळे मला वाटते मी पण असावे. माझे वडील बॅप्टीस्ट होते; मी पण असावे." तुम्ही तसे करु नका. तुम्ही—तुम्ही कोणत्याच प्रकारची संधी घेवू नका.

345 मी पर्वा करीत नाही हे किती साधे व नम्र वाटते; हे प्रभूचे वचन आहे. तुम्ही शक्य तितक्या जलद येशूकडे पळा व तिथे तोपर्यंत थांबा, जोपर्यंत देव तुम्हाला त्याच्या पवित्र आत्म्याने भरत नाही. कारण अशी वेळ येईल जेव्हा तुम्ही त्याचा शोध कराल, परंतु तो तिथे नसेल. त्यामुळे, खात्रीपूर्वक हे करा.

आता एक क्षण, आपण आपली मस्तके झुकवूया.

346 स्वर्गीय पित्या, ओह, मी—मी केवळ, कधीकधी, प्रभू इथे उभा राहतो आणि—आणि मी थरथर कापतो. मी त्या भयानक वेळेविषयी विचार करतो, जी जवळ येत आहे,

आणि मी...तिला थांबविण्याचा कोणताच मार्ग नाही. हे असे भाकित केले आहे ती येईल. आणि मी ह्याचा विचार करतो, "लोकं का येऊन आणि—आणि—आणि ऐकत नाहीत? आणि ते येऊन स्विकारणार नाहीत काय?" पण, नक्कीच, मला माहीत आहे की—की तू—तू म्हटले, ते येणार नाहीत, म्हणून ते येणार नाहीत.

347 परंतु असे काही आहेत, ज्यांची नावे कोकराच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीली आहेत. आणि ज्यावेळी ते शिक्के तिथे उघडले जातील. तेव्हा ते त्यांची नावे तिथे पाहतात, आणि पवित्र आत्मा त्यांच्याशी बोलतो. ते येतात. तुम्ही त्यांना दूर ठेवू शकणार नाही; कोणीच ठेवू शकत नाही, कोणीच नाही. ते येत आहेत, कसेही, कारण तू त्यांना मार्ग दाखवत आहेस जसा तू त्या पक्ष्यांना, आणि त्या मेंढरांना व गुराढोरांना दाखविलास. तू परमेश्वर आहेस! काहीतरी अंत:प्रेरणा त्या प्राण्याकडे आहे की त्यांना समजते की त्यांना दूर पळायला हवे! आणि जर एक अंतःप्रेरणा एका प्राण्याला चेतावणी देते की त्याने धोक्यापासून दूर पळावे, तर पवित्र आत्मा त्या मंडळीला काय करील, जी त्याने भरलेली आहे असा दावा करते!

348 देवा, आमच्याशी क्षमाशील ऐस. आम्हा सर्वांना क्षमा कर, प्रभू, आमच्या कमतरतेबद्दल. आमचा असा उद्देश नाही, की आम्ही इथे व्यासपीठावर उभे राहावे व हया लोकांना भिंतीभोवती उभे राहू देऊन, आणि त्याचे हातपाय दुखावेत, आणि नंतर केवळ दूर जाऊन म्हणावे, "बरे हे खूप चांगले वाटते." प्रभू, आम्हाला ह्याविषयी काहीतरी करायचे आहे. आमची, आमची इच्छा आहे की तू आमची हृदये शोध. जर काही चुकीचे असेल तर प्रभू आम्हाला आताच समजू दे. आम्हाला पलीकडे त्या वेळेपर्यंत जाऊ देऊ नको, जेव्हा खूप उशीर झालेला असेल मला शोध, मला संधी दे, प्रभू.

349 इथे मी उभा आहे देवाच्या दयेने, पलीकडे ते शिक्के फुटताना, व येऊन लोकांना सांगताना पाहत आहे. जेव्हा, काही आठवड्याअगोदर तू असे भाकित केले, हे अशाप्रकारे होईल. आणि, आता पित्या, ते इथे आहे, अगदी आमच्यापुढे.

350 आता, प्रभू, मला संधी दे. मला शोध. माझ्या हृदयात माझा शोध घे. प्रभू, आम्ही नाही...आमची इच्छा आहे की, तू आमच्या जीवनात डोकावून बघ. आणि त्यामध्ये जर असे काहीही असेल जे योग्य नाही तर त्याविषयी आमच्याशी बोल, प्रभू. आम्हाला त्यामध्ये सुधारणा करायची आहे, आता यावेळी; आत्ताच यावेळी जेव्हा इथे रक्ताने भरलेला एक झरा आहे, जेव्हा इथे एक—एक पूड (ब्लीच) आहे, जी आमची पापे व आमचा अविश्वास साफ करु शकते. आम्हाला आमचे आत्मे त्याखाली ठेवायचे आहेत. आमचा सर्व अविश्वास. प्रभू, आमच्या अविश्वासामध्ये आम्हाला मदत कर; तो आमच्यापासून दूर कर, प्रभू.

351 आम्ही वर घेतले जाण्याची कृपा हवी आहे. आम्ही लायक होऊ इच्छितो, जेव्हा ते रहस्यमय मेघ गर्जना करील, आणि मंडळी वर घेतली जाईल. आम्ही ते स्विकारण्यासाठी तयार होऊ इच्छितो. प्रभू, हे मंजूर कर.

352 प्रभू तुझ्या वचनाने आमची पारख कर. आम्हाला त्यामध्ये बघू दे.

353 आणि जर आम्हाला जाणवले की आम्ही चुकलो आहोत. जर इथे ते असतील, प्रभू, ज्यांचा बाप्तिस्मा शीर्षकांमध्ये झाला आहे; जे खऱ्या बाप्तिस्माविषयी काहीही जाणत नाहीत! मला पौलाप्रमाणे विश्वासू असू दे, जेव्हा तो इफिसच्या वरच्या किनारपट्टीवरुन जात होता, आणि त्याला शिष्य किंचाळताना, आणि ओरडताना, व खूप उत्कृष्ट अशी वेळ घालवताना आढळले. तो त्यांना म्हणाला, "तुम्ही विश्वास ठेवला तेव्हा तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय?"

त्यांना असे काही आहे हे माहीत नव्हते.

तो म्हणाला, “मग तुम्ही कोणाचा बाप्तिस्मा घेतला?”

आणि त्यांचा बाप्तिस्मा त्या वैभवशाली, महान संदेष्ट्याद्वारे झाला होता, पण त्यांनी केवळ पश्चातापाचा बाप्तिस्मा घेतला होता.

354 मग त्यांचा येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये पुन्हा बाप्तिस्मा झाला. आणि पौलाने त्यांना पुन्हा एकदा बाप्तिस्मा घेण्यास आज्ञा दिली.

355 प्रभू, तुझ्या वचनाच्या प्रकाशामध्ये: मी प्रत्येक व्यक्तिला, ज्यांचा बाप्तिस्मा प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये झाला नाही, आज्ञा करितो की त्यांनी त्वरा करुन पाण्याकडे जावे, त्यांच्याकडे संधी आहे तोपर्यंत. तुम्ही, जे अजून पवित्र आत्म्याने भरले नाहीत; मी तुम्हाला प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये आज्ञा करतो; तुमच्या गुडघ्यांवर या. आणि तोपर्यंत उठू नका जोपर्यंत पवित्र आत्मा तुम्हाल पूर्णत: पवित्र करुन आणि त्याच्या प्रेमाने व चांगूलपणाने भरत नाही. जोपर्यंत तुमचा आत्मा देवाच्या समक्षतेमध्ये इतका तृप्त होत नाही की, तुमची पूर्ण इच्छा हीच होईल की तुम्ही तुमचे बाकीचे आयुष्य त्याची सेवा करावी, आणि त्याच्याबरोबर चालावे, आणि त्याच्याबरोबर कार्य करावे.

356 हे मंजूर कर. मी प्रार्थना करतो की देव तुम्हाला हा ताबा देईल, येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये.

> मी त्यावर प्रेम करतो, मी त्यावर प्रेम करतो.
> कारण प्रथम त्याने माझ्यावर प्रेम केले.

तुम्ही त्याच्यावर खरोखर प्रेम करता काय? आता तुमचे हात वर करा.

> आणि माझे तारण
> कालवरीच्या झाडावर विकत घेतले.

357 [भाऊ ब्रॅन्हम *मी त्याच्यावर प्रेम करतो* हे गीत गुणगुणण्यास सुरुवात करतात—सम्पा.] जर आजच्या रात्री इथे कुणी असे बसले असतील, ज्यांना त्यांची इच्छा जाणवत आहे, त्यांनी बाप्तिस्मा घेण्याची गरज आहे असे वाटत असेल, किंवा पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याची गरज आहे. तुम्हाला तुमची गरज माहीत आहे; ती तुम्हाला प्रकट करण्यात आली आहे, आणि तुमची इच्छा आहे की प्रार्थनेमध्ये तुमची आठवण व्हावी. इथे कोणीही आमच्यामध्ये नाही जो तुम्हाला ते देऊ शकेल. ओह, आम्ही तुम्हाला बाप्तिस्मा देऊ शकतो. पण, एकच गोष्ट, आम्ही तुम्हाला पवित्र आत्मा देऊ शकत नाही. देव एकटाच, ते करतो. परंतु तुम्ही तुमची इच्छा जाणली आहे, ज्याविषयी देव तुमच्या हृदयाशी बोलत आहे, की तुम्हाला त्याची गरज आहे, आणि तुमची इच्छा आहे की आम्ही प्रार्थनेमध्ये तुमची आठवण करावी. तुम्ही उभे राहाल काय, जेणेकरुन आम्ही तुम्हाला ओळखू शकू, तुम्ही कोण आहा हे कळेल? देव तुम्हाला आशीर्वाद देवो. एक गरज? प्रभू तुम्हाला आशीर्वाद देवो.

358 मी अनुमान लावतो की इथे बहुतेक एकशे पन्नास उभे आहेत. कदाचित तेवढेच आहेत, जर मी सर्वांना बघू शकत आहे. मला माहीत नाही खोलीमध्ये कितीजण आहेत, आणि बाहेर भोवती वगैरे, ज्यांनी त्यांचे हात वर केले आहेत, परंतु तुमची एक गरज आहे.

आता आपण प्रार्थना करुया.

359 आता, तुम्ही जे लोक तुमच्या बाजूला उभे आहेत त्यांना बघता. आणि ते ख्रिस्तासमोर, साक्षीच्या रुपाने उभे आहेत, “मला—मला—मला तुझी गरज आहे, प्रभू. मला तुझी गरज आहे. मी—मी विश्वास करतो, मी—मी त्यांच्यातला एक आहे जो

आपले नाव पलीकडे त्या शिक्क्यावर पाहील; जे जगाच्या स्थापनेपूर्वी तिथे त्याच्यावर लिहीले होते. काहीतरी माझ्या हृदयाला भिडले आहे, आणि मी इथे उभा आहे. प्रभू. काय तो मी आहे? तू मला बोलावत आहेस? माझी इच्छा आहे की तू मला माझे नाव तिथे असल्याचे प्रकट करावे. मला भर, आणि पवित्र आत्म्याने मला तुझ्यामध्ये मोहरबंद कर." तुम्ही, जे अगोदरच मोहोरबंद झाले आहा. माझी इच्छा आहे की तुम्ही उभे राहावे त्यांच्याकडे वळा. आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करण्यासाठी तुमचे हात त्यांच्यावर ठेवा. [भाऊ ब्रॅन्हम थांबतात.] आता अगदी फारच प्रामाणिक असा. [संपूर्ण मंडळी प्रार्थना करण्यास आरंभ करते—सम्पा.]

360 स्वर्गिय पित्या, प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये, महान पवित्र आत्म्याला ह्या श्रोत्यांमध्ये हालचाल करु दे, एका वेगवान वाऱ्याप्रमाणे, आणि प्रत्येक हृदयाला बोलाव, प्रभू. आणि ह्या लोकांवर पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याचा वर्षाव कर."

आणि तिथे पाणी वाट पाहत आहे.

361 "आणि पेत्र हे शब्द बोलत होता, तेव्हा पवित्र आत्मा त्यांच्यावर उतरला जे वचन ऐकत होते, आणि ते सर्व पवित्र आत्म्याने भरले."

[संपूर्ण मंडळी प्रार्थना करीत राहीली—सम्पा.]

***दुसरा शिक्का*** MAR63-0319

(The Second Seal)

***सात शिक्क्यांचे प्रगटीकरण सत्र***

हा संदेश मूळ रूपाने इंग्रजीत भाऊ विलियम मेरियन ब्रंहम यांनी मंगलवारी संध्याकाळी, 19 मार्च, 1963 रोजी, ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफरसनविल येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.



VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org